म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र. 6130

REFBK-0001108

4830

# युद्ध

## त्याचीं कारणें व त्यासंबंधीं संदेश.

मुख्य प्रधान

यांचीं

भाषणें.

( आगस्ट—आक्टोबर १९१४ पर्यंतचीं. )

1108

भाषांतरकार

**विष्णु वासुदेव ना[illegible]कर,**

असिस्टन्ट डेप्युटि एज्युकेशनल इन्स्पे[illegible]टर, जिल्हा पुणें.

मुंबई:
गव्हरमेंट सेंट्रल प्रेसमध्यें [illegible]पलें.

१९१५.

किंमत २ आणे.

Marathi Translation of "The War, its Causes and its Message."

अनुक्रमणिका.

पृष्ठ.


१. तारीख ६ आगस्ट १९१४ रोजीं कॉमन्स सभेंत केलेलें भाषण. १

२. तारीख २७ आगस्ट १९१४ रोजीं कॉमन्स सभेंत केलेलें भाषण. १३

३. मुख्य मुख्य शहरांतील लॉर्ड मेयरनां लिहिलेलें पत्र. ... १६

४. तारीख ४ सप्टेंबर १९१४ रोजीं लंडन येथील गिल्ड-हॉल-मधील भाषण. १७

५. तारीख १८ सप्टेंबर १९१४ रोजीं एडिंबरो शहरीं झालेलें भाषण. २९

६. तारीख २५ सप्टेंबर १९१४ रोजीं डब्लिन येथें झालेलें भाषण. ४१

७. तारीख २ आक्टोबर १९१४ रोजीं कार्डिफ शहरीं झालेलें भाषण. ५३



REFBK-0001108

K 17—A

## युद्धाच्या खर्चासाठीं १०,००,००,००० पौंड कर्ज काढण्याची मंजुरी मिळावी म्हणून कॉमन्स सभेंत ठराव आणिला होता, त्याच्या पुष्टीकरणार्थ तारीख ६ आगस्ट १९१४ रोजीं केलेलें भाषण

सभासदहो, आपल्या *अध्यक्ष महाराजांनीं नुकताच एक ठराव आपणांस वाचून दाखविला आहे. त्या संबंधानें माझे सन्मान्य मित्र, आपले परराष्ट्रीय प्रधान, सर एडवर्ड ग्रे, ह्यांनीं दोनतीन दिवसांपूर्वींच भाषण केलें आहे. त्या प्रसंगीं त्यांनीं जे मुद्दे सांगितले, तेच मी आज पुन्हा सांगत बसत नाहीं; कारण तसें करण्याची मला मुळींच अवश्यकता दिसत नाहीं. आज कित्येक वर्षें, फार काय कित्येक पिढया, जर्मन राष्ट्राशीं आपला स्नेहसंबंध आहे. असें असतां त्या राष्ट्राशीं इंग्रज सरकारास युद्ध सुरू करावें लागलें आहे. परंतु तें आपण मोठ्या नाखुषीनें सुरू केलें असून त्याजबद्दल आपणांस अत्यन्त खेद होत आहे. हें युद्ध सुरू करण्यास कारणें कोणतीं झालीं, तीं सर एडवर्ड ग्रे ह्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलीं आहेत. त्यांनीं जीं जीं विधानें केलीं आहेत; त्यांपैकीं एकही खोडून काढण्यासारखें आहेसें मला वाटत नाहीं. तसेंच त्या विधानांना खरोखरच कोणींही उत्तर दिलेलें नाहीं. तथापि त्यानंतर कित्येक कागदपत्र पार्लमेंट सभेपुढें सादर करण्यांत आले असून ते हल्लीं आपल्या हातांतही आहेत. यूरोपखंडांत चिरकालिक शांतता राहावी, व तीही कोणत्याही राष्ट्राला कमीपणा न येतां राहावी, अशासाठीं माझ्या मित्रांनीं—सर एडवर्ड ग्रे ह्यांनीं—किती परिश्रम केले, ते कसे सतत केले व कशा चिकाटीनें केले, हें सर्व त्या कागदपत्रांवरून आपल्या ध्यानीं येईल. विशेष मौज ही कीं, आशेचा अखेरचा तंतु तुटला असतांही त्यांनीं ह्या कामीं परिश्रम केले आहेत. गेल्या वर्षींच यूरोपच्या पूर्वेकडे बाल्कन प्रांतांत मोठें रण माजलें होतें. तेव्हां माझ्या मित्रांनीं योजिलेल्या उपायांमुळेंच युद्धक्षेत्राची मर्यादा संकुचित झाली व बलाढ्य राष्ट्रांतून तरी शांतता राहिली. ह्याचें श्रेय सर्वस्वीं त्यांना नसलें तरी बहुतांशीं त्यांनाच आहे; व ही गोष्ट सर्व

* कॉमन्स सभेंतील कामकाज चालू असतां तेथें जो अध्यक्ष नेमलेला असतो, त्याला "स्पीकर" म्हणतात.



१११०८

यूरोपखंडही कबूल करितें. हल्लींच्या प्रसंगीं त्यांच्या प्रयत्नाला दुर्दैवेंकरून यश आलें नाहीं. तथापि कोणत्याही मुत्सद्याचा जितका बहुमान करितां येईल, तितका कॉमन्स सभेंतील आपण सर्व प्रतिनिधि त्यांचा करूं, व देशांतील एकंदर लोकही करतील. इतकेंच नाहीं, तर आपल्या वंशजां-कडून त्यांना तसा मान मिळून इतिहासांतही त्यांचा लौकिक होईल; अशी माझी खातरी आहे. तो बहुमान एवढ्याच कीं, आपल्या देशाच्या अब्रूला व हितसंबंधाला केव्हांही काडीइतका धक्का लागूं न देतां एकंदर सर्व देशांच्या अयंत हितासाठीं, म्हणजेच सार्वत्रिक शांततेसाठीं, त्यांनीं भारी प्रयत्न केला; आजपर्यंत तसा कोणींही केला नसेल. आपल्या हातांतील कागदपत्रां-वरून आणखेही कांहीं निष्पन्न होतें. आपण तटस्थ राहिलों असतों तर आपणांस त्याऐवजीं काय मोबदला मिळावयाचा होता, तेंही त्या कागदपत्रां-वरून दिसून येतें. ह्या प्रकरणीं इंग्रज सरकार व जर्मन सरकार ह्या उभयतांत आठ दिवसांपूर्वींच जो पत्रव्यवहार झाला तो आपण वाचालच; पण आपले सर्व देशबांधवही सर्वत्र वाचतील, समजून घेतील व ध्यानांत ठेवितील; असा मला भरवसा आहे. * जर्मन चान्सेलर ह्यांनीं आपले बर्लिन येथील वकील सर एडवर्ड गॉश्चेन यांस तारीख २९ जुलई रोजीं एक पत्र लिहिलें असून त्याचा ह्या छापील पत्रव्यवहारांत ८९ वा नंबर आहे. आपण तटस्थ राहावें ह्मणून जर्मन सरकारनें आपणांस काय काय देऊं केलें होतें, तें सर्व त्या पत्रांत आहे. त्या अटींचा थोडासा उल्लेख मला केला पाहिजे असें वाटतें. आस्ट्रिया व रशिया ह्यांच्या दरम्यानची वस्तुस्थिति कशी काय आहे तिचा उल्लेख केल्यावर सर एडवर्ड गॉश्चेन हे लिहितात :—

"नंतर ब्रिटिश सरकारनें तटस्थ राहावें ह्मणून चान्सेलर ह्यांनीं पुढीलप्रमाणें विलक्षण बोलणें सुरू केलें. ब्रिटिश सरकारचें राजधोरण मुख्यत्वें ज्या तत्त्वावर आहे, त्याची आपणांस थोडी फार अटकळ आहे. ती-वरून इतकें स्पष्ट आहे कीं, एखादा तंटाबखेडा उत्पन्न होऊन फ्रान्सचा चुराडा होण्याचा प्रसंग आल्यास ग्रेट ब्रिटन स्तब्ध बसणार नाहीं. तथापि जर्मनीचा कांहीं फ्रान्सचा चुराडा उडविण्याचा हेतु नाहीं. ब्रिटिश सरकार तटस्थ राहाण्याची खातरी देईल, तर जर्मन सरकारही त्या सरकारास हरएक प्रकारें आश्वासन देईल कीं, भावी युद्धांत जर्मन सरकारास जय मिळाल्यास

* जर्मन चान्सेलर ह्मणजे जर्मनींतील मुख्य प्रधान. ह्यांच्याचकडे परराष्ट्रीय प्रधानांचेंही काम असतें.

फ्रान्सच्या पदराला खार लावून आपला मुलूख वाढविण्याचा जर्मन सरकारचा हेतु नाहीं.

हें शेवटचें वाक्य सभासदांनीं ध्यानांत आणण्यासारखें आहे.

नंतर सर एडवर्ड गॉश्चेन ह्यांनीं त्यांना एक अगदीं समर्पक प्रश्न विचारला. तो असा :—

"मीं चान्सेलर साहेबांना फ्रेंचांच्या वसाहतीसंबंधानें प्रश्न विचारिला; तेव्हां ते ह्मणाले कीं, वसाहतींसंबंधानें मात्र आपणांस अशा प्रकारची हमी घेतां येत नाहीं."

ह्या फ्रेंचांच्या वसाहती ह्मणजे काय तें ध्यानांत आणा. ह्या वसाहती ह्मटल्या ह्मणजे यूरोपखंडाबाहेर फ्रेंच सरकारच्या ताब्याखालीं सर्वत्र असलेलीं राज्यें व मुलूख होत.

आतां ह्या एकंदर प्रकरणांत विशेष अवघड मुद्दा खुद्द माझ्या स्वतःच्या मतानें ह्मटला ह्मणजे, किरकोळ राष्ट्रांची व्यवस्था काय लावावयाची, हा असून त्याला अनुलक्षूनच प्रायः ह्या प्रकरणाचा अखेर निकाल लागला पाहिजे. तेव्हां त्या मुद्दयाचा आतां आपण विचार करूं. सर गॉश्चेन पुढें लिहितात :—

"तथापि हॉलंडासंबंधानें चान्सेलर साहेब ह्मणाले कीं, त्या लोकांच्या राज्यास धक्का न लावितां त्याची तटस्थवृत्ति जर्मन सरकारचे शत्रू जोंपर्यंत कायम राखितील, तोंपर्यंत आपणही तशाच प्रकारचें वर्तन ठेवूं, अशाविषयीं ब्रिटिश सरकारास अभिवचन देण्यास जर्मन सरकार तयार आहे."

ह्यापुढें बेलजमचा प्रश्न ओघानेंच येतो :—

"बेलजममध्यें जर्मनीला कशीं काय कृत्यें करावीं लागतील, हें फ्रान्सच्या वर्तनावर अवलंबून आहे. परंतु बेलजम जर्मनीच्या विरुद्ध पक्षास मिळाला नाहीं, तर युद्ध संपल्यानंतर तो देश जर्मनी जशाचा तसा कायम ठेवील."

ह्या दोन देशांच्या संबंधानें जर्मनीनें केलेल्या वर्तनांतील फरक सभासदांनीं ध्यानांत आणावा. हॉलंडच्या बाबतींत स्वातंत्र्य व राज्यविस्तार कायम राखण्याचेंच केवळ आश्वासन नसून तटस्थवृत्ति कायम राखण्याचेंही होतें. पण बेलजमच्या बाबतींत तटस्थवृत्तीचें नांवही नाहीं; तर युद्ध संपल्यानंतर बेलजमचें राज्य कायम राखण्यात येईल, एवढेंच काय तें आश्वासन आहे.

चान्सेलर साहेब पुढें ह्मणतात:—

"मी चान्सेलरचें काम पाहूं लागलों तेव्हांपासूनच इंग्लंडचे व जर्मनीचे विचार जुळवून आणण्याचें आपलें धोरण आहे. तेव्हां ह्या अभिवचनांच्या पायावरच त्या समेटाची उभारणी होईल, असा मला भरंवसा आहे."

हीं अभिवचनें मी आपणांस वाचून दाखविलींच आहेत!

ह्या चान्सेलर साहेबांच्या ह्मणण्याचा अर्थ काय? मी आपणा सभासदांपच घटकाभर ह्याचा अर्थ विचारितों. असा प्रश्न विचारून आपल्या मनोवृत्ति क्षुब्ध करण्याचा माझा हेतु नाहीं, जर्मनीच्या विरुद्ध तुह्मांला चिथविण्याचा हेतु नाहींच नाहीं. तर ह्या एकंदर प्रकरणांत ब्रिटिश सरकारचें धोरण काय आहे, तें स्पष्ट करून त्याचें समर्थन करण्याचा केवळ हेतु आहे. तर मग जर्मन चान्सेलर ह्यांच्या सूचनेचा एकंदर मथितार्थ काय? प्रथमतः त्याचा अर्थ असा:—युद्धांत जर्मनीला अखेर जय मिळाल्यास खुद्द यूरोप खंडाबाहेर इतर खंडांतील फ्रेंचांचीं राज्यें व मुलूख जर्मनीनें मनसोक्त खालसा करण्यास आपण फ्रान्सच्या नकळत जर्मन सरकारास परवानगी द्यावी. आपण ही सूचना मान्य केली असती, ह्मणजे अशा प्रकारची संमति दिल्याप्रमाणेंच होतें. ह्या प्रकरणांत फ्रान्सला मुळींच विचारिलें नव्हतें, हें ध्यानांत आणण्यासारखें आहे. आतां बेलजमच्या दृष्टीनें त्यांच्या सूचनेचा अर्थ काय होतो तें पाहूं. बेलजमची तटस्थवृत्ति कायम राखण्याविषयीं आपण त्याला योग्य प्रकारें अभिवचन दिलेलें आहे. तेव्हां तें अभिवचन पाळण्यासाठीं त्या लोकांनीं आपणांस द्रव येण्याजोगी विनंती केली असती, तर आपण त्यांना काय उत्तर दिलें असतें बरें! आणि अलीकडे थोड्या दिवसांपूर्वीं त्यांनीं अशी विनंती केलीही. मी पुन्हा विचारितों कीं, त्यांच्या त्या विनंतीअर्जाला आपण काय उत्तर दिलें असतें! तुह्मांला दिलेल्या अभिवचनांचा भंग करण्यास आह्मी तयार झालों आहों; आणि तो कशासाठीं, तर ज्या राष्ट्राकडून तुह्मांस धोक्याचा संभव, त्याच्याचकडून कांहीं मोबदला मिळाल्यामुळें; असें कबूल करणें आह्मांस भाग झालें असतें. बेलजमच्या राजेसाहेबांनीं आपणांस एक विनंती केली असून तिच्यामुळें आपल्या अंतःकरणास पाझर फुटल्याशिवाय राहाणार नाहीं. त्यांची ही विनंती आपण थोड्याच वेळापूर्वीं वाचिली असून एकंदर देशानेंही वाचिली आहे; हें निर्विवाद आहे. ती विनंती वाचून ज्याचें मन द्रवणार नाहीं, त्याला काय ह्मणावें हेंच मला कळत नाहीं. बेलजम लोक लढत असून त्यांची प्राणहानि सुरू आहे.

जर्मन चान्सेलर ह्यांची ती "अपमानकारक सूचना" आपण मान्य केली असती तर हा प्रकार सुरू असतां आज ग्रेट ब्रिटनची स्थिति कशी काय झाली असती! खरेंच, आपल्या मित्रांना फसवून आपल्या कर्तव्यास हरताळ लाविल्यानें आपणांस जर्मनीकडून काय मोबदला मिळणार होता बरें? फक्त "वचन" —जास्त कांहीं एक नाहीं. कांहीं विशिष्ट परिणाम घडून आल्यास जर्मनी काय धोरण ठेवील, एवढ्यापुरतेंच तें वचन. तसेंच हेंही लक्षांत ठेवण्यासारखें आहे कीं, हें वचन जें राष्ट्र देत होतें, तेंच राष्ट्र त्याचक्षणीं आपण केलेला तह मोडण्याविषयीं जाहीर करीत होतें व आपणांसही तसें करण्याविषयीं आव्हान करित होतें! हा प्रकार आपणांस सांगण्यास मला खेद होत आहे; परंतु हें सर्व नमूद झालें पाहिजे. मी फक्त इतकेंच ह्मणतों कीं, आपण उडवाउडवी चालविली असती, किंवा वेळ पडेल तसे वागलों असतों, तर इंग्रज सरकारच्या नांवास कालिमा लागला असता. शिवाय आपल्या देशाच्या हितसंबंधाबद्दल जबाबदारी आपणांवर असल्यामुळें ते हितसंबंध आपणच तोडल्याप्रमाणें झालें असतें. माझे सन्मान्य मित्र सर एडवर्ड ग्रे ह्यांनीं जर्मनीस जें उत्तर दिलें, त्याबद्दल मला आनंद वाटतो व सर्व देशासही तसाच वाटेल; असा मला भरंवसा आहे. त्या उत्तराचा आपण आतां विचार करूं. त्यांतील ठळक ठळक दोन वाक्यें मी आतां आपणांस वाचून दाखवितों. ह्या प्रकरणासंबंधीं * व्हाइट पेपर्समध्यें ह्या उत्तराचा अनुक्रम नंबर १०१ असून सात आठ दिवसांपूर्वीं ब्रिटिश सरकारचें धोरण कसें काय होतें तें त्यांत नमूद केलेलें आहे. ब्रिटिश जनतेचें धोरणही असेंच असेल, असा मला भरवसा वाटतो. माझे मित्र लिहितात :—

"अशा प्रकारच्या अटी मान्य करून ब्रिटिश सरकारनें तटस्थ राहावें, ही चान्सेलर ह्यांची सूचना ब्रिटिश सरकारास क्षणभरही मान्य नाहीं. उघडपणें बोलावयाचें म्हणजे चान्सेलर ह्यांच्या मतें आम्हीं तटस्थ राहावें; आणि इकडे जर्मनीनें फ्रेंचांच्या वसाहती घेऊन फ्रान्सला चीत करावें. निर्बंध एवढाच कीं, वसाहतींशिवाय जो प्रत्यक्ष फ्रान्स देश राहिला, त्यांतील मुलूख जर्मनीनें खालसा करावयाचा नाहीं. व्यावहारिक-दृष्ट्या विचार केला असतां अशा प्रकारची सूचना मान्य होण्याजोगी नव्हतीच. कारण खुद्द फ्रान्स देशापैकीं यूरोपांत कोणताही मुलख जर्मनीनें खालसा केला नाहीं, तरी देखील जर्मनीला फ्रान्सला इतकें जमीनदोस्त करितां येईल कीं, तेणेंकरून फ्रान्स हें

* पार्लमेंट सभेनें प्रसिद्ध केलेल्या पत्रकांस "व्हाइट-पेपर" म्हणतात.

इतःपर मोठें राष्ट्र न राहातां त्याला जर्मनीच्या ताटाखालचें मांजर व्हावें लागलें असतें."

सर एडवर्ड ग्रे ह्यांची भाषा नेहमींच भारी नेमस्त असते; आणि ह्या प्रसंगींही त्यांनीं तशीच वापरली आहे. हा व्यावहारिकदृष्ट्या विचार झाला. पण ते पुढें लिहितात :—

" हा सर्व भाग बाजूला ठेविला तरी फ्रान्सला चट्टा लावून जर्मनीशीं अशा प्रकारें करारमदार ठरविणें आम्हांस लाजिरवाणें होय; व अशा रीतीनें इंग्लंडच्या नांवास एकदां कलंक लागला असतां त्याचा पूर्ववत् लौकिक पुनरपि होणें नाहीं. तसेंच बेलजमच्या तटस्थवृत्तीसंबंधानें इंग्लंडचें अवश्य कर्तव्य अथवा हितसंबंध ह्यांचाही आम्हीं अशा प्रकारें क्रयविक्रय मांडावा, असें चान्सलेर ह्यांचें उघडपणें मत दिसतें. पण बेलजमसंबंधाचेंही ह्मणणें आम्हांस मान्य करितां येत नाहीं.

सर एडवर्ड ग्रे पुढें ह्मणतात :—

" वेळोवेळीं जशी परिस्थिति असेल तिला अनुरूप वागण्यास आम्ही सिद्ध असलें पाहिजे."

शेवटीं त्यांनीं बर्लिन येथील ब्रिटिश वकिलांस कांहीं मजकूर लिहिला असून तो आपणांसही संमत होईल, असें मला वाटतें. तो असा :—

" तुम्ही चान्सेलर यांस अत्यंत कळकळीनें आणखी असें कळवा कीं, इंग्लंड व जर्मनी ह्यांमधलि सलोखा चिरस्थायी ठेवण्याला एक मार्ग असा आहे कीं, यूरोपची शांतता कायम राखण्याचा प्रयत्न ह्या दोन्ही राष्ट्रांनीं एकमतें सुरू ठेवावा. ········ हा उद्देश सिद्धीस जाण्यासाठीं इंग्रज सरकार त्या धोरणानें अत्यंत मनोभावानें व सदिच्छेनें प्रयत्न करील.

" यूरोपमधील शांतता कायम राखितां येऊन हल्लींच्या आणीबाणीच्या प्रसंगांतून सुरक्षितपणें बाहेर पडतां येईल, तर पुढें एकादी कांहीं तरी तजवीज जुळवून आणण्यासाठीं मी स्वतः प्रयत्न करणार आहें; व ह्या तजविजींत जर्मनीलाही सामील होतां येणार आहे. ह्या तजविजीच्या योगानें जर्मनीला असें अभिवचन आम्हांला देतां येईल कीं, त्याच्या किंवा त्याच्याशीं मित्रत्वानें असणाऱ्या राष्ट्रांविरुद्ध कोणत्याही प्रकारचें अरेरावीचें किंवा शत्रुत्वाचें राजधोरण फ्रान्स, रशिया व आम्ही एकमतानें ह्मणा वा पृथक् पृथक् ह्मणा,

स्वीकारणार नाहीं. अशा प्रकारची तजवीज जुळवून आणण्याची माझी इच्छा आहे; व गेल्या बाल्कन युद्धाच्या आणीबाणीच्या प्रसंगीं मी त्या दिशेनें शक्य तितका प्रयत्नही केला आहे. (सर एडवर्ड ग्रे यांचें हें ह्मणणें अगदीं अक्षरशः खरें होतें.) तसेंच जर्मनीचाही हेतु तेव्हां तशाच प्रकारचा असल्यामुळें आमचा स्नेहसंबंध बराच दृढ झाला. अशा प्रकारची तजवीज काढणें हें हा काळपर्यंत फारसें शक्य कोटींतलें मानलें जात नसे. ह्यामुळें ह्या संबंधानें ठाम सूचना कोणीं केल्या नव्हत्या. सांप्रतसारखा बिकट प्रसंग यूरोपवर कित्येक पिढ्या आलेला नाहीं. तथापि ह्या प्रसंगांतून यूरोपची सुरक्षितपणें सुटका झाल्यास युद्धकालानंतर लोकांच्या दुःखाचा परिहार होण्यासाठीं व त्यांना पूर्वस्थिति प्राप्त करून देण्यासाठीं उलट दिशेनें प्रयत्न सुरू होतील; व तेणेंकरून ह्या राष्ट्रांत आजतागायत जडला नाहीं असा विशेष निकट स्नेहसंबंध जडून येईल; अशी मला आशा आहे."

तेव्हां ब्रिटिश सरकारचें ह्या प्रसंगीं धोरण कसें काय होतें, तें सर एडवर्ड ग्रे ह्यांच्या वरील पत्रावरून स्पष्टपणें दिसून येतें. त्या पत्राचीही भाषा नेमस्त आहे खरी, पण खातरी पटवणारी आहे, असें माझें मत आहे. तें पत्र लिहिण्यांत त्यांचा मूळचा हेतु शुद्ध प्रामाणिकपणाचा असून कळकळीचा होता, हें जो कोणी तें वाचील, त्याच्या ध्यानांत आल्यावांचून राहील काय ? ब्रिटिश सरकारला जर्मन चान्सेलर ह्यांनीं केलेल्या सूचना विलक्षण चीड उत्पन्न करणाऱ्या होत्या. त्यांना प्रायः उत्तर न देतां त्या केराच्या टोपलींत टाकण्याच्या योग्यतेच्या होत्या, असें मी समजतों. अशी स्थिति असतांही ब्रिटिश सरकारनें आपले परराष्ट्रीय मंत्री ह्यांच्यामार्फत युद्ध सुरू होण्याच्या अगदीं आदल्या घटकेपर्यंत शांतता राखण्यासाठीं नेटानें प्रयत्न केला, ह्याविषयीं सरळ रीतीनें पाहिलें असतां कोणासतरी शंका येईल काय ? आतां तो प्रयत्न दुर्दैवानें निष्फळ झाला ही गोष्ट अलाहिदा. "यूरोपच्या शांततेचे प्रस्थापक" अशा आशयाची पदवी सर एडवर्ड ग्रे ह्यांना पूर्वींच मिळाली होती; व ह्या पदवीला त्यांच्याहून लायक गृहस्थ कधींही झाले नाहींत. असो, हल्लीं मी बोलत आहें तें कोणत्याही एका पक्षाच्या वतीनें नव्हे; तर एकंदर देशाच्या वतीनें आहे. तेव्हां सर्व देशाच्या वतीनें मला असें म्हणण्याचा अधिकार पोहोंचतो कीं, कोणत्याही सरकारास शांततेसाठीं जो जो प्रयत्न करितां आला असता तो तो आम्हीं केला. तरी पण अखेरीस आम्हांस हें युद्ध करणें भाग पडलेंच. आह्मांला कशासाठीं बरें लढावें लागत आहे ! युद्ध

म्हटलें म्हणजे त्यापासून सांपत्तिक, सामाजिक, व्यक्तिविषयक आणि राजकीय बाबतींत अतोनात हानि व्हावयाचीच; आणि बलाढ्य राष्ट्रांतील युद्धापासून तर बेसुमार हानि व्हावयाची. ही गोष्ट प्रत्येकास माहीत आहे; पण खुद्द ब्रिटिश सरकारास जितकी माहीत आहे, तितकी कोणासही नसेल. हल्लींचा प्रसंग मोठा परीक्षेचा आहे. गेल्या शंभर वर्षांत कोणत्याही मुत्सद्दीमंडळावर इतका दुर्धर प्रसंग आलेला नाहीं. तथापि युद्ध मुळें-मग तें युद्ध कितीका न्यायाचें असेना-अतोनात यातना उत्पन्न व्हावयाच्याच; व ह्या यातना कॉमन्स सभेंतील आपणा प्रत्येक सभासदाच्या डोळ्यासमोर ह्या परीक्षेच्या काळांत सतत मूर्तिमंत उभ्या आहेत. तसेंच ह्या यातना हल्लींच्या पिढीलाच भोगाव्या लागणार असें नसून भावी पिढ्यांनाही भोगाव्या लागणार आहेत; व यूरोपच्या एकंदर सुधारणेस त्यांमुळें धोका पोहोंचणार आहे. आम्हीं जेव्हां जेव्हां एकादी तजवीज योजिली, तेव्हां तेव्हां हा सर्व प्रकार आमच्या नजरेसमोर होता; व आम्हीं आमच्यावरील जबाबदारी पूर्णपणें ओळखूनच प्रत्येक पाऊल टाकिलें आहे. ह्या जबाबदारीचें वर्णन करणेंही अशक्य आहे. शांतता राखण्यासाठीं केलेले आमचे सर्व प्रयत्न दुर्दैवेंकरून व्यर्थ होऊन एकंदर प्रकरणाचा अखेर निकाल युद्ध होऊनच लागण्याचें ठरल्यास शेवटीं परिणाम काय होईल ह्याचें ज्ञान आम्हांस पूर्णपणें असून त्याची आमच्या मनाला पक्कीच जाणीव आहे. तथापि युद्ध हेंच आपलें कर्तव्य व त्यांतच आपल्या देशाचें हित, असें आम्हांस वाटलें. परंतु आम्हीं आपली तरवार म्यानांतून काढीत आहों ती सत्य पक्षाच्या समर्थनार्थ काढीत आहों अशी आमचीच नव्हे, तर देशांतील सर्व लोकांचीही समजूत आहे, अशी माझी खातरी आहे, एवढें मी आपणांस पक्कें सांगतों.

तुम्ही कशासाठीं युद्ध करीत आहां असा प्रश्न मला कोणीं केल्यास त्याचें उत्तर देण्यास मला फारसा पाल्हाळ करावा लागणार नाहीं. पहिली गोष्ट अशी कीं, राष्ट्राराष्ट्रांसंबंधीं एक महत्त्वाचें कर्तव्य बजाविण्यासाठीं आम्हीं लढत आहों. आपल्या नेहमींच्या खाजगी व्यवहारांत अशा प्रकारचें कर्तव्य कोणीं माणसानें पतकरून नंतर त्यानें तें बजाविलें नाहीं, तर त्याजकडून कायद्याच्या दृष्टीनें गुन्हा घडेल. इतकेंच नाहीं, तर त्याचा नांवलौकीकही जाईल; व ज्याला ज्याला म्हणून स्वाभिमान असेल तो मनुष्य अशा कर्तव्याला बहुधा धाब्यावर बसवणार नाहीं. दुसरी गोष्ट माझ्या मतें अशी कीं, आम्ही एका तत्त्वाची सत्यता प्रस्थापित करण्यासाठीं लढत आहों. तें तत्त्व हेंच कीं,

हल्लींच्या मनूंत मनुष्यजातीच्या प्रगतीसाठीं प्रयत्न होत असतां केव्हां केव्हां 'बळी तो कान पिळी' ह्या ह्मणीचा प्रभाव बराच दिसून येतो. तेव्हां अशा वेळीं राष्ट्राराष्ट्रांतील सचोटीच्या वर्तनाला धाब्यावर बसवून बारीकसारीक राष्ट्रांना एकाद्या जबरदस्त बलाढ्य झालेल्या राष्ट्रानें अरेरावीनें जमीनदोस्त करणें कधींही रास्त नाहीं. आम्ही सांप्रतच्या युद्धांत शिरलों आहों; व इतिहासांत ह्याहून मोठें युद्ध कधींही यावयाचें नाहीं. तथापि आमचें अंतःकरण आम्हांस मुळींच खात नसून आमची पक्की खातरी आहे कीं, आम्ही कांहीं इतर राष्ट्रांची कुरापत काढण्यासाठीं लढत नाहीं; किंवा आप्पलपोटेपणानें आपलाच तळिराम गार करण्यासाठीं लढत नाहीं. तर कित्येक तत्त्वांची पायमल्ली होऊं नये ह्मणून आम्ही लढत आहों; कारण हीं तत्त्वें अबाधित राखणें जगाच्या सुधारणेस अत्यंत अवश्य आहे, शिवाय आम्ही करीत आहों हें शहाणपणाचें व न्यायाचें आहे; इतकेंच नाहीं; तर ह्या महत्त्वाच्या तत्त्वांचा निर्णय लावून घेण्यासाठीं प्रयत्न करणें हें आपलें कर्तव्यच आहे; अशीही आमची पूर्ण खातरी आहे; व ह्मणूनच आम्ही ह्या युद्धांत पडत आहों. तेव्हां ह्या युद्धांत ह्या संयुक्त राज्याचें (इंग्लंड, स्काटलंड व आयर्लंड ह्यांचें) एकंदर सामर्थ्य आपण खर्चीं घातलें पाहिजे. एवढेंच नाहीं, तर ज्या अफाट साम्राज्याचें हें राज्य केंद्रस्थानीं आहे, त्याचेंही सामर्थ्य खर्चीं घातलें पाहिजे. हा हेतु यथास्थितपणें तडीस जावा, ह्मणूनच आपल्यापाशीं मी विशेष प्रकारची मागणी करीत आहें. ती एवढीच कीं, आपण सरकारला १० कोट पौंड युद्धासाठीं कर्ज काढण्याची मंजुरी द्यावी. अशा प्रकारची मंजुरी ह्मणजे काय व पुरवणी बजेटें ह्मणजे काय; तसेंच ह्यासंबंधीं विशेष गोष्टी व ह्यांतील सूक्ष्म भेद, ह्यांची अगदीं कायदेशीर हकीकत तुह्मांला मी सांगत बसत नाहीं; व तुमचीही ती ऐकण्याची इच्छा नसेल. ह्या विषयाचा विचार हल्लीं ह्याहून अधिक महत्त्वाच्या दृष्टीनें केला पाहिजे. आम्ही जो मार्ग स्वीकारणार आहों त्याचें समर्थन निवळ फडणिशीच्या तत्त्वावर जरूर पडल्यास मला करतां येईल; तथापि मी तसें करीत नाहीं. कारण तुमच्या स्वभावाला व मनोवृत्तीला तें फारसें आवडेल असें मला वाटत नाहीं तथापि एका गोष्टीकडे लक्ष देण्याविषयीं मी आपणांस अवश्य सांगतों. ती कोणती ह्मणाल तर ह्या खर्ड्याच्या मसुद्याचें नांव व त्याचा मथळा. आजपर्यंत अशा प्रकारें पैशाची मंजुरी सामान्यत्वें आरमारी व लष्करी हालचालीकरितांच करण्यांत येत असे. तथापि ह्या प्रकरणीं आमच्यावर

विश्वास ठेवून अशा प्रकारच्या मंजुरीची पूर्वापार चालत आलेली मर्यादा तुम्हीं वाढवावी, असें आमचें तुम्हांपाशीं मागणें आहे. तुम्हीं आमचें मागणें मान्य केल्यास तुह्मांपाशीं आम्ही हल्लीं जो हा पैसा मागत आहों, तो केवळ आरमाराच्या व लष्कराच्या खर्चाकडेच लाविला पाहिजे, असा निर्बंध राहाणार नाहीं; तर अन्नसामग्री वाढविणें, नुकसान भरपाई वगैरेच्या बाबतींत विमाच्या योगानें ह्मणा किंवा तोच्यावी हमी घेऊन ह्मणा, उदीमव्यापार, कारखाने, उद्योगधंदे व दळणवळणावें मार्ग सुरू राहाण्यास मदत देणें; व युद्ध सुरू असल्यामुळें सामान्यतः लागणारे इतर खर्च ह्यांकडेही त्या पैशाचा उपयोग आम्हांस करितां येईल. ह्या सर्व प्रकारच्या खर्चाचा समावेश होईल अशा धोरणानें हल्लींच्या खर्चाची मजुरी विस्तृत प्रमाणावर देणें योग्य आहे; असें आमच्याप्रमाणें आपलेंही मत पडेल; असा मला भरंवसा आहे. अशी मंजुरी दिल्यानें सरकारचे हातपाय बांधले जाणार नाहींत. जमाबंदी खात्याकडून ह्या पैशाच्या खर्चाचा हिशेब दिला जाईल, हें उघड आहे. शिवाय जो जो खर्च होईल त्याला त्याला कॉमन्स सभेची मंजुरात अवश्य लागेल. युरोपांतील प्रमुख राष्ट्रांत सुरू झालेल्या ह्या युद्धांत अनेक प्रकारचे निरनिराळे खर्च सुरू होऊन ते वाढतही जाणार. तेव्हां ह्या विलक्षण आणीबाणीच्या प्रसंगीं हा सर्व खर्च करण्याची सत्ता आमच्या हातीं ठेविली नाहीं तर ती मोठ्या दिलगिरीची गोष्ट होय फार काय, तेणेंकरून मोठेंच अरिष्ट ओढवेल, असें मला वाटतें. मागील काळांतील युद्धांची स्थिति इतकी बिकट नसे ह्यामुळें तेव्हांपेक्षां अशा प्रकारच्या खर्चाची तरतूद आतां करून ठेवणें हल्लीं विशेषच जरूर झालेलें आहे.

आज सकाळपर्यंत मजकडे युद्धखात्यासंबंधीं प्रधानाचेंही काम होतें. तेव्हां त्या नात्यानें आपल्या फौजेंत जादा भरती करण्यासाठीं पुरवणी बजेटालाही मी मंजुरी मागत आहें. मी ह्या खात्याचें काम ज्या स्थितींत अंगावर घेतलें; तिजबद्दल पुनरपि उल्लेख करण्याची मला जरूरी नाहीं. कारण ती सर्व स्थिति प्रत्येकाच्या मनांत अगदीं ताजी आहे. ह्या संबंधानें व्यक्तिविषयक थोडासा खुलासा करण्याचो आपण मला थोडीशी परवानगी द्यावी. तो खुलासा इतकाच कीं, सैन्याची स्थिति असमाधानकारक असून आपणां सर्वांस तिजबद्दल खेद वाटत होता. तेव्हां ती स्थिति त्वरित नाहींशी करून सैन्यासंबंधानें पुन्हा पूर्ण विश्वास उत्पन्न करावा; एवढीच आशा बाळगून ती सफळ होण्यासाठीं मी युद्धखात्यासंबंधीं मंत्र्याचें काम

स्वतःकडे घेतलें. तेव्हां वस्तुस्थिति अशी होती, असें मला वाटतें—फार काय ती तशी होतीच, अशी माझी खात्री आहे. आपल्या ब्रिटिश सैन्याहून विशेष राजनिष्ठ व विशेष एकदिलानें काम करणारें सैन्य आढळावयाचें नाहीं. हिम्मत व शिस्त तर ह्या सैन्याच्या हाडींमासींच खिळली असून या गुणांचें कौतुक ब्रिटिश सैन्याइतकें इतर कोणत्याही सैन्यांत होत नसेल. ह्मणून युद्धमंत्र्याचें काम आपल्याकडे चालू ठेवण्यांत मला आनंदच वाटला असता; आणि नेहमींच्या परिस्थितींत मीं तसें केलेंही असतें. तथापि हल्लींसारख्या मोठ्या युद्ध या प्रसंगीं तसें करणें सैन्याच्या दृष्टीनें योग्य नसून तसें केल्यास देशाच्या दृष्टीनें मीं अन्याय केल्याप्रमाणें होईल. कारण अशा प्रसंगीं कोणत्याही मंत्र्यानें आपलें लक्ष दुहेरी, ह्मणजे युद्धखात्याकडे व आणखी एकाद्या खात्याकडे ठेवणें योग्य नव्हे. तशांत राज्यांतील मुख्य प्रधानानें तर असें करणें अगदींच गैर; कारण त्याला इतर सर्व खात्यांतील कामकाजावर नजर ठेवावयाची असून प्रधानमंडळाच्या एकंदर धोरणाची जबाबदारी अखेर त्याजवरच असते. तेव्हा मुख्य प्रधानानेंच युद्धखात्याच्या कामकाजाकडेही लक्ष दिलें, तर तें अर्थात् चालढकलीचेंच असणार. ह्यामुळेंच मी तें काम सोडिलें आहे. मी खालीं केलेली जागा माझ्या विनंतीवरून लॉर्ड किचनर ह्यांनीं भरून काढिली, हें सांगण्यास मला फार आनंद वाटतो. किचनर साहेब हे प्रख्यात योद्धे असून सैन्याच्या व्यवस्थेचेंही काम उत्तम करणारे आहेत. तसेंच सार्वजनिक कामातील त्यांचा हिय्या व देशाभिमानही आपणा प्रत्येकास अवश्य वाटतो तसा फार मोठा आहे. ते कांहीं राजकारणी पुरुष नाहींत; हें प्रत्येकास माहीतच आहे मंत्रिसभेंत काम करून सरकारास मदत करण्यास त्यांची साप्रत योजना झाली आहे. तथापि ह्यावरून ते ह्मणजे एका विवक्षित राजकीय मताचे पुरस्कर्ते आहेत, असें मात्र कोणी समजूं नये. देशावर मोठाच प्रसंग गुदरला आहे; अशा वेळीं ते महत्त्वाच्या सार्वजनिक कर्तव्याला जागले. तसेंच कोणत्याही मंत्र्याला आजपर्यंत अति दगदगीचें जें काम पडलें असेल, तसलेंच काम आज त्यांना करावयाचें आहे. तेव्हा ही कामगिरी त्यांजकडून होत असतां सर्व पक्षांचे लोक व सर्व मतांचे लोक त्यांजवर पूर्ण विश्वास टाकतील, असा मला भरंवसा आहे.

सैन्यांत जास्त भरती करण्याविषयीं आपण पूर्वी मंजुरी दिलीच आहे. पण लार्ड किचनर ह्यांच्या वतीनें मी सर्व प्रकारचे मिळून आणखी पांच लाख भरती करण्याचा अधिकार आपणापाशीं मागत आहें. ह्या गोष्टीस

आपण मंजुरी द्याल, अशी माझी खातरी आहे. कारण हल्लींचा प्रसंग बिकट असून त्याला तोंड देण्यासाठीं अशा मंजुरीची अवश्यकता आहे, एवढ्याच कारणानें ही मंजुरात मागण्यास आह्मांला उत्तेजन आलें आहे, असें नाहीं. दुसऱ्याही कारणानें आलें आहे. तें कारण असें:—ह्या प्रसंगीं हिंदुस्तान देश सैन्याचे दोन *डिव्हिजन पाठविण्यास तर नक्कीच तयार आहे; आपण मागणी केली नसतांही केवळ आपखुषीनें आपल्या प्रत्येक स्वसत्ताक संस्थानिकाकडून आपणांस आधींच पराकाष्ठेची मदत झाली आहे; मग ती द्रव्यद्वारा असो वा सैन्याच्या रूपानें असो. सारांश, साम्राज्यावरील प्रसंगाच्या घटकेस त्याला देतां येण्यासारखी सर्व मदत सर्वांनीं दिलेली आहे. तेव्हां ह्या गोष्टीची जाणीव आह्मांस असल्यामुळेंही येथें सैन्यांत भरती करण्यास मंजुरी मागण्यास आह्मांस उत्तेजन येत आहे. महाराज, लांबलांबच्या मुलांबाळांनीं मातृप्रेमानें देऊं केलेल्या देणग्यांचा आईनें कृतज्ञता बुद्धीनें व प्रेमपुरःसर स्वीकार करतांना तिनेंही आधीं तशा प्रकारचें उदाहरण घालून दिलें पाहिजे.

सद्गृहस्थहो, मला जास्त कांहीं सांगणें नाहीं. वादग्रस्त विषयांची चर्चा करण्याचा हा प्रसंग नव्हे. माझ्या एकंदर भाषणांत सत्यापरतें यत्किंचितही मी बोललों नाहीं, असें मला वाटतें. मग तें भाषण आपला पक्ष कशा प्रकारचा आहे त्यासंबंधीं असो, वा आपणांस कसकशी तयारी केली पाहिजे ह्यासंबंधी सामान्यत्वें असो. लोकांच्या मनोवृत्ति प्रक्षुब्ध करण्याचा, मोठें अलंकारिक व्याख्यान देण्यांत मौज मानण्याचा आणि राष्ट्राराष्ट्रांमध्यें वैमनस्य उत्पन्न करण्याचा माझा हेतु नाहीं; कोणत्याही देशाभिमानी माणसाचा नसला पाहिजे. प्रसंग तर इतका बिकट आहे कीं, तसल्या गोष्टींकडे लक्ष देणेंच योग्य नाहीं. आह्मांस एक महत्त्वाचें कर्तव्य बजावावयाचें आहे; देशबंधूंनीं टाकिलेल्या विश्वासास आह्मी पात्र आहों असें सिद्ध करावयाचें आहे, आणि पार्लमेंटचे सभासद व एकंदर जनता आह्मांस हें सर्व करण्यास समर्थ करील, असा आह्मांला पूर्ण भरंवसा आहे.

---

* सैन्याच्या किंवा आरमाराच्या ज्या विभागावर जनरल मुख्य असतो, त्याला डिव्हिजन ह्मणतात. एका डिव्हिजनमध्यें सुमारें २५।३० हजार सैन्य असतें.

## तारीख २७ आगस्ट १९१४ रोजीं कॉमन्स सभेंत केलेलें भाषण.

सद्गृहस्थहो, मी पुढील ठराव आपणांस सुचवीत आहें:—“आपण नम्रतापूर्वक बादशाहांना एक विनंतीअर्ज सादर करावा. बेलजमच्या राजेसाहेबांच्या मुलखावर निष्कारण हल्ला झाला असतां त्यांच्या सैन्यानें व इतर लोकांनीं शत्रुसैन्याला मोठ्या शौर्यानें प्रतिबंध केला; त्याजबद्दल ह्या कॉमन्स सभेस मोठी सहानुभूति वाटत असून मोठें कौतुक वाटत आहे; असें बेलजमच्या राजेसाहेबांस कळविण्याविषयीं सदहू अर्जांत आपण आपल्या बादशाहांस प्रार्थना करावीः तसेंच आपल्या स्वतःच्या स्वातंत्र्याच्या व यूरोपच्या सार्वजनिक कायद्याच्या संरक्षणार्थ बेलजमकडून जे जे प्रयत्न होतील, त्यांना हरएक प्रकारें दुजोरा देण्याचा इंग्लंडचा कृतनिश्चय आहे, असेंही अभिवचन आपल्या बादशाहांनीं बेलजमच्या राजेसाहेबांस द्यावें.”

हा अर्ज सभेनें मंजूर करावा म्हणून फारसें भाषण करण्याची मुळींच जरूर नाहीं. ह्या अर्जाचा मसुदा अध्यक्षमहाराज लौकरच आपणांस वाचून दाखवितील. एका तंट्यामुळें हें युद्ध उपस्थित झालें असून त्या तंट्याशीं आपल्या देशाचा साक्षात् कोणत्याही प्रकारचा संबंध नाहीं. पण ह्या युद्धामुळें एकंदर यूरोप खंडाच्या व्यवस्थेचा पाया डळमळूं लागला आहे. युद्ध टळावें ह्मणून, तसेंच तें टळणें अशक्य झालें तेव्हां निदान त्याचें क्षेत्र मर्यादित राहावें ह्मणून, आह्मीं भगीरथ प्रयत्न केला; तो आतां सर्वांस विदित झालाच आहे. ह्या युद्धांत आपण केव्हां पडलों व कां पडलों, हें स्पष्टपणें ध्यानांत आणणें अति महत्त्वाचें असून तो विचार ह्या ठरावाच्या प्रसंगीं करणेंच उचित होय; असें मला वाटतें. कायदेशीर रीतीनें दिलेलीं अभिवचनें पाळावयाचीं कीं मोडावयाचीं, आपण होऊन घेतलेली हमी पुरी करावयाची कीं ‘बळी तो कान पिळी’ ह्या तत्त्वाच्या अंमलबजावणीस निर्लज्जपणें हातभार लावावयाचा; सारांश, ह्यांतील पसंत पडेल तो पंथ स्वीकारण्याचा प्रसंग येऊन ठेपला; तेव्हांच आह्मीं म्यानांतून तरवार काढिली आहे. आह्मीं जो निश्चय ठरविला त्याजबद्दल आह्मांस पश्चात्ताप होत नाहीं. वादाचा मुख्य मुद्दा अशा प्रकारचा होता कीं, कोणत्याही प्रबळ व स्वाभिमानी राष्ट्राला पुरतेपणीं निर्लज्ज बनल्याशिवाय तो बाजूला ठेवितां आला नसता. आतां आपला देश ह्मणजे स्वातंत्र्याचें केवळ आदिपीठ. तेव्हां ह्या देशांत

वादून येथील शिक्षा कागलेल्या आपणांस तर तो मुळींच बाजूला ठेविनां आला नसता. आपण दिलेलीं अभिवचनें स्पष्ट तऱ्हेचीं व उदात्त विचारांचीं असून तीं पाळणें आपणांस अवश्य होतें. एका लहानशा तटस्थ राष्ट्राच्या स्वातंत्र्यावर गदा येऊं लागली. तेव्हां त्याचें तें स्वातंत्र्य प्रस्थापित करून तें कायम राखणें आपणांस ह्या अभिवचनांमुळेंच प्राप्त झालें. राष्ट्र लहान असो वा मोठें असो; 'राष्ट्र' ही पदवी त्याला कायम राखणें असेल तर आपल्या देशाची मर्यादा कायम राखून आपला विशिष्ट प्रकारचा आयुष्यक्रमही कायम राखणें, हेंच अत्यंत हिताचें असून बाकीचे सर्व हितसंबंध गौण, असें त्या राष्ट्रानें मानिलें पाहिजे. आणि हेंच हित बेलजमला साधावयाचें होतें; इतर कांहींएक साधावयाचें नव्हतें.

अशा प्रकारें आपलें स्वातंत्र्य प्रस्थापित करून तें चिरकालिक करावयाचें, हें उदात्त तत्त्व अमलांत आणणें ह्मणजेच सुधारणेचा व भरभराटीचा उत्कर्ष समजावयाचा. तसेंच पुरातन काळांत अत्यंत बिकट प्रसंगीं हें तत्त्व अमलांत आणण्याचें कर्तव्य ज्या राष्ट्रांवर अनेकवार पडलें, तीं विस्तारानें व लोकसंख्येनें इतरांच्या मानानें बरींच लहान होतीं. तथापि तीं मोठीं धाडशी असून दृढनिश्चयी होतीं. अशीं राष्ट्रें ह्मटलीं ह्मणजे अथेन्स व स्पार्टा व स्वित्सरलंड मधील परगणे होत. तसेंच तीनशें शतकांपूर्वीं हालंडनेंही कांहीं कमी तरवार गाजविली नाहीं; असें आपणास इतिहासावरून दिसून येतें. तथापि गेल्या महिनापंधरा दिवसांत बेलजमच्या राजेसाहेबानीं व तेथील लोकानीं अशा प्रकारचें कर्तव्य स्पष्टपणें व मोठ्या छातीनें कबूल केलें आहे. तसेंच त्यानीं तें बजावण्यासाठीं परिश्रम करून मोठा पराक्रम दाखविला आहे. ह्या कामीं बेलजमइतकी कर्तव्यदक्षता आजपर्यंत इतर कोणत्याही राष्ट्रानें दाखविली नसेल; असे प्रतिपादण्याचें धाडस मी करितों. शत्रुसैन्याची धाड, त्यांच्यावडून होणारी नासाडी, लूटालूट व बळजोरी ह्यामुळें प्राप्त झालेल्या भयंकर प्रसंगाला, असंख्य गोष्टी प्रतिकूल असतांही, त्यानीं न डगमगतां तोंड दिलें आहे. शत्रूचे सैन्य अफाट असून बेलजमसैन्याला तेव्हांच गडप करून टाकण्याइतकें होतें. असें तें सैन्य समुद्राच्या लाटाप्रमाणें देशांत घुसत असतां बेलजम सैन्यानें मोठ्या निग्रहानें त्याला आडवें होऊन त्याच्या प्रगतीस कायमचा प्रतिबंध केला. स्वातंत्र्यसंरक्षणार्थ आजपर्यंत अनेक राष्ट्रांनीं पराक्रम गाजविले असून त्यांचा इतिहास वाचून स्फुरण उत्पन्न होणारें आहे; व लीजच्या संरक्षणार्थ बेलजम लोकांनीं केलेला पराक्रम तशाच प्रकारचा आहे. स्वातंत्र्यासाठीं स्वास्थ्याला, सुसंघटित

स्थितीला, फार तर काय, प्रत्यक्ष प्राणालाही बळी देण्यास जे सिद्ध होतात, त्याची कीर्ति अजरामर होते. अशीच कीर्ति सांप्रत बेल्जम लोकांनी मिळविली आहे; दोस्त राष्ट्रांच्या जुटींत बेल्जम आल्यामुळें आमचा व त्यांचा स्नेहसंबंध दृढ होऊन आम्हांस त्यांच्याबद्दल अभिमान वाटतो. म्हणून आम्ही मोठ्या आदरानें व सन्मानपूर्वक त्यांचें अभिनंदन करितों. चिमुकल्या राष्ट्राचें स्वातंत्र्य आणि राष्ट्राराष्ट्रांतील करारमदारांची पवित्रता, हीं दोन महत्कार्यें आहेत; आणि बेल्जम लोक सांप्रत ह्या कार्यासाठींच लढत आहेत. तेव्हां त्यांच्या बाजूनें व त्यांच्याच नेटानें आपण लढलों असतां त्यांना आपली मदत होऊन शिवाय वरील दोन महत्कार्यांनाही हातभार लावल्याप्रमाणें होईल. ह्यास्तव आम्ही मनापासून त्यांच्या बाजूस मिळालों आहों. तेव्हां ह्या संयुक्त राज्याच्या वतीनें व एकंदर साम्राज्याच्या वतीनें आम्ही बेल्जम लोकांस असें आश्वासन देतों कीं, ह्या युद्धांत आम्ही अखेरपर्यंत त्यांचे मनःपूर्वक पाठीराखे आहों. ह्या कामीं आमचेकडून काडीमात्र कसूर होणार नाहीं, असें त्यांनीं पक्कें समजावें; आणि हल्लीं जो विनंती-अर्ज मंजूर करण्याविषयीं मी सभेस सांगत आहें त्यांतही हेंच आश्वासन दिलेलें आहे.

---

## लंडन, डब्लिन व कार्डिफ एथील लॉर्ड मेयर* आणि एडिंबर्ग एथील लॉर्ड प्रॉव्हस्ट* ह्यांना तारीख २८ आगस्ट १९१४ रोजीं लिहिलेलें पत्र.

महाराज,

आजपर्यंत कधींही झालें नाहीं अशा महायुद्धांत सांप्रत आपण सर्व पडलों आहों. तेव्हां ह्या कामासाठीं लोकमत जागृत करून त्याला व्यवस्थित स्वरूप देण्यासाठीं, तसेंच एकंदर जनतेला ह्या कामीं प्रवृत्त करून त्यांजकडून व्यवस्थित प्रयत्न करविण्यासाठीं तुम्ही आम्ही एकोप्यानें प्रयत्न करण्याचा समय ठेपला आहे.

हें अत्यंत महत्कार्य घडवून आणण्यास ज्याला ह्मणून थोडाफार हातभार लावितां येईल, त्यानें ह्या प्रसंगीं स्तब्ध राहाणें रास्त होणार नाहीं.

ह्यासंबंधानें पहिली तजवीज मी अशी सुचवितों कीं, आपल्या ह्या संयुक्त राज्यांत सर्वत्र तावडतोब सभा भरवाव्या. ह्या सभा लोकवस्तीच्या व उद्योगधंद्याच्या दृष्टीनें मोठमोठीं मध्यवस्तीचीं शहरें असतील, तेथेंच भरवावयाच्या असें नाहीं. तर अशी सभा प्रत्येक टापूंत भरली पाहिजे; मग तो भाग शहराचा असो वा खेड्यापाड्याचा असो. आपला पक्ष किती न्यायाचा आहे तें अशा सभांतून स्पष्टपणें सांगून प्रत्येक माणसाला ह्या बाबतींत आपापलें कर्तव्य बजावण्यास भाग पाडिलें पाहिजे.

ज्या चार शहरांतील आपण चौघेजण प्रमुख अधिकारी आहां त्या शहरांनीं ह्या कामीं पुढाकार घ्यावा अशी सूचना मी करितों.

सरकारी कामकाज संभाळून मला सवड होईल त्या बेतानें आपणांस शक्य तितकी मदत देण्यास मी तयार आहें; व हा हेतु सिद्धीस जाण्यासाठीं आपल्या शहरांतील माझ्या देशबांधवांच्या सभेंत मी आनंदानें भाषण करीन.

राजकीय प्रश्नांसंबंधानें जे भिन्न भिन्न पक्ष आपल्या देशांत आहेत, त्यांतील प्रत्येक पक्षाचे पुढारी ह्या बाबतींत माझ्याशीं मिळूनमिसळून काम करितील, असें मानण्यास मला कांहीं हरकत दिसत नाहीं.

आपला,

**एच्. एच्. आस्किथ.**

---

* शहराच्या मुख्य म्याजिस्ट्रेटास किंवा म्युनिसिपालिटीच्या मुख्य अधिकाऱ्यास मेयर म्हणतात; तसेंच शहराच्या मुख्य माजिस्ट्रेटास प्रॉव्हस्ट म्हणतात. मेयर व प्रॉव्हस्ट हे बहुतांशीं सारखेच हुद्दे आहेत.

## तारीख ४ सप्टेंबर १९१४ रोजीं गिल्ड हॉलमध्यें झालेलें* भाषण.

लॉर्ड मेयर साहेब आणि लंडन शहरांतील नागरिकहो, आपल्यापुढें भाषण करण्याचा शेवटचा समय मला लाभला, त्याला आज साडेतीन वर्षें झालीं. तेव्हांचे मेयर हे त्या प्रसंगीं अध्यक्षस्थानीं होते. तेव्हां सभेंत सर्व मतांचे व पक्षांचे लोक जमलेले होते. इंग्लिश भाषा बोलणारीं जीं दोन मोठालीं राष्ट्रें आहेत, त्यांनीं तेव्हां एकमतानें एक ठराव केला होता; त्याजबद्दल पसंती दर्शविण्यासाठीं तेव्हांची ती सभा होती; व त्या सभेंत मोठा उल्हास दिसून आला होता. उभयतांत इतःपर बेबनाव उत्पन्न झाल्यास प्रथम त्याचा निर्णय एकोप्यानें लावावयाचा, पण तसा निकाल नच लागेल तर निदान पंचांमार्फत लावावयाचा; मात्र कांहीं झालें तरी ह्या कामीं युद्धप्रसंग आणावयाचा नाहीं; अशा आशयाचा तो ठराव होता. हे दोन देश कोणते म्हणाल तर इंग्लंड व युनायटेड स्टेट्स. आपणां उभयतांमध्यें हा जो महत्वाचा करार झाला, तो ह्या दोन्ही देशांच्या भावी उत्कर्षाचें मोठेंच चिन्ह होय; अशा प्रकारचें समाधान आपल्यापैकीं कित्येकांस तेव्हां वाटलें. तथापि ह्या करारामुळें युद्धांचें युग संपुष्टांत आलें, अशी त्यांना फारशी आशा वाटली नाहीं. परंतु हल्लीं जो भयंकर प्रसंग आपणांपुढें उभा आहे, तो प्राप्त होईल असाही आपणांस तेव्हां अंदाज झाला नाहीं. हल्लींच्या युद्धांतील सर्वच प्रकार कांहीं विलक्षण आहेत. युद्धांत गुंतलेल्या राष्ट्रांची संख्या व त्यांचें महत्व, त्यांच्या आरमारांचें व फौजांचें प्रमाण, युद्धक्षेत्राचा विस्तार, युद्धांत होत असलेला रक्तस्राव व प्राणहानि, युद्धांत सामील नसलेल्या इतर लोकांसही सोसावी लागणारी अपार विपत्ति आणि सुधारलेल्या राष्ट्रांतील लोकांचें विशेष महत्वाच्या बाबतींत द्रव्यदृष्ट्या व नीतिदृष्ट्या उत्तरोत्तर होत जाणारें अधिकाधिक नुकसान; ह्यांतील कोणत्याही गोष्टीसंबंधानें जगाच्या इतिहासांत सांप्रतच्या युद्धाच्या तोडीचें युद्ध सांपडणार नाहीं. शांततेप्रीत्यर्थ झालेल्या वरील करारमदारामुळें आपण तीन वर्षांपूर्वीं संतुष्ट झालों होतों; व तेव्हां आपण स्वीकारलेला पंथ रास्त आहे, असा आपला पक्का भरवसा होता.

---

*लंडन शहरांतील म्युनिसिपालिटीच्या सभेचा मुख्य दिवाणखाना आहे, त्याला गिल्ड हॉल म्हणतात.

आपला पंथ रास्त आहे असा आजही आपणांस तितकाच भरवसा आहे. हल्लीं आपण सांप्रतच्या ह्या युद्धांत मोठ्या नाखुषीनें पडलों असून आपल्या साम्राज्याचें एकंदर सामर्थ्य ह्यांत खर्ची पडत आहे. एवढा रक्तस्राव कशाकरितां? तर शिरजोरपणाचें प्रस्थ मोडून सत्याचाच विजय व्हावा ह्मणून. तंट्याचा निकाल आतां वादग्रस्त मुद्याची चर्चा करून लागावयाचा नाहीं, तर अन्य रीतीनेंच लागावयाचा. तथापि भ्याडपणानें ह्मणा, आपल्या हिताहिताचा बरोबर अंदाज न झाल्यामुळें ह्मणा, अथवा अब्रूची चाड व कर्तव्याची जाणीव नष्ट झाल्यामुळें ह्मणा; आपण नीचपणानें आपला शब्द राखिला नसता व आपल्या मित्रांशीं दगलबाजीनें वागलों असतों तर "राष्ट्र" ह्या दृष्टीनें आपली आज काय अवस्था झाली असती असें मी आपणांस विचारितों, व आपल्या द्वारें एकंदर जगासही विचारितों. सुधारलेल्या सर्व राष्ट्रांचें लक्ष ह्या घटकेस बेलजमकडे लागलें आहे; त्याचप्रमाणें आपलेंही लागलें असतें. बेलजम हें एक लहानसें राष्ट्र असून आपण तें कायम राखूं असें इतर राष्ट्रांनीं एकमतानें त्याला अभिवचन दिलेलें असून पृथक् पृथक्‌ही दिलेलें आहे. असें अभिवचन देणाऱ्या राष्ट्रांपैकीं दोन राष्ट्रांच्या आग्रहावरून व त्यांच्याच कृतीनें बेलजमच्या तटस्थवृत्तीचा भंग झाल्याचें व त्याच्या स्वातंत्र्याचा नायनाट झाल्याचें आपल्या नजरेस आलें असतें. तसेंच फ्रान्सनें कांहीं एक आगळीक केली नसतां त्याशीं युद्ध करण्यासाठीं अगदीं सुलभ व सोईचा रस्ता ह्या देशांतून काढिल्याचेंही आपल्या नजरेस आलें असतें. शत्रूचें अफाट व उद्दाम सैन्य आपला चुराडा करण्यास प्रवृत्त झालें असतां राष्ट्राच्या जीवित्वास अत्यंत अवश्यक जें आपलें स्वातंत्र्य, त्याच्या संरक्षणार्थ हें लहानसें निराश्रित राष्ट्र मोठ्या शौर्यानें लढत असतां आपणां ब्रिटिश लोकांस तें मुकाट्यानें पाहावें लागलें असतें; आणि आपणांस वाटणारी लाज जितकी कांहीं झाकतां येईल, तितकी झाकण्याचा प्रयत्न करावा लागला असता. लीजचा वेढा, लहानशा बेलजम फौजेनें अफाट जर्मन फौजेच्या चालीस मोठ्या [illegible]र्यानें व न डगमगतां केलेला प्रतिबंध, इतिहासप्रसिद्ध अशा ब्रुसेल्स शहरांत जर्मनांचा प्रवेश, बेलजन देशभक्तांची त्यांच्याच देशांतून हळू हळू अंटवर्पच्या तटबंदीपर्यंत पीछेहाट, बेलजम सैन्यानें सोसलेले असंख्य जुलूम; आणि निरपराध व युद्धांत सामील नसलेल्या अशा प्रजेपासून कुत्सितपणानें जर्मनीनें उकळलेला पैसा; हीं सर्व कृत्यें एखाद्या तिऱ्हाइताप्रमाणें थक्क होऊन आपणांस पाहावीं लागलीं असतीं. इतकेंच नाहीं; तर अखेरीस सुधारणेला व शिष्टतेला धाब्यावर बसवून जर्मन लोकांनीं केलेला सर्वांत मोठा गुन्हाही आपणांस पाहावा लागता. हा गुन्हा

कोणता ह्मणाल तर कोव्हेनची लुटालूट. त्या शहरच्या त्या इमारती, तेथील भव्य तसबिरी, अपूर्व ग्रंथसंग्रह, तेथील अपूर्व ऐतिहासिक संबंध; ह्या एकंदर सर्वांची जर्मन लोकांनीं निर्लज्जपणानें एकच राखरांगोळी उडविली; अशा प्रकारें कीं, तें नुकसान इतःपर कधींही भरून येणें शक्य नाहीं. हा सर्व प्रकार कशाकरितां ह्मणाल तर रानटी लोकांप्रमाणें अंध होऊन जाऊन बेलजम लोकांचा सूड उडविण्यासाठीं. असा शोचनीय प्रकार* तीस वर्षांच्या युद्धानंतर अलीकडे कधींच घडला नव्हता. हीं अन्यायाचीं असह्य कृत्यें आपण मुकाट्यानें सहन केलीं असतीं, त्यांचा प्रतिकार करण्यासाठीं, फार कशाला, त्यांबद्दल सूड उगविण्यासाठीं, आपण शक्य तो सर्व प्रयत्न केला नसता, तर आपल्या राष्ट्राचा सदसद्विवेक व स्वाभिमान हीं मावळल्याप्रमाणें झालीं असतीं; आणि ह्या बाबतींत सरकारास ह्मणा किंवा एकंदर ब्रिटिश लोकांस ह्मणा, तोंड वर करितां आलें नसतें. कायदा धाब्यावर बसवून 'बळी तो कान पिळी' ह्या तत्त्वाचा, किंवा स्वातंत्र्यास बाजूला सारून पशुवृत्तीचा अनिष्ट पगडा बसत असतां, आपण तें मुकाट्यानें पाहाणें ह्मणजे आपणही प्रत्यक्ष गुन्हा करण्यासारखें आहे. तेव्हां असें करण्यापेक्षां आपलें एकंदर राष्ट्रच इतिहासांत नामशेष झालेलें मला पुरवेल.

आपल्या कर्तव्याला व ब्रीदाला जागण्यासाठीं आपणांस ह्या युद्धांत पडावें लागलें आहे. ह्या युद्धाचें एका अंगाचें हें चित्र झालें. हें चित्र मोठें भयाण असून त्यावरून शत्रूच्या एकंदर कृत्यांचें स्वरूप ध्यानांत येणार आहे. बेलजमच्या तटस्थवृत्तीचा जर्मन लोकांनीं तिरस्कार-बुद्धीनें भंग केला. तथापि त्यांचें राजधोरण तेवढेंच नसून हा त्या धोरणाचा आरंभ किंवा केवळ ओनामा होता. यूरोपांतील एकंदर स्वतंत्र राष्ट्रांचें स्वातंत्र्य हिरावून त्यांची राजसत्ता नष्ट करावयाची, असा त्या राजधोरणाचा हेतु होता; मग तो कदाचित् आद्य हेतु नसून अंतिम असेल. प्रथम बेलजम, नंतर हालंड व स्विट्झरलंड अशा प्रकारें एकामागून एकाला आपल्या सत्तेखालीं आणावयाचें. आतां ह्या देशांचा विस्तार लहान असला तरी त्यांची बाकीची स्थिति आपल्यासारखीच आहे; ह्मणजे स्वातंत्र्याचें त्यांना बाळकडू असून तें त्यांच्या रक्तामांसांत बरेंच भिनलेलें आहे. जर्मन अध्यापकांनीं व इतर विद्वानांनीं नव्याच मताचा व नव्याच

* हें युद्ध प्रथमतः जर्मनींमधील क्याथलिक व प्रॉटेस्टन्ट ह्यांमध्यें सुरू झालें; व पुढें हळू हळू बहुतेक यूरोपखंड ह्यांत सामील झालें. युद्धास आरंभ इ. स. १६१८ त होऊन तें अर्थात् १६४८ त संपलें.

तत्त्वज्ञानाच्या जर्मन लोकांस उपदेश करून त्यांना हरएक प्रकारें उत्तेजन दिल्यामुळें त्यांना सर्व यूरोपांत वर्चस्व मिळविण्याची महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली. राष्ट्राच्या अस्तित्वाचें मुख्य जीवन किंवा त्याचा प्राणवायु ह्मटला ह्मणजे त्याची स्वतःची अप्रतिबंध रीतीनें व पूर्णपणें वाढ होऊं देणें होय. ही गोष्ट आपल्याला, समुद्रांपलीकडील आपल्या ताब्यांतील कानडा वगैरे राज्यांना, आणि अटलांटिक महासागरापलीकडील आपल्या जातभाईंना (युनायटेड स्टेट्सला) ज्याप्रमाणें लागू आहे, त्याचप्रमाणें त्या लहान लहान राष्ट्रांनाही लागू आहे. स्वतःची अप्रतिबंध वाढ होऊं देणें हा कित्येकांच्या कायद्यांत अत्यंत मोठाच गुन्हा; कारण इतरांवर जुलूम जबरदस्ती करणें हेंच त्यांचें मोठें दैवी तत्त्व. तेव्हां वर्षानुवर्षे स्वातंत्र्यसुखाचा अनुभव घेणारीं राष्ट्रें, तसेंच असें स्वातंत्र्य पुढें मागें मिळविण्याच्या रंगांत असलेलीं राष्ट्रें, ह्या उभयतांच्याही स्वातंत्र्याचा होम करण्यास ते लोक तयार आहेत. मी ही जी भाषा वापरीत आहें, ती जाणूनबुजूनच वापरीत आहें.

हें युद्ध कांहीं मोठ्याशा सांपत्तिक लाभासाठींच केवळ नाहीं; तर ह्यांत परमार्थाचाही संबंध आहे. ह्याच्या परिणामावरच पुढील आशेची उभारणी आहे. ही आशा पूर्ण झाली तरच लाखों माणसांची गुलामगिरींतून मुक्तता होऊन त्यांना विशेष स्वातंत्र्य मिळावयाचें आहे. तेव्हां पुढें मागें हें सर्व घडून येणें न येणें ह्या युद्धाच्या परिणामावर अवलंबून आहे.

आतां आपण घटकाभर यूरोपांतील प्रत्यक्ष स्थितीचा विचार करूं. आपली स्थिति काय आहे! गेलीं दहा वर्षे फ्रान्स व रशिया ह्या दोन राष्ट्रांशीं आपण स्नेहसंबंध ठेविला असून आपल्यांतील सलगी उत्तरोत्तर वाढत चालली आहे. परस्परांतील हितसंबंधाची व्यवस्था चांगली विचारपूर्वक मुत्सद्देगिरीनें लावण्यांत आपणांस यश आल्यामुळेंच अशी स्थिति घडून आली, असें मला वाटतें. वस्तुतः मागील काळांत जगाच्या निरनिराळ्या भागांत ह्या दोन राष्ट्रांशीं वितुष्ट येण्याचे प्रसंग आपणांस सतत येत असत; व प्रत्यक्ष युद्धाचेही प्रसंग वरचेवर येत असत. व्यवहारांत ह्मटलें ह्मणजे, कांहीं तुझें कांहीं माझें केल्याशिवाय भागत नाहीं. तेव्हां प्रथमतः ह्याच तत्त्वावर परस्परांमधील हितसंबंधाची उभारणी झाली; व पुढें पुढें सर्वांचे स्वभाव इतके जुळून गेले कीं, परस्परांविषयीं परस्परांना विश्वास उत्पन्न होऊन प्रेमभाव उत्पन्न झाला. तथापि ह्या हितसंबंधाचा उपयोग कोणत्याही काळीं कोण

त्याही अर्थानें इतर राष्ट्रांविरुद्ध करण्यांत आला नाहीं. ही गोष्ट मीं ह्याच सभास्थानीं अनेकवार प्रतिपादिली आहे.

हल्लींच्या मनूंत जगाचें अत्यंत हित कशांत असेल तर सर्वत्र चिरकाळ शांतता असण्यांतच आहे. ही शांतता राखण्यासाठीं माझे मित्र सर एडवर्ड ग्रे ह्यांनीं जिवापाड प्रयत्न केला असून त्यांत त्यांना यशही बरेंच आलें आहे. ह्या बाबतींत ह्यांच्या तोडीचें दुसरें उदाहरण इतिहासांत एकही सांपडावयाचें नाहीं. सर एडवर्ड ग्रे ह्यांच्या अमदानींतील ह्यांच्या राजधोरणामुळें यूरोपच्या एकोप्याकडे पूर्ण दुर्लक्ष झालें; इतकेंच नाहीं, तर त्यांचें धोरण त्या एकोप्याच्या-विरुद्ध असून त्यांनीं त्या एकोप्याला प्रतिबंध केला, अशा प्रकारची टीका कोठें कोठें ऐकूं येते. पण तींत तथ्य नाहीं; असें मी ह्मणतों. बाल्कन युद्धाची दगदग सुरू असतां मोठमोठ्या राष्ट्रांचे वकील ह्याच दिवाण-खान्यांत कित्येक आठवडे दररोज जमत होते, आपापसांतील मतभेद होईल तितका कमी करण्याचा प्रयत्न करीत होते, राष्ट्राराष्ट्रांच्या परस्पर-विरोधी महत्वाकांक्षा व उद्देश ह्यांचा मेळ जुळवून आणीत होते, आणि शेंकडों गोष्टी प्रतिकूळ असतांही सर्वांमध्यें सलोखा राखण्यासाठीं झटत होते. ह्या गोष्टीला वर्षावर फारसे दिवस लोटले नाहींत. थोड्या दिवसांपूर्वी आस्ट्रियानें सर्व्हियाला निकराचा खलिता पाठविला. तेव्हांही तशाच उमे-दीनें व तशाच हेतूनें आपल्या ह्या परराष्ट्रीय प्रधानांनीं पुन्हा मध्यस्थीची सूचना केली. तिचा आशय असा कीं, आस्ट्रियन युवराजाच्या खुनाशीं साक्षात् संबंध नसणाऱ्या चार राष्ट्रांनीं-जर्मनी, फ्रान्स, रशिया व ग्रेट ब्रिटन ह्यांनीं — मध्यस्थीसाठीं सभा भरवावी. त्यांची ती सूचना मान्य झाली असती तर प्रत्यक्ष तट्याचा निकाल कोणाच्याही नांवास कमीपणा न येतां लागला असता. ती सूचना अमान्य केल्याची, तसेंच युद्धामुळें एकंदर जगाला भोगाव्या लागणाऱ्या यमयातनांची जबाबदारी कोणाच्या बरें शिरावर येते ! अर्थात् केवळ एकाच राष्ट्राच्या; तें कोणतें ह्मणाल तर जर्मनी. एकंदर जगभर पेटलेल्या वणव्याचें उगमस्थान त्या राष्ट्रांत आहे. हल्लींच्या प्रसंगीं शांतता राखिली असतां व युद्ध केलें असतां कसकसे परिणाम घडतील, ते अजमावून पाहाण्याची जबाबदारी आपणांवर होती. अशी जबाबदारी प्रत्यक्ष आंगावर पडल्या-शिवाय तिचें महत्त्व कोणाच्याही ध्यानांत येण्यासारखें नाहीं. तथापि आह्मी अखेरपर्यंत शांततेसाठीं झटलों. त्या कामीं आम्हीं किती दृढनिश्चयानें, उत्साहानें व चिकाटीनें प्रयत्न केला, ह्याची कल्पना आमची आह्मालाच; इतरांस कोठून

होणार! आमच्या मुत्सद्दीपणाला जी जी ह्मणून युक्ती सुचली, ती ती आह्मीं अखेरपर्यंत योजिली; फार दिवसांचे स्नेहसंबंध तोडून टाकून दिलेलीं अभिवचनें मोडण्यापर्यंतही जवळ जवळ आपण मजल नेली. सारांश, युद्धाच्या घटकेपर्यंत आपण एकामागून एक प्रयत्न केले; व शेवटपर्यंत आशावादी राहिलों. शेवटीं, सरतेशेवटीं मात्र आपली पक्की खातरी झाली कीं, आपणांस कोणतातरी एक मार्ग स्वीकारल्याशिवाय गति नाहीं; मग तो अब्रूचा ह्मणा किंवा बेअब्रूचा ह्मणा; विश्वासघाताचा ह्मणा किंवा विश्वास राखण्याचा ह्मणा. सारांश, "राष्ट्र" ह्या संज्ञेस पात्र असणाऱ्या कोणत्याही राष्ट्राचें पाऊल कांहीं विवक्षित मर्यादेच्या आंत किंवा बाहेर पडेल त्या मानानें त्याचा उत्कर्ष किंवा अपकर्ष व्हावयाचा असतो; व त्या मर्यादेपर्यंत आमची मजल गेली तेव्हांच आम्हीं युद्ध जाहीर केलें.

ह्या सभास्थानीं, ह्या संयुक्त राज्यांत, फार कशाला, ज्या अफाट साम्राज्याच्या केंद्रस्थानीं व राजधानींत आपण आहों त्या साम्राज्यांत तरी असा एकादा प्राणी आहे काय कीं जो आपणांस ह्या कामीं दोष देईल, व आपण अखेर ठरविलेल्या निकालाबद्दल ज्याला पश्चात्ताप होईल! असा एकही माणूस असेलसें मला वाटत नाहीं. तर मग आपण ह्या कामासाठीं पाषाणहृदय बनलें पाहिजे; आणि नेपोलियनची सत्ता हाणून पाडण्यासाठीं आपल्या वाडवडिलांनीं जो उत्साह दाखविला, तशाच उत्साहानें आपण अखेरपर्यंत लढलें पाहिजे व लढूंही.

शत्रुसैन्याचा विस्तार, त्याचें युद्धकौशल्य आणि त्याची चिकाटी ह्यांचा आपण भलताच कमी अंदाज केला, तर आपणांकडून मोठीच चूक होईल. तथापि त्या सैन्यास प्रतिरोध करण्याचें ह्मणा, किंवा त्याजवर हल्ला करण्याचें ह्मणा, आपलें स्वतःचें सामर्थ्य आपण तुच्छ मानिलें तर तेंही तितकेंच वेडगळपणाचें होईल. राष्ट्र कितीही लहान असलें तरी तेथील लोकांच्या आंगांत देशाभिमानाचें वारें खेळून त्यांना स्फुरण चढलें असल्यास, त्यांच्याही हातून कसा पराक्रम होऊं शकतो, ह्याचें उदाहरण बेलजमनें आपणांस दाखविलेंच आहे. तें उदाहरण संस्मरणीय असून मोठें उत्कृष्ट आहे.

फ्रान्स व रशिया आपल्या बाजूस असल्यामुळें जगांतील दोन अति बलाढ्य राष्ट्रें आपल्या मदतीस आहेत; आणि त्यांचा व आपला कार्यभाग एकच आहे. तसेंच परस्परांपासून विभक्त होण्याची इच्छा कोणाचीच नाहीं. समुद्रावरील आपलें आरमार अत्यन्त बलाढ्य व अत्यन्त भव्य आहे; जगांत ह्या तोडीचें

आजपर्यंत कोणीं कधींही पाहिलें नसेल. मोहिमेवर जाण्यासाठीं आपली फौज किनाऱ्यावरून रवाना झाल्यास अद्यापि महिनाही झाला नाहीं. इतक्यांत तिनें रणभूमीवर मोठा प्रताप गाजविला आहे. ह्या फौजेची युद्धसामग्रीच वरिष्ठ प्रतीची आहे असें नाहीं; तर तिच्यांतील निरनिराळ्या तुकड्यांतील लोकांचें शारीरिक सामर्थ्य मोठें असून त्यांची नीतिही उत्कृष्ठ आहे. सारांश, हिच्याहून वरिष्ठ दर्ज्याची फौज आजपर्यंत झाली नसेल.

आतां आरमाराविषयीं ह्मणाल तर त्या खात्याचे प्रधान मि. चर्चिल हे आतां एथें आहेत; ह्याबद्दल आपणांस आनंद होत आहे. आरमारासंबंधानें आपणांस सुदैवानें जास्त कांहींच करावयाचें उरलेलें नाहीं; असें ते तुह्मांला सांगतील, अशी माझी खातरी आहे. आपल्या आरमाराचें वर्चस्व, मग तें त्याच्या कोणत्याही भागाचें किंवा कोणत्याही बाबतींतील असो, सर्वत्र सारखें दिसून येत आहे. तथापि त्याची निष्कारण खुशामत करण्यासाठीं कांहीं मी हें सांगत नाहीं. आपल्या देशावर स्वारी होण्याचा संभव दिसल्यास आपल्या किनाऱ्याचें संरक्षण त्याजकडून होईल; शत्रूचीं अवाढव्य लढाऊ जहाजें अपमानकारक रीतीनें त्याच्याच बंदरांत दडून बसलीं आहेत त्यांच्यावर तेथेंच तें शिक्कामोरतब करून टाकील; असा आपल्या आरमारासंबंधानें आपणांस पक्का भरवसा वाटतो. हीं शत्रूचीं जहाजें त्या लपलेल्या ठिकाणांतून मधून मधून हळूच चोरून बाहेर पडतात, व समुद्रांत प्राणघातक सुरुंगांचें जाळें पसरतात. पण त्या सुरुंगांपासून आपल्या आरमारापेक्षां तटस्थ राष्ट्रांच्या जहाजांचेंच जास्त नुकसान होत आहे. तेव्हां वर सांगितलेला सर्व कार्यभाग आपलें आरमार करीत आहेच. शिवाय जर्मन आरमाराशीं एकदां समोरासमोर दोन हात व्हावे, अशी त्याला भारी उत्कट इच्छा आहे. पण शत्रूनें शहाणपणानें असा प्रसंग अद्यापि येऊंच दिला नाहीं. आपल्या आरमाराकडून आणखीही पुष्कळ कार्य होत आहे. समुद्रांतील दळणवळणाच्या मार्गांवरील जर्मनीचीं व्यापारी जहाजें त्या आरमारानें हुडकून काढून पकडलीं आहेत. आपल्याला अन्नाचा पुरवठा करणाऱ्या देशांशीं असलेले दळणवळणाचे मार्ग त्यानें मोकळे राखून शत्रूचे मात्र संपुष्टांत आणले आहेत. लांबलांबच्या महासागरांतील मार्गांत उपद्रव देणारीं कांहीं थोडीं जर्मनीचीं लढाऊ जहाजें आहेत. त्यांचा फडशा उडवावयाचा आहे; व आपलें आरमार तो लवकरच उडवील. तसें झाल्यावर आपल्या साम्राज्यांतील प्रत्येक बंदरांत जाणाऱ्या येणाऱ्या आपल्या व इतर तटस्थ राष्ट्रांच्या व्यापारी गलबतांस

मुळींच धोका रहाणार नाहीं. नेहमींच्या शांततेच्या काळाप्रमाणेंच तीं निर्भय होतील. हीं निरनिराळया प्रकारचीं व जबाबदारीचीं कार्यें बजावीत असतां आपल्या देशासाठीं ज्या शूर नाविकांनीं आपल्या प्राणांच्या आहुति ह्या वेळपर्यंत देऊन टाकिल्या, त्यांची स्मृति आपण मोठ्या आदरानें ठेविली पाहिजे.

सैन्याविषयीं ह्मणाल तर आपणांस आतां नवीनच दिशेनें प्रयत्न केला पाहिजे. हा प्रयत्न सतत, निश्चयानें व एकजुटीनें झाला पाहिजे. कारण युद्ध चालू असतां मृत्युमुखीं पडणाऱ्या सैनिकांची जागा आपणांस भरून काढीत गेलें पाहिजे. शिवाय आपलें लष्करी सामर्थ्य मूळच्या इतकेंच ठेवून चालावयाचें नाहीं; तर आपल्या नांवाला साजेल असा कांहीं पराक्रम दाखविणें असल्यास आपण ह्या सामर्थ्याचें प्रमाण वाढविलें पाहिजे; सैन्याची संख्या वाढविली पाहिजे; आणि सैनिकांच्या आंगचें लढण्याचें कौशल्य तर कितीतरी पट वाढविलें पाहिजे. लॉर्ड मेयरसाहेब, आपणांस व राजधानीच्या इतर शहरांतील मुख्य म्याजिस्ट्रेटांस मी विनंती करीत आहें; तिचा हेतु इतकाच कीं, ह्या प्रसंगीं आपलें अत्यन्त निकडीचें कर्तव्य कोणतें, तें आपल्या अंतःकरणांत बिंबावें.

साम्राज्यांतील आपल्या ताब्यांत असलेल्या एकंदर स्वसत्ताक वसाहतींनीं आपल्याशीं बंधुभावानें वागण्याचा, व इंग्लंडचें कार्य तेंच आपलेंही कार्य समजण्याचा निश्चय करून तो सप्रमाण व्यक्त केला आहे. वस्तुतः आपण ह्या कामीं त्यांना कोणत्याही प्रकारें विनवणी केलेली नव्हती; तर त्यांनीं स्वयंस्फूर्तीनें व एकदिलानें असें केलें आहे. ह्या त्यांच्या वर्तनाला इतिहासांत साम्य नाहीं.

कानडा, आस्ट्रेलिया, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका, न्यूफौंडलंड ह्या साम्राज्याच्या वसाहतींतील एकंदर लोकांचें ह्मणणें असें कीं, ह्या युद्धांत ब्रिटिश सरकारास मदत करणें हें केवळ कर्तव्य ह्मणून करावयाचें नसून तो आपला एक हक्कच आहे, अशी त्यांची समजूत आहे. ही मदत द्रव्पद्वारें व युद्धसामग्रीच्या द्वारें करण्यास ते तयार आहेतच. पण सर्वांत महत्त्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे आपलें एकंदर सामर्थ्य, आपली संपत्ति व आपली जवानमर्दही खर्चीं घालण्यास ते तयार आहेत.

साम्राज्याच्या ह्या समाईक कामगिरींतील आपल्यावरील बोजा उचलण्यास हिंदुस्तानानेंही कांहीं कमी उत्सुकता दाखविली नाहीं. त्या देशांतील

ब्रिटिश लोक व रहिवासी, राजे व प्रजा, हिंदु व मुसलमान; सारांश काय कीं, प्रत्येक पदवीच्या व प्रत्येक जातीच्या लोकांत ह्या कामीं मदत करण्याची मोठ्या ईर्षेनें चढाओढ सुरू झाली आहे; व ती स्तुत्य आहे. आपल्या उत्कृष्ट हिंदी फौजेचे दोन डिव्हिजन इकडे येण्यास आधींच निघाले आहेत. त्यांनीं देऊं केलेली मदत आपण मोठ्या आनंदानें व प्रेमबुद्धीनें स्वीकारिली असून तिची किंमत आपण बरोबर जाणिली आहे. जातिभेदाला किंवा वर्णभेदाला ह्या साम्राज्यांत थारा नाहीं. ह्मणून आपण सर्व एकाच राजेसाहेबांची प्रजा आहों, अशा नात्यानें आपल्या सार्वजनिक हितसंबंधाचें व संपत्तीचें संरक्षण सारख्याच रीतीनें सर्वजण करीत आहेत. तेव्हां खुद्द संयुक्त राज्यांतील व कानडा वगैरे ताब्यांतील वसाहतींतील सैन्याच्या बरोबरीनें खांद्याशीं खांदा भिडवून हिंदुस्तानचें सैन्य तयार झालें, ह्याबद्दल आम्ही मनःपूर्वक अत्यंत कृतज्ञ आहों; असें आम्ही ह्या प्रसंगीं बोलून दाखवितों. आतां हें सर्व सैन्य ब्रिटिश निशाणाखालीं लढणार; व तें निशाण सर्वांच्या जुटीचेंच चिन्ह होय. सगळें जग ह्या आपल्या जुटीवर उठलें, तरी त्याला ही जूट फोडितां यावयाची नाहीं, किंवा तिचा भंगही करितां यावयाचा नाहीं.

जगाच्या प्रत्येक भागांतील आपल्या प्रजाबंधूंकडून आपापली मदत स्वीकारण्याविषयीं उत्साहपूर्वक विनंती होत आहे, व त्यांनीं तशी मदत प्रत्यक्ष दिलीही आहे. तेव्हां खुद्द आपण एथें काय करीत आहों व आपणांस काय केलें पाहिजे? सैन्याला सज्ज होण्याविषयीं हुकूम तारीख ४ आगस्ट रोजीं सुटला नंतर लागलींच लॉर्ड किचनर ह्यांनीं कायम सैन्यांत (रेगिलर आर्मींत) भरती होण्यासाठीं १००००० लोकांची पहिली मागणी केली; व आणखी १००००० ची दुसरी मागणी पाठोपाठ केली. ह्या मागण्यांप्रमाणें आजपर्यंत जवळ जवळ २५०००० पासून ३००००० पर्यंत माणसें तयार झालीं आहेत. तसेंच खुद्द लंडन शहरानेंही आपल्या हिश्श्याचें काम बजावलें आहे, हें सांगण्यास मला आनंद वाटतो. खुद्द लंडनमध्यें ४३००० नांवें तर दाखल झालींच आहेत. कायम सैन्यांत भरती होण्यासाठीं आम्ही मागण्या करीत आहों; ह्यावरून खुद्द देशाच्या संरक्षणार्थ असलेल्या सैन्याची (टेरिटोरियल फौजेची) योग्यता हलकी समजून त्याला नाउमेद करण्याचा आमचा मुळींच हेतु नाहीं; हें मीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. परदेशांत कामगिरी बजावण्यासाठीं त्या सैन्यांत आपखुषीनें दाखल झालेल्या टेरिटोरियल फौजेपैकीं शिपायांची संख्या समाधान-

कारक असून ती दिवसेंदिवस वाढत आहे. ते सैनिक आपल्यांत अधिकाधिक भरती करीत जातील, सर्व प्रकारची जुळवाजुळव करतील, व त्यांना सदोदित जें जें काम नेमून देण्यांत येईल, तें तें उत्कृष्ट प्रकारें बजावतील; अशाविषयीं आह्मांस पूर्ण भरंवसा आहे. सारांश, साम्राज्याच्या लष्करी व्यवस्थेसंबंधानें कोणतीही कामगिरी त्यांजकडे सोंपविली असतां ती ते बजावणारच; मग ती शत्रूचा प्रत्यक्ष समाचार घेण्याची असो, वा शत्रूपासून नुसता बचाव करून घेण्याची असो.

पण आतां आपण पुन्हा आपल्या कायम सैन्याचा विचार करूं. हें सैन्य वाढविण्यासाठीं आपणांस आणखी लोक पाहिजेत; पण ते उत्तम लढवय्ये पाहिजेत. जीं माणसें भरती होण्यास तयार झालीं असून ज्यांचीं नांवें हल्लीं दाखल झालीं आहेत, तेवढ्या सगळ्यांना एकदम योग्य प्रकारें लष्करी शिक्षण देऊन युद्धसामग्री वगैरे पुरवितां येणार नाहीं. तथापि कायम सैन्यांत दाखल होऊन प्रत्यक्ष रणभूमीवर जाण्यास जे जे तयार असून समर्थही असतील, त्या सर्वांचा समावेश त्या सैन्यांत करण्याची तजवीज करण्यांत येईल; अशाविषयीं त्यांनीं शंका बाळगूं नये. आह्मांला मुख्य मनुष्यबळ पाहिजे आहे. ह्मणून ज्यांची इच्छा एकाच पलटणींत किंवा तुकडींत काम करण्याची असेल, त्यांची तशी सोय करण्याचा शक्य तो प्रयत्न आह्मी करूं. ह्मणून ह्या उद्देशानें परगण्यापरगण्यांनीं किंवा म्युनिसिपालिट्यांनीं आपापल्यातर्फे पलटणी तयार कराव्या; ह्मणजे आह्मी त्यांना हरएक प्रकारें उत्तेजन देऊं. तथापि नौकरी सोडून बसलेले पुष्कळसे बिनसनदी (नॉन-कमिशन्ड) कामगारही आह्मांस पाहिजे आहेत; मात्र ज्यांनीं आपल्या देशाची कामगिरी पूर्वीच्या नौकरींत बजावली आहे, असले निवडक लोक पाहिजेत. अशा लोकांपैकीं बहुतेकांना त्यांचे कायमचे व्यवसाय आह्मी सोडून देण्यास सांगणार आहों; ह्मणजे त्यांना पुन्हा सरकारी काम पतकरतां येईल; कारण तें करण्यास लायकही फक्त तेच आहेत.

आह्मी विनंती करीत आहों ती ह्या माणसांनाच नव्हे; तर त्यांच्या हल्लींच्या धन्यांनाही आहे. युद्ध संपल्यानंतर त्यांना आपापल्या पूर्वींच्या जागीं रुजू करून घेण्याचें अभिवचन त्यांच्या धन्यांनीं दिलें पाहिजे. अखेरीस इतकेंच सांगावयाचें कीं, हल्लीं पेनशन घेऊन बसलेले असे कैक सनदी (कमिशन्ड) कामगारही आहेत. सैन्याच्या व्यवस्थेचा त्यांना पुष्कळ अनुभव असून गेल्या काळांत त्यांनीं देशाची नौकरी बजाविली आहे. त्यांनीं देखील

आतां कमरा बांधाव्या; आणि जरूर पडल्यास लोकांना लष्करी शिक्षण देण्यास तयार असल्याचें दर्शवावें; कारण त्या लोकांना असलें शिक्षण देण्यास योग्य प्रकारचे अधिकारी किंवा शिपाई सांप्रत मिळण्याजोगे नाहींत. ह्याहून जास्त मला कांहीं सांगावयाचें नाहीं.

युद्धाची प्रत्यक्ष स्थिति कशी काय आहे, त्याजबद्दल मी आज कांहीं एक बोलत नाहीं. फक्त इतकेंच सांगतों कीं, आपण कोणत्याही दिशेनें विचार केला असतां आपणांस आपल्या सैन्याबद्दल अभिमान वाटून विश्वास उत्पन्न होण्यास भरपूर पुरावा आहे; असें माझ्या विचारास येतें.

सांप्रतचें युद्ध बराच काळ चालावयाचें आहे; पण हल्लीं आपण त्यांतील आरंभीं आरंभींच्या चकमकींतील जयापजयांकडेसच फक्त लक्ष देत आहों. एवढें आपण सर्वांनीं ध्यानांत ठेविलें पाहिजे; व ह्मणूनच मी जास्त कांहीं सांगत नाहीं. आपण दूरवर नजर देऊन विचार करण्यास शिकलें पाहिजे; व इतर सर्व गुणांपेक्षां धिमेपणा, सोशिकपणा आणि निश्चयीपणा हे गुण आपण अधिकाधिक संपादिले पाहिजेत.

ह्या मध्यंतरींच्या काळांत ह्या महत्त्वाच्या सर्वसाधारण कामगिरींतील आपापल्या वांट्याचें काम बजावण्यास आपण सर्वच लागूं या; मग तो स्त्री असो वा पुरुष असो.

ह्या कामीं उत्तेजन व उत्साह येण्यास आपणांस जितकीं व ज्या उत्कृष्ट तऱ्हेचीं साधनें आहेत, तितकीं इतर कोणत्याही लोकांस कधींही नव्हतीं. प्रथमारंभीं आपण हें लक्षांत आणिलें पाहिजे कीं, आपण लढत आहों, तें एकंदर साम्राज्य एकजुटीनें लढत आहों. तसेंच ज्या कारणास्तव लढत आहों तें कारण ही आपल्या आजपर्यंतच्या उत्कृष्ट नांवालौकिकास साजेलसेंच आहे. आपले नाविक मोठे धिमे असून अजिंक्य आहेत; व अफाट समुद्रावर ते रात्रंदिवस डोळ्यांत तेल घालून सतत पाहारा करीत आहेत. त्यांचें उदाहरण आपण डोळ्यांपुढें ठेवावें. आपल्या शूर सैन्याचें शत्रुसैन्याशीं पंधरा दिवस तुमुल युद्ध सुरू आहे; व तेंही अशा स्थितींत कीं, दुसऱ्या कोणत्याही उत्कृष्ट सैन्याची तशा स्थितींत खातरी उडाली असती. तथापि आपल्या सैन्याचा आजपर्यंत पराजय झाला नसून त्याची फळीही फुटलेली नाहीं.

अखेरीस इतकेंच सांगावयाचें कीं, इतिहासप्रसिद्ध पुरुष व त्यांचीं प्रसिद्ध कृत्यें लक्षांत आणा. ह्या दिवाणखान्याच्या भिंतींवरून त्यांच्या तस-

बिरी वगैरे आपल्या भोंवतीं आपणांस दिसत आहेत; व त्यामुळें त्यांचा आज जयजयकार होत आहे. तसेंच धाकटे पिट * ह्यांचा मरणकाळचा संदेशही आपण विसरतां कामा नये. ते त्यांचे शेवटचेच सार्वजनिक उद्गार होत. लॉर्ड मेयर साहेब, आपल्या पूर्वींच्या एका मेयर साहेबांच्याच अध्यक्षतेखालीं ह्याच सभास्थानीं ते उद्गार निघालेले आहेत. ते असे :— " आपल्या प्रयत्नानें इंग्लंडनें जसा आपला बचाव केला, तसाच आपलें उदाहरण इतरांस घालून देऊन यरोपचाही बचाव इंग्लंड करील; असा मला भरवसा आहे. " पिट साहेबांच्या काळीं इग्लंडांतील लोकांनीं त्यांची ती विनंती उत्तम प्रकारें मान्य केली. पुढें जवळ जवळ वीस वर्षें लढून यूरोपच्या स्वातंत्र्याला धोका राहिला नाहीं तेव्हांच त्यांनीं तरवार म्यानांत घातली. तर चला आपणही जाऊं आणि तसेंच करूं.

---

* सुमारें शंभर वर्षांपूर्वी नेपोलियनशीं युद्ध झालें; तेव्हां हे मुख्य प्रधान होते.

## तारीख १८ सप्टेंबर १९१४ रोजीं एडिंबरो शहरीं झालेलें भाषण.

लंडन शहरच्या गिल्ड-हॉलमध्यें पंधरा दिवसांपूर्वीं मीं भाषण केलें. युद्धाच्या धोक्यांत व विपत्तींत आपणांस ज्या कारणांनीं पडावें लागलें, तीं कारणें आपल्या राष्ट्रास व एकंदर जगास कळविण्याचा मीं त्या भाषणांत प्रयत्न केला. वस्तुतः इतर कोणत्याही लोकांपेक्षां शांतता राखण्यांत आपलेंच हित अधिक आहे. तेव्हां मीं जें भाषण केलें, तेंच आज पुन्हा साद्यन्त करण्याचा माझा हेतु नाहीं. आस्ट्रिया व सर्व्हिया ह्यांच्यांत तंटा उत्पन्न होऊन लागलींच हें युद्ध सुरू झालें, असें बाह्यतः दिसतें; हें प्रत्येकाला माहित आहे. अर्थात् ह्या तंट्याशीं आपला ह्या देशांतील लोकांचा साक्षात् संबंध कांहीं नाहीं. युद्धापूर्वींचे महिना पंधरा दिवस मोठ्या आणीबाणीचे होते; व त्या मुदतींत निरनिराळ्या राष्ट्रांच्या दरबारीं झालेली वाटाघाट आतां जगजाहीर झाली आहे. हे दिवस ह्मणजे जुलई महिन्याचा दुसरा पंधरवडा आणि आगस्टचे पहिले थोडे दिवस. व्हिएन्ना एथील दरबारीं असलेले आपले माजी वकील सर मॉरिस डी बनसेन ह्यांनीं लिहिलेल्या उत्कृष्ट व सविस्तर * खलित्यामुळें अलीकडे त्या वाटाघाटींत भर पडली आहे. मला असा भरंवसा आहे कीं, प्रत्येकजण तो खलिता वाचील. तसेंच जो कोणी तो वाचील, त्याची खातरी होईल कीं, माझे मित्र व सल्लागार सर एडवर्ड ग्रे ह्यांच्याच प्रयत्नामुळें मुख्य तंट्याचा शांततेनें निकाल लागण्यासाठीं अटी वगैरे अगदीं ठरत आल्या होत्या. पण इतक्यांत ३१ जुलई रोजीं जर्मनीनें जाणूनबुजून असें वर्तन केलें कीं, त्यामुळें युद्धाशिवाय गति राहिली नाहीं.

वास्तविक घडून आलेल्या गोष्टी अगदीं निर्विवाद आहेत. त्या खोडून काढण्याचा प्रयत्न शत्रूनें केलेला नाहीं. मात्र कित्येक खोट्यानाट्या गोष्टी रचून त्यांचा प्रसार त्यानें जाणूनबुजून खरोखर केला आहे. उदाहरणार्थ, जर्मनीवर हल्ला करण्याचा फ्रान्सचा हेतु असून तो हल्ला करण्यासाठीं पहिली योजना म्हणजे बेलजमच्या तटस्थवृत्तीचा भंग करणें, ही होय; व

---

* "इंग्रज सरकार युद्ध कां करीत आहे ?" ह्या नांवाचें लहानसें पुस्तक म्याक-मिलन आणि कंपनीनें नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. त्यांत पृष्ठ ३०—३६ पर्यंत ह्या खलित्याचा गोषवारा दिलेला आहे.

तसें करण्यास फ्रान्सनें आरंभही केला आहे; असें जर्मनीनें उठविलें. असो. अखेर परिणाम असा झाला कीं, आपणांस युद्धांत पडावें लागलें; आणि तें तीन कारणांनीं. तीं कारणें पूर्वीं दुसरे एके ठिकाणीं मीं एकदां सांगितलेलींच आहेत. पहिलें असें कीं, तहामुळें दिलेल्या अभिवचनांची पवित्रता व तहांतील अटींचें उल्लंघन कोणाकडूनही न होऊं देणें, हा जो यूरोपचा कायदा तो पाळणें. दुसरें असें कीं, अगदीं लहान व निर्बळ राष्ट्रांत घुसून त्यांजवर बलिष्ठ राष्ट्रें जुलूम करूं लागलीं असतां त्या लहान राष्ट्राचें स्वातंत्र्य प्रस्थापित करून तें बलिष्ठ राष्ट्रांना कबूल करावयास लावणें. आतां तिसरें कारण असें कीं, यूरोप खंडाची पुढील काळीं आपल्याच मर्जीप्रमाणें व्यवस्था लावण्याचा हक्क उद्दामपणानें एकादेंच राष्ट्र सांगूं लागल्यास त्याला मना करणें; कारण असें करण्यांत आपल्या साम्राज्याचेंच फक्त हित नसून जगाच्या एकंदर सुधारणेस तें इष्ट आहे. ह्या प्रकरणीं आमचें धोरण व आमचा हेतु काय आहे, तें मीं आपल्या मागील भाषणांत सांगितलें आहे. आमच्या म्हणण्यांत फारशी सत्यता नसून प्रामाणिकपणाचा भाग नाहीं, असें सिद्ध करण्याचे कित्येक प्रयत्न जर्मनींत झाले; पण ते अगदीं मिळमिळीत होत. उदाहरणार्थ, जर्मनीनें असें ध्वनित केलें आहे कीं, तहामुळें उत्पन्न होणाऱ्या हक्कांसंबंधीं व लहान लहान राष्ट्रांच्या हितासंबंधीं आपण कळकळ दाखवीत आहों; पण हा प्रकार कांहीं नवाच असून तो केवळ वरकरणी आहे; त्यांत सत्याचा भाग नाहीं. तहांच्या अथवा बारीकसारीक राष्ट्रांच्या संबंधानें आजपर्यंत ग्रेट ब्रिटननें कधीं कळकळ दाखविली आहे, असा त्यांचा प्रश्न आहे. स्वतःचा एकादा मतलब साधावयाचा असेल तेव्हां मात्र आपण अशी कळकळ दाखवितों; असा त्यांचा आरोप आहे. ह्या आरोपाला जबाब देण्यास मी एका पायावर तयार आहें; व तो जबाब एकाच मार्गानें देतां येणार आहे. तो मार्ग म्हटला म्हणजे इतिहासाचा आधार. असे कित्येक आधार मला दाखवितां येतील; पण त्यांतील फक्त दोनच मी देतों. हे प्रसंग अगदीं निरनिराळ्या काळचे आहेत; पण दोन्ही हल्लींच्या परिस्थितीला अगदीं लागू पडणारे आहेत. मागें १७९३ त सुरू झालेल्या व पुढें वीस वर्षांवर चालू राहिलेल्या युद्धाचा मी प्रथम आधार देतों. फ्रान्स देशाच्या राज्यकारभारांत क्रांति घडवून आणणाराशीं प्रथम हें युद्ध सुरू होऊन पुढें तें नेपोलियनशीं चालू राहिलें. आपल्या मुख्य प्रधानाच्या जागीं तेव्हां एक अत्यन्त शांतताप्रिय गृहस्थ होते; त्यांच्यासारखे मुख्य प्रधान आपणांस कधींही लाभले नव्हते. ते प्रधान मि. पिट होत. फ्रान्स

देशांत सुरू असलेल्या राज्यक्रान्तीच्या चळवळींत, किंवा तेणेंकरून उत्पन्न झालेल्या युद्धांत पडण्याचें त्यांनीं तीन वर्षेंपर्यंत–म्हणजे १७८९ पासून १७९२ पर्यंत—साफ नाकारिलें. मला वाटतें कीं, थेट १७९२ च्या फेब्रुआरींत कॉमन्स सभेंतील आपल्या प्रख्यात भाषणांतही त्यांनीं स्पष्टपणें सांगितलें कीं, आणखी १५ वर्षें शांतताभंगाची भीति बाळगण्याचें आजमितीस आपणांस वस्तुतः प्रयोजन नाहीं; असा चांगला काळ पूर्वी कधींही आला नसेल. ह्या भाषणावरून ज्या गोष्टी दिसून येतात त्यांतील एक अशी कीं, किती झालें तरी मनुष्याच्या दृष्टीचा पल्ला बेताचाच असतो! त्या शांतताप्रिय प्रधानांनीं १५ वर्षांचें भविष्य वर्तविलें असतांही त्यांना थोड्या महिन्यांतच युद्धाचा पंथ कां स्वीकारावा लागला? यूरोपांतील एका लहानशा राष्ट्राला तहामुळें प्राप्त झालेल्या हक्काची हमी आपणच घेतली होती; व त्या हक्कांवर गदा आल्यामुळें तो युद्धप्रसंग आला होता. लहान लहान राष्ट्रांतील प्रमुख हालंड हेंच तें राष्ट्र

शेल्ट * नदींतून व्यापाराची मोकळीक जवळ जवळ २०० वर्षें यूरोपांतील प्रमुख राष्ट्रांनीं फक्त हालंडास ठेवून त्याबद्दलची हमी त्यांनीं घेतली होती. फ्रान्सांतील त्या क्रांतिकारक पक्षानें हालंडच्या ज्या भागाला हल्लीं बेलजम ह्मणतात, त्यावर स्वारी केली; आणि शेल्ट नदींतून व्यापार करण्याची मोकळीक सर्वांनाच असल्याचें जाहीर केलें. हेंच त्यांचें वैरभावाचें पहिलें कृत्य होय. हल्लींप्रमाणेंच तेव्हांच्या त्या प्रकरणांतही आपला हितसंबंध बेताचाच असून क्षुल्लक होता. तथापि मि. पिट ह्यांनीं काय उत्तर दिलें? तेव्हां कॉमन्स सभेंत त्यांनीं प्रत्यक्ष उच्चारिलेलें वाक्यच मी आपणांस सांगतों; कारण सांप्रतच्या स्थितीला तें अगदीं बरोबर लागू पडणारें आहे. १७९३ त ते ह्मणाले :—

"योग्य रीतीनें तह होऊन यूरोपचें जें राजकीय धोरण ठरलें आहे, व ज्याबद्दल सर्व राष्ट्रांच्या अनुमतानें हमी मिळालेली आहे, तें राजधोरण मर्जीस येईल तेव्हां रद्द करण्याची सत्ता एकादें राष्ट्र उद्दामपणानें घेईल, तर इंग्लंड त्या कृत्याला कधींही संमति देणार नाहीं."

ते पुढें आणखी ह्मणाले:—"आपण केलेले करारमदार खरोखर प्रामाणिकपणानें पाळावयाचे, व तहासंबंधानें पूर्ण प्रामाणिकपणानें वागण्याविषयीं

* ही नदी बेलजममध्यें पश्चिम बाजूस आहे; व तिच्या कांठीं ॲंटवर्प शहर आहे.

रास्त विचार बाळगावयाचा, असा ह्या प्रतिनिधींच्या सभेचा हेतु असेल, तर ते करारमदार व ते तह पाळण्याविषयींचा आपला निश्चय त्यांनीं व्यक्त केला पाहिजे." तह पाळण्याविषयीं, लहान लहान राष्ट्रांचें संरक्षण करण्याविषयीं, व एकाच राष्ट्राच्या जबरदस्तीच्या वर्तनाला आळा घालण्याविषयीं आपण नेटानें निश्चय धरून अणुमात्रही माघार घेतली नाहीं; ह्मणूनच तेव्हां आपणास युद्धांत पडावें लागलें. वस्तुतः तें युद्ध टाळण्यासाठीं आपण शक्य तो हरएक प्रयत्न केला होता. तेव्हांच्या त्या युद्धाचें क्षेत्र फार मोठें असून तें फार वर्षें चाललें होतें; व ह्या दोन्ही बाबतींत इतिहासांत तेवढें युद्ध तोंपर्यंत झालेलें नव्हतें.

हें एक उदाहरण झालें. मी आतां आणखी एक देतों. हें पुष्कळ अलीकडचें ह्मणजे १८७० तील होय. हल्लीं ज्या तहावर गदा आली आहे, त्याच तहावर तेव्हांही आली होती. हा तह जसा आपणांस मान्य होता, तसाच जर्मनीलाही मान्य होता; व ह्यामुळें बेलजमचा मुलूख शाबूत राखून त्याचें स्वातंत्र्य कायम राखण्याची हमी आपण घेतली होती. त्या वेळीं मि. ग्लाडस्टन हे मुख्य प्रधान होते; आणि कांहीं अंशीं ते मि. पिट ह्यांच्याहीपेक्षां शांततेचे विशेष कट्टे व विशेष उत्साही पुरस्कर्ते होते. मि. ग्लाडस्टन हे इतके शांतताप्रिय होते; तथापि आपलीं अभिवचनें पाळणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे अशी त्यांना पक्की जाणीव होती. ह्मणून त्यांनीं फ्रान्स व प्रशिया ह्यांशीं करार केला तो असा कीं, दोघांपैकीं कोणीही बेलजमच्या मुलखांत शिरून लढाई सुरू केल्यास राहिलेल्या राष्ट्राच्या मदतीनें त्याचा प्रतिकार करावयाचा. एथें हें सांगितलें पाहिजे कीं, ह्या प्रकरणांतही आपल्या हिताचा कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष संबंध नव्हता. खुद्द मि. ग्लाडस्टन ह्यांनीं ह्याच एडिंबरो शहरीं पुढें दहा वर्षांनीं, ह्मणजे १८८० मध्यें, एक भाषण केलें. त्यांत त्यांनीं ह्या प्रकरणाचा बारकाईनें विचार केला असून आपलीं कारणें स्पष्ट केलीं आहेत. त्या भाषणांतील एक उतारा आपणांस वाचून दाखवितों. तो असा :—

ह्या प्रकरणीं घडून आलेल्या गोष्टी मीं संक्षेपानें वर सांगितल्या आहेत. त्या सांगितल्यानंतर ते पुढें ह्मणतात :—"आपण युद्ध करण्याचें ठरविलें (आणि ह्या प्रसंगीं तसें करण्यास ते प्रवृत्त झालेलेच होते) तर तें स्वातंत्र्यासाठींच असलें पाहिजे. सार्वजनिक हक्काच्या संरक्षणार्थ आपण युद्ध केलें पाहिजे; एकादें जुलमी व आडदांड राष्ट्र मनुष्यजातीच्या सुखाआड आल्यास

त्याचा प्रतिकार करण्यासाठीं आपण युद्ध केलें पाहिजे." मि. ग्लाडस्टन आणखी ह्मणतात :—"सद्गृहस्थहो, ह्यालाच मी युद्धाचें योग्य कारण समजतों. युद्धाचा मला तिटकारा आहे; आणि जितकीं शेलकीं विशेषणें आपण मला सांगाल तितकीं सर्व मी त्याच्या माथ्यावर लादल्याशिवाय राहाणार नाहीं. तथापि स्वातंत्र्यासाठीं होणाऱ्या युद्धांत माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत पडण्यास मी तयार आहें."

तह पाळण्यासाठीं व लहान लहान राष्ट्रांच्या संरक्षणासाठीं मागील काळांत आपण काय केलें, त्याविषयीं हें वर्णन पुरे आहे. ह्या दोन्ही प्रकरणीं आपलें ह्मणणें सत्य नाहीं, असा जर्मनीचा आक्षेप आहे; पण त्यांत विशेष जीव नाहीं. आतां जर्मनीचा हेतु एकंदर यरोपावर आपलें वर्चस्व स्थापण्याचाच असल्यामुळें आम्ही व आमचीं दोस्त राष्ट्रें त्याचा प्रतिकार करीत आहों; पण हा मुद्दा खोडून काढण्याचा जर्मनीचा प्रयत्न तर अगदींच शुष्क आहे. जगाच्या अत्यन्त हिताची गोष्ट ह्मटली ह्मणजे यूरोपवर जर्मनीचें अशा प्रकारें वर्चस्व स्थापित होणें, हेंच होय; कारण ह्या वर्चस्वाबरोबरच जर्मनीची असुरी संस्कृति (Culture) व त्याचा असुरी बाणा (Spirit) ह्यांचा प्रसार यूरोपांत सर्वत्र व्हावयाचा; असा समज जर्मन पुढाऱ्यांचा खरोखरच उघड उघड होता; व त्यांचेंच वळण इतरांस लागावयाचें. शिवाय ह्या पुढाऱ्यांच्याच हातीं जर्मनीचें राजधोरण आज कित्येक वर्षें होतें. आतां सर्वच जर्मन लोकांचा असा समज होता, असें मात्र मी ह्मणणार नाहीं.

तर मग मी विचारितों कीं, ही जर्मन "संस्कृति" ती काय? तसेंच जर्मन बादशाहांच्या फौजेकडून ज्या जर्मन "बाण्याचा" सध्या बेलजम व फ्रान्समध्यें प्रसार होत आहे, त्या "बाण्याचें" तरी स्वरूप काय? तत्वज्ञान, भौतिक शास्त्रें व कलाकौशल्य ह्यांत जर्मन लोकांमुळें फार भर पडली आहे; व तिजबद्दल एकंदर जग त्यांचें अत्यन्त ऋणी आहे. तथापि गेल्या तीस वर्षांत जगाच्या प्रगतींत विशेषत: जर्मनीचें पाऊल दोन प्रकारें पुढें पडलं आहे; एक नीतिदृष्ट्या व दुसरें व्यवहारदृष्ट्या. जगांतील एकदर व्यवहारांचा अखेरचा निर्णय ठरविण्याचा उत्तम मार्ग ह्मटला ह्मणजे "बळी तो कान पिळी" हें तत्वच होय; अशा मताचा जर्मन लोकांत होत असलेला प्रसार; व हीच त्यांची नैतिक सुधारणा होय. आतां व्यवहारदृष्ट्या सुधारणा म्हटली म्हणजे, युद्धांत विध्वंस उडविणारीं तऱ्हेतऱ्हेचीं आयुधें शोधून काढण्यांत जर्मनीनें मारलेली अघाडी. तेव्हां ह्या दोन गोष्टीशिवाय ज्या लोकांचा दुसरा संदेश नाहीं, तसेंच सत्ता हेंच

राष्ट्राचें सर्वस्व, अशी ज्यांची भावना आहे, त्यांना तहाची योग्यता चर्मपत्राच्या तुकड्यापेक्षां जास्त न वाटणें साहजिकच होय! तसेंच दुर्बळ जनतेचे हक्क व त्यांसबंधानें प्रबळांचीं कर्तव्यें, ह्यांविषयीं आज हजारों वर्षें सगळें जग जें कांहीं ह्मणत आलें आहे तें सर्व जर्मन लोकांना चर्वितचर्वणाप्रमाणें ओकारी आणणारें वाटणें साहजिकच आहे.

पण ह्या नव्या पंथाचें एक विशेष ध्यानांत ठेवण्यासारखें लक्षण बौद्धिक व नैतिकदृष्टया कितीही योग्य दिसलें, तरी व्यवहारांत तें केवळ घातक झालें आहे; ह्मणजे त्यांना दुसऱ्याची बाजू मुळींच दिसेनाशी झाली आहे.

आतां जर्मन "संस्कृति" व जर्मन "बाणा" ह्यांचा इतका बडेजाव चालला आहे. तथापि ब्रिटिश साम्राज्यासंबंधानें भ्रामक कल्पना व चुकीचे अंदाज जर्मन बादशाह व त्यांची प्रजा ह्यांनीं केलेच. त्यांच्या त्या कल्पना व ते अंदाज फार घातक असून नीच तऱ्हेचे होते. आपल्या वाडवडिलांना दैव अनुकूल झाल्या-मुळें व त्यांनीं विश्वासघाताचें वर्तन ठेविल्यामुळें त्यांना जगाच्या अफाट भागावर व त्यांतील अनेक जातींच्या लोकांवर सत्ता स्थापितां आली; ह्याच आपल्या पूर्वजांचे आपण वंशज असून आपण सांप्रत अगदीं हीनावस्थेस पोहोंचलों आहों; अशी त्या संस्कृतिसंपन्न जर्मन लोकांची समजूत आहे! ह्या साम्राज्याचा पाया अगदीं डळमळीत आहे; व त्यांतील निरनिराळ्या मुल-खांचीं साम्राज्याशीं असलेलीं बंधनें अति शिथिल पडलीं आहेत. ह्यामुळें इतर राष्ट्रांकडून खरोखर किंचित् उपद्रव पोहोंचल्याबरोबर त्या साम्राज्याचे तुकडे तुकडे होऊन तें जमीनदोस्त होईल, अशीही जर्मन लोकांची समजूत होती. आपल्या सत्तेखालच्या कानडा वगैरे मोठमोठ्या वसाहतींना साम्राज्याशीं त्यांच्या जडलेल्या संबंधाचा मनापासून कंटाळा आलेला आहे; असें ते लोक समजतात. हिंदुस्तान तर उघड रीतीनें बंडाच्या अगदीं पायरीस पोहोंचलें आहे, असें त्या देशांत प्रवास करून आलेल्या प्रत्येक जर्मन गृहस्थास वाटत असे. शिवाय खुद्द ह्या संयुक्त राज्यांतील लोकांत, ह्मणजे आपल्यांतही, यादवी माजली असून तिचीं पाळेंमुळें फार खोल गेलीं आहेत; व ही यादवी फार भयंकर प्रकारची असून अशा स्थितींत इतरांबरोबर युद्ध करण्याचें किंवा इतरांच्या स्वारीचा प्रतिकार कर-ण्याचें आपलें सामर्थ्य पूर्णपणें नष्ट झालें आहे; अशीही त्यांची समजूत होती. काय हें विचित्र स्वप्न! त्या स्वप्नांतून ते जागेही कसे दचकून झाले आहेत! त्यांचा हा चुकीचा अंदाज फार हास्यास्पद असून परिमाणीं शोचनीय झाला. हल्लींच्या ह्या युद्धाचें एक कारण किंवा मुख्य कारण प्रायः हा चुकीचा अंदाजच होय.

पण आपण आणखीही थोडा जास्त विचार करूं. फळावरून झाडाची परीक्षा तेव्हांच होते असें ह्मणतात. इतिहासाकडे लक्ष दिलें असतांही हीच गोष्ट दिसून येईल कीं, युद्धाचा निश्चय ठरून त्यास सुरवात झाली तेव्हां जर्मनींतील त्या नव्या पंथाच्या चेल्यांनींच युद्धाचे जुन्या काळचे कित्येक प्रकार पुन्हां अस्तित्वांत आणिले. वस्तुतः जगांतील सुधारलेल्या राष्ट्रांतील लाखों लोकांच्या आंगीं अक्कल व माणुसकी असल्यामुळें आज कित्येक शतकें हे प्रकार त्यांना निंद्य वाटत होते.

* लोव्हेन, मालिन्स, टर्मांड हीं नांवें ऐकतांच काळीज कसें चर्र होतें! जर्मन संस्कृतीला ह्या तीन नांवांमुळें इतःपर कायमचाच कालिमा लागला आहे. बेलजममधील हीं प्राचीन प्रख्यात शहरें त्या लोकांनीं निर्दयपणानें लुटलीं. फ्रान्समधून खुद्द आपल्या फौजेच्या मुख्य तळाहून आजच एक बातमी आपणास कळली आहे; ती ह्या वरील प्रकाराला साजगारीच आहे. ती अशी :—जर्मन अधिकाऱ्यांनीं एक जाहिरनामा प्रसिद्ध केल्यास अद्यापि आठ दिवसही झाले नाहींत ह्या अधिकाऱ्यांनीं रीम्स † हें प्राचीन शहर काबीज केलें होतें; पण सुदैवानें तें त्यांच्या ताब्यांत फार तर थोडाच वेळ राहिलें असेल, जास्त नाहीं, ह्या जाहिरनाम्याचा शेवटचा पारिग्राफ तुह्मांला वाचून दाखविला पाहिजे. कारण तो इतिहासांत येण्यासारखा आहे. तो असा :—

• "आपल्या सैन्याचें पूर्ण संरक्षण व्हावें व रीम्स एथील रहिवाशांच्या अंतःकरणांत शांततेचें महत्त्व ठसावें; ह्मणून जर्मन सैन्याच्या सेनापतींनीं पुढ नांवें दिलेल्या गृहस्थांस पकडून ओलीस ठेविलें आहे. (हे गृहस्थ ८१ असून त्यांत शहरांतील सर्व प्रमुख माणसांचा समावेश आहे.) कोणी हूं कीं चू केल्याबरोबर ह्या सर्वांस फांशीं देण्यांत येईल. शिवाय शहराची पुरती किंवा थोडी फार तरी राखरांगोळी उडेल; आणि वरील नियमांपैकीं एकाचेंही उल्लंघन झाल्यास शहरांतील रहिवाशांनाही फांशीं देण्यांत येईल."

(जर्मन अधिकाऱ्यांच्या हुकुमावरून.)

ज्या राष्ट्राच्या बुद्धिमान् पुढाऱ्यांचें ध्येय वर दर्शविल्या प्रकारचें आहे त्याच राष्ट्राकडून वरील जाहिरनामा प्रसिद्ध झालेला आहे, हें आपण विसरतां

---

* हीं तिन्ही शहरें बेलजममध्यें असून युद्धापूर्वी चांगल्या भरभराटींत होतीं.

† रीम्स हें शहर फ्रान्समध्यें ईशान्य दिशेस आहे. एथें एक प्रसिद्ध देवालय असून प्राचीन काळीं फ्रान्सच्या राजांना त्यांत राज्याभिषेक होत असे.

कामा नये. त्याच राष्टाचे रणभूमीवरील सेनापति अशा प्रकारचीं कृत्यें मंजूर करितात, एवढेंच नाहीं, तर तीं करण्याविषयीं हुकूम फर्मावितात. हेंच राष्ट्र आपली संस्कृति व आपला बाणा यूरोपच्या इतर भागावर लादण्यासाठीं हक्क सांगत आहे. त्याचा बाणा ह्याचा अर्थ त्याचें सर्व यूरोपखंडावर वर्चस्व. पण त्या राष्ट्राचा हा हक्क आपण अखेरपर्यंत झुगारून दिला पाहिजे, असें हरएक गोष्टीवरून आपल्या ध्यानीं येईल. आजपर्यंतचें आपलें इतिहासांतील कोणतेंही महत्कृत्य घ्या; किंवा ज्याच्या योगानें पुढील काळीं आपला उत्कर्ष होण्याची आशा दिसेल असें कृत्य घ्या; त्याला जुळण्यासाठीं आपण जर्मनीच्या अरेरावीला झुगारूनच दिलें पाहिजे. ही गोष्ट मी केवळ आपणांसच सांगतों असें नाहीं; तर माझ्या एकंदर देशबांधवांस, फार काय, ज्यांच्या ज्यांच्या कानीं माझें हें भाषण पडेल, अशा साम्राज्यांतील प्रत्येक नागरिकाला व प्रजाजनाला उद्देशून मी हें सांगत आहें. आपल्याला ह्या कामीं प्रयत्न फार भगीरथ करावा लागणार आहे; आपण आपली भक्तीच समजूत करून घेऊन उपयोग नाहीं. हा प्रयत्न पूर्णपणें सिद्धीस जाण्यास कित्येक महिने, फार काय, कित्येक वर्षेंही लागण्याचा संभव आहे. तसेंच आपला प्रयत्न अगदीं सर्वस्वीं सिद्धीस गेला नाहीं तर तें आपल्या आजपर्यंतच्या नांवालौकिकास शोभणार नाहीं; व आपला निश्चय तडीस न गेल्यामुळें आपलें समाधानही होणार नाहीं. मी आज येथें आलों आहें तो कांहीं युद्धाला खर्च किती येईल त्याचा अंदाज तुम्हीं करावा, ह्मणून सांगण्यास आलों नाहीं. कारण नांवालौकिकाला व अब्रूला धोका आला असतां त्यांच्या संरक्षणार्थ कितीही खर्च आला तरी तो थोडाच. तर मग वादाचा मुद्दा किती महत्वाचा आहे, हें आपणांस सांगण्यास मी आलों आहें. शिवाय, राष्ट्र ह्या नात्यानें, फार काय, आपल्या साम्राज्यांत अनेक राष्ट्रें असून हें एकच साम्राज्य झालेलें असल्यामुळें बंधुत्वाच्या नात्यानें आपण ह्या अत्यंत बिकट प्रसंगाला तोंड देऊन आपलें कर्तव्य योग्य प्रकारें बजाविलें पाहिजे, हेंही सांगण्यास मी आलों आहें. तसेंच तें काम मी यथाशक्ति केलें आहे.

युद्ध सुरू होऊन दीड महिना होऊन गेला आहे. आपल्या आरमाराशीं दोन हात करून समुद्रावरील आपलें वर्चस्व कोणींही कमी केलेलें दिसत नाहीं. पृथ्वीवरील हरएक भागांतून भरपूर अन्नसामग्री व कच्चा माल आपल्या सर्व किनाऱ्यावर उतरत आहे. आपल्या उद्योगधंद्यांपैकीं एक दोहोंशिवाय सर्व पूर्ववत् चालू आहेत. बेकार लोकांची संख्या अद्याप विशेषशी वाढली

नसल्यामुळें त्या बाबतींत काळजी करण्यासारखें कांहीं नाहीं. द्रव्यदृष्ट्या स्थिति विशेष समाधानकारक झालेली आहे. अत्यन्त आवश्यक गोष्ट ह्मटली ह्मणजे, परराष्ट्रांशीं पैशाची व्यवस्था सुरळीत चालणें ही होय. तेव्हां त्या बाबतींत अगदीं पूर्ववत् व्यवस्था पुन्हा सुरू करण्यासाठीं हरएक प्रयत्न आपण करीत आहों. आपले फडणीस मि. * लॉइड जॉर्ज ह्यांच्या आंगच्या उत्साहामुळें व चातुर्यामुळें त्यांना जो जो उपाय सुचला त्या धोरणानें हा प्रयत्न होत आहे; शिवाय देशांतील अनुभविक पेढीवाले व व्यापारी ह्यांच्या साहाय्यानेंच ते फडणीस शक्य तो हरएक उपाय योजीत आहेत. दरम्यान शत्रूकडील व्यापारी जहाजांचा समुद्रावरून पाठलाग सुरू आहे; आणि आपलें आरमार शत्रूच्या आरमाराशीं टक्कर देण्याची अद्यापि वाट पाहात आहे; मग ती टक्कर लवकर होवो वा उशीरा होवो. गेल्या महिना दीड महिन्यांतील आरमाराच्या कामगिरीबद्दल आपण त्याचे अति ऋणी आहों; व हें ऋण उत्तरोत्तर वाढत जाणारें आहे. आरमाराला मदतीची जरूरी नाहीं; आणि काळ अधिकाधिक लोटेल तसतसें त्याचें सामर्थ्यही वाढत जाईल. मागील काळीं आपल्या आरमाराची व्यवस्था आपण दूरदृष्टीनें ठेविली; तेव्हांच्या त्या धोरणाचेंच हें फळ आहे.

आतां आपण आपल्या फौजेचा विचार करूं. पूर्वीं इतिहासांत गाजविलेल्या पराक्रमासारखेच कित्येक पराक्रम आपल्या फौजेनेंही गेल्या महिना दीड महिन्यांत गाजविले आहेत; असें आपण ह्मटल्यास त्यांत गैरशिस्त कांहीं एक नाहीं. ह्मणून आपल्या फौजेबद्दलही आपणांस अभिमान बाळगण्यास जागा आहे. सर जॉन फ्रेंच आणि त्यांच्या हाताखालचे शूर अधिकारी व सैनिक नेहमीं आपल्या डोळ्यांसमोर आहेत; व भावी पिढीलाही त्यांचें विस्मरण होणें नाहीं. हे पराक्रम मोठे खरेच; मग ते पीछेहाट होता वेळचे असोत वा शत्रूवर चाल करून जातां वेळचे असोत; दोन्हीही सारख्याच योग्यतेचे होत. प्राणांची, अवयवादिकांची, युद्धसामग्रीची व अन्नसामग्रीची भयंकर हानि झाल्याशिवाय असले पराक्रम गाजविता येणार नाहींत. युद्धाला हल्लीं कोठें आरंभ आहे; तथापि आपणांपैकीं प्रायः प्रत्येकाचेंच मन चिंताग्रस्त असून द्विधा झालेलें आहे, अशी माझी समजूत आहे. आपल्या आवडत्या मागसाच्या

* मि. म्याकेना नांवाचे प्रधान हल्लीं फडणीस झाले असून मि. लॉइड जॉर्ज ह्यांची योजना युद्धसामग्रीसंबंधीं मंत्र्याच्या जागीं झालेली आहे. हें खातें प्रस्तुत युद्धामुळें नवीनच काढिलेलें आहे.

मृत्यूमुळें आपणांपैकीं कित्येक शोकसागरांत बुडून गेले आहेत; व त्यांपैकीं कित्येक माणसें तर भरज्वानींत मृत्युमुखीं पडलीं आहेत. तथापि त्यांच्यासाठीं आपण फाजील शोक करीत बसून उपयोग नाहीं. कारण माणूस थोडींच वर्षें वांचला, पण तेवढ्यांतच त्याच्या हातून कैक उत्कृष्ट कृत्यें घडलीं तर त्याची योग्यता, शंभर * वर्षें जगूनही ज्याचा कांहींच लौकीक झाला नाहीं, त्याच्यापेक्षां किती तरी जास्त होय.

पण त्यांच्यामुळें रिकाम्या पडलेल्या असंख्य जागा भरून काढिल्या पाहिजेत. हल्लींच्या युद्धांतून निष्कारण होणारी हानि कांहीं बेसुमार आहे; तिची प्रायः कोणास कल्पनाही होणार नाहीं. युद्धाच्या सुरवातीपासून सरकारनें आजपर्यंत २,००,००० हून बरींच अधिक माणसें ह्यापूर्वींच युद्धाच्या तोंडावर पाठविलीं आहेत. तसेंच अन्नाच्या, सामानसुमानाच्या व हत्यारें वगैरेच्या बाबतींत त्यांना उत्तम प्रकारचा पुरवठाही आपण केलेला आहे. हिंदुस्तान, इजिप्त व भूमध्यसमुद्र ह्यांतील कायम सैन्य त्यांच्या मदतीला लवकरच पाठविण्यांत येईल. शिवाय आपल्या ताब्यांतील राज्यें अत्यंत देशाभिमानानें व उदार मनानें जें सैन्य मदतीस देत आहेत, तेंही योग्य वेळांत रणभूमीवर दाखल होईल. खुद्द देशाच्या संरक्षणार्थ असलेलें आपलें शूर सैन्य (टेरिटोरियल फोर्स) आपल्यापाशीं येथें आहेच. दिवसेंदिवस त्याची स्थिति सुधारत असून कामाला जास्त लायक होत चाललें आहे. तसेंच त्याला जी जी कामगिरी आपण नेमून देऊं—मग ती ह्याच देशांतील असो वा परदेशांतील असो—ती ती बजावण्यास तें सैन्य उत्सुक असून उत्कंठित झालेलें आहे.

पण एवढ्यानेंच पूर्तता होत नाहीं. आपणांस ह्याच बाबतींत आणखी बरेंच जास्त करावयाचें आहे. समरांगणावर पाठविण्यासाठीं नवीं चार सैन्यें तयार ठेवण्याचा आपला इरादा असल्याचें लार्ड किचनर ह्यांनीं एकंदर देशास उद्देशून कालच सांगितलें आहे. महिना झाला नाहीं तों त्या सैन्यांत भरती होण्यासाठीं पांच लाख माणसें आपणास मिळालीं आहेत. गेल्या आठवड्यांत आमचें नांवें नोंदण्याचें काम सुरू होतें. तेव्हां उभ्या वर्षांत जितकीं नांवें आपण नेहमीं नोंदीत होतों, तितकीं एकाच दिवसांत नोंदावीं लागलीं. तेव्हां ह्या खात्यांतील कामगारांना कामाचा विशेषच ताण बसला; व पुष्कळ-

* 'काकोऽपि जीवति चिराय बलिं च भुंक्ते' ही उक्ति सर्वांस विदितच आहे.

जणांची कांहीं काळ गैरसोय होऊन त्यांना हाल सोसावे लागले. पण ह्यांत कांहीं आश्चर्य आहेसें मला वाटत नाहीं. उत्तरोत्तर जसजसा वेळ जास्त मिळेल, आपण विशेष धिमेपणानें काम करूं लागूं, आणि सैन्यव्यवस्थेच्या बाबतींत अधिकाधिक सुधारणा होत जाईल, तसतशा ह्या सर्व अडचणी दूर होतील. शिवाय लष्करी लोकांना भत्ता देण्याचें नवीन प्रमाण कालच पार्लमेंट सभेस कळविण्यांत आलें आहे. तेणेंकरून युद्धांत मृत्यु पावतील त्यांच्या बायका, मुलें व त्यांच्यावर अवलंबून असणारीं इतर माणसें ह्यांची विपत्ति बरीचशी कमी होईल. आह्मांस मनुष्यबळ पाहिजे आहे; पण त्या माणसांना लष्करी शिक्षण देऊन तयार करण्याच्या कामीं मदत तर विशेषच पाहिजे आहे. आपल्या एकंदर संयुक्त राज्यांत मागील काळांत पुष्कळांनीं सनदी कामगार ह्मणून ह्मणा, किंवा बिनसनदी कामगार ह्मणून ह्मणा, आपल्या देशाची चाकरी लष्करांत बजावली आहे. तथापि आजच्या घटकेस देशसेवा बजावण्याची जितकी उत्कृष्ट संधी प्राप्त झालेली आहे, तितकी पूर्वीं एकालाही मिळालेली नसेल.

इंग्लंड, स्काटलंड व आयर्लंड ह्या तिन्ही ठिकाणच्या जवानमर्दांना आमची ही विनंती आहे. ह्या विनंतीच्या बाबतींत स्कॉटलंड कानावर हात ठेवणार नाहीं, असें मी पक्कें जाणतों; कारण कामन्स सभेंतील मी तुमचा सर्वांत जुना प्रतिनिधि आहें; तेव्हां माझ्या शब्दाला तुह्मी मान देणारच. स्काटलंडकडून हल्लींही कामगिरी चांगली होत आहे; एवढेंच काय, पुष्कळच चांगली होत आहे. तसेंच खुद्द एडिंबरो शहराकडून जितकी चांगली होत आहे, तितकी स्काटलंडच्या इतर कोणत्याही भागाकडून होत नाहीं. आपले लॉर्ड प्रॉव्हस्ट ह्यांनीं वाचून दाखविलेले आंकडे मीं ऐकिले; तसेंच स्काटिश सैन्यावरील शूर सेनापति ह्यांनीं मला पाठविलेले आंकडेही मीं पाहिले. तेणेंकरून मला झालेला आनंद सांगतां पुरवत नाहीं. त्या आंकड्यांवरून खरोखर दिसून येतें कीं, स्कॉटिश लोक आपल्या आवांक्याबाहेर कामगिरी बजावीत आहेत; व ते तशी बजावतील असा अंदाज होताच. ह्याच संबंधानें पंधरा दिवसांपूर्वीं लंडन शहरीं मी बोललों तेंच पुन्हा आपणांस सांगतों. एकाच गांवचे, एकाच परिस्थितींतले व एकाच प्रकारच्या उद्योगधंद्यांतले लोक असतील त्यांनीं लढाईवरही मिळूनच जावें, हें आह्मांस अत्यन्त अवश्य वाटत. तेव्हां शक्य तितकी ह्या धोरणानें व्यवस्था होईल; मात्र युद्धांत आकस्मिक कांहीं गोष्टी घडून ह्या व्यवस्थेस व्यत्यय आल्यास इलाज नाहीं.

मला आतां एकच गोष्ट सांगावयाची आहे. आपल्या भरतींतील नवीन सैनिकांना आपणांस काय मोबदला देतां येईल ? राष्ट्राला व एकंदर साम्राज्याला त्यांची जरुरी लागली तेव्हां ते आपण होऊनच नौकरीस आलेले आहेत. त्यांच्यावर कांहीं कोणीं सक्ती केलेली नव्हती. आपण एखाद्या देणगीच्या रूपानें किंवा लांचलुचपतीच्या रूपानें त्यांना कोणत्याही प्रकारचें मोठेंसें आमीष दाखविलेलें नाहीं. त्यांपैकीं पुष्कळांना, ऐषआरामांत व सुखांत दिवस घालविण्याची संवय असेल; पण ह्यापुढें त्यांच्या बहुतेक सुखांना व सर्व ऐषआरामाला त्यांना अजी फांटा द्यावा लागेल. शिवाय त्यांना कडक लष्करी शिक्षणांत कित्येक दिवस घालवावे लागतील. पण ह्या त्यांच्या देशाभिमानाच्या कामगिरीला ते पूर्णपणें लायक होतील, तेव्हां शत्रूला टक्कर देण्याची त्यांना सुसंधी मिळेल. त्यांना कदाचित् धारातीर्थीही पडण्याचा प्रसंग येईल. तथापि स्वतःची महत्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठीं किंवा दुसऱ्याची निष्कारण कुरापत काढण्यासाठीं कांहीं त्यांना प्राण खर्ची घालावयाचे नाहींत. तर आपल्या देशाचा नांवलौकिक व त्याची इभ्रत राखण्यासाठीं, स्वतंत्र राज्यांच्या स्वातंत्र्याचें संरक्षण करण्यासाठीं, आणि मनगटाच्या जोरावर सुधारणेच्या तत्वांना व यूरोपच्या स्वातंत्र्याला धोका येऊं लागल्यास त्यांचें संरक्षण करण्यासाठीं त्यांचे प्राण बळी पडावयाचे आहेत.

## तारीख २५ सप्टेंबर १९१४ रोजीं डब्लिन येथें झालेलें भाषण.

आपल्या राष्ट्राच्या इतिहासांत हल्लींची घटका फार महत्त्वाची आहे. अशा वेळीं संयुक्त राज्यांतील चार मुख्य म्याजि ट्रेटनीं त्यांच्या त्यांच्या शहरांतील नागरिकांना स्वतः एक विनंती करण्याची संधी मला द्यावी असें मीं होऊन कांहीं थोड्या दिवसांपूर्वी त्यांना सुचविलें. लंडन व एडिंबरो शहरीं मला जें काय सांगावयाचें होतें, तें मीं आधींच सांगून टाकिलें आहे. माझा जन्म इंग्लंडांतील; तसेंच लहानपणापासून लंडन शहराशीं माझा संबंध असून तेथें माझें राहाणेंही फार दिवसांचें ह्मणून त्या दुहेरी नात्यानें मला लंडन शहरांतील लोकांशीं बोलतां आलें. दुसरें शहर एडिंबरो हें स्काटलंडच्या प्राचीन राज्याच्या राजधानीचें होय. पण गेल्या तीस वर्षांपैकीं बहुतेक वर्षें त्या शहरातर्फे मी कामन्स सभेंत प्रतिनिधि होतों; आणि हल्लीं वर माझ्या पूर्वींचे प्रतिनिधि दुर्दैवानें काळाच्या तावडींत सांपडल्यामुळें हल्लीं मीच त्या शहरातर्फे तेथील सर्वांत जुना प्रतिनिधि राहिलों आहें. ह्मणून तेथील लोकांशीं बोलण्यासही मला विशिष्ट प्रकारचा अधिकार पोहोंचत होता. पण ह्या डब्लिन शहरीं आज आपणांपुढें बोलत असतां मला वरील दोहोंपैकीं कोणताच अधिकार दाखवितां येणार नाहीं. मी आज आपला पाहुणा आहें. तसेंच मा या एकंदर राजकीय आयुष्यक्रमांत आयर्लंडची यथाशक्ति सेवा करण्याचा प्रयत्न मीं केलेला आहे. शिवाय ही सेवा जेव्हां जेव्हां संधी आली, तेव्हां तेव्हां माझें सर्व सामर्थ्य खर्चून मीं मनोभावानें केलेली आहे. तेव्हां मला जो थोडाफार अधिकार पोहोंचतो तो एवढ्याच कारणानें. मी एका विवक्षित पक्षाचा अभिमानी ह्मणून आज एथें आलों नाहीं; किंवा मोठा राजकारणी पुरुष ह्मणूनही आलों नाहीं. तर ह्या घटकेस ब्रिटिश सरकारचा मुख्य अधिकारी असल्यामुळें त्या नात्यानें आलों आहें. तसेंच ऐरिश लोक राजनिष्ठ असून त्यांच्या आंगीं देशाभिमान वसत आहे; ह्मणून हल्लीं आपणा सर्वांवर आलेल्या संकटाच्या प्रसंगीं राष्ट्राच्या संरक्षणाचें काम सर्वांचेंच आहे. तेव्हां तुह्मीं आपलें कर्तव्य बजावावें हें सांगण्यास मी आलों आहें.

आपल्या राष्ट्राच्या कारभारांतील हल्लींचा प्रसंग मोठाच आणीबाणीचा आहे. ह्या प्रसंगीं ह्या संयुक्त राज्याच्या सरकारानें जो पंथ स्वीकारिला आहे तोच रास्त आहे, हें सिद्ध करण्यासाठीं आज मी आलों नाहीं; त्याचें समर्थन

करण्यास तर मुळींच आलों नाहीं; कारण तसें करण्याची आजच्या ह्या घटकेला खरोखर जरुरी नाहीं. आपण आजपर्यंत युद्धें केलेलीं आहेत; पण त्यांच्या युक्तायुक्ततेसंबंधानें आपल्यामध्यें बरेंच मतवैचित्र्य आहे. त्या वेळीं आपण योग्य मुत्सद्दीपणानें वागलों किंवा नाहीं, ह्याविषयीं आपलें चित्त अस्वस्थ आहे; तेव्हांचें आपलें राजधोरण चुकीचें होतें किंवा बरोबर होतें, ह्याविषयींही आपल्या मनाला मोठी हुरहूर आहे; आणि आपला पक्ष तेव्हां खरोखर रास्त होता किंवा कसें ह्याविषयीं आपलेंच मन साशंक आहे. पण आजची गोष्ट कांहीं तशी नाहीं. नेपोलियनचें वर्चस्व नष्ट करण्यासाठीं आपण शंभर वर्षांपूर्वी केलेलें युद्ध चिरस्मरणीय आहे. पण तेव्हां बरेच लोक युद्धाला प्रतिकूळ होते; शिवाय त्यांचे हेतु शुद्ध असून ते लोक वजनदारही होते; ह्यामुळें आपल्या राष्ट्राची तेव्हां जूट राहात नसे. ह्मणून मी पुन्हा बजावितों कीं, आजची गोष्ट कांहीं तशी नाहीं. आजच्या युद्धांत आपल्या राष्ट्राची एकजूट आहे; अथवा अनेक राष्ट्रें मिळून झालेल्या त्या एकंदर साम्राज्याचीही ह्या युद्धांत जूट आहे; असें मी ह्मणतों. आज मी आपणांपाशीं एथें बोलत असतां पृथ्वीच्या पाठीवर सर्वत्र पसरलेलें आपल्याभोंवतालचें साम्राज्य माझ्या डोळ्यांसमोर आहे. तेव्हां ह्या साम्राज्यांतील भिन्न भिन्न राष्ट्रांना धर्म किंवा पंथ, जात किंवा देश, हा भेद माहीत नाहीं. सांप्रत कांहीं विशिष्ट तत्त्वांच्या संरक्षणासाठीं व हितसंबंध कायम राखण्यासाठीं आपण सर्व लढत आहों. हीं तत्त्वें व हे हितसंबंध एकंदर ब्रिटिश साम्राज्यालाच अति महत्त्वाचे आहेत असें नाहीं; तर सर्व जगाच्या सुधारणेस त्यांची जरुरी आहे; व पुढील पिढ्यांत आपली प्रगति होण्यास ज्या ज्या गोष्टींची आशा करणें रास्त आहे, त्या सर्वांसाठीं त्यांची जरुरी आहे.

आपणांस ह्या युद्धांत यशच येणार; पण यश येणार कीं अपयश येणार हा प्रश्न तूर्त नाहीं. सांप्रत मला तुह्मांला इतकेंच विचारावयाचें आहे कीं, तुह्मांसारख्या स्वतंत्र लोकांच्या अंगचा उत्कृष्ट उत्साह जागृत करून त्याचा उपयोग करून घेण्यास हल्लींच्यापेक्षां उच्च दर्जाचें कोणतें कार्य मिळणार आहे? राष्ट्राराष्ट्रांतील सचोटीच्या वर्तनाला हल्लीं जर्मन राष्ट्र धाब्यावर बसवूं पाहात आहे. तसेंच तें बलाढ्य राष्ट्र एका दुर्बळ राष्ट्रावर जबरदस्ती करूं पाहात आहे. तेव्हां अशा प्रसंगीं त्या बलाढ्य राष्ट्राचा प्रतिकार करण्यासाठीं तुह्मीं आपल्या अंगच्या उत्साहाचा उपयोग केला पाहिजे. मनगटाच्या जोरांत अधर्म नाहीं, अशी त्या जर्मन राष्ट्राची समजूत आहे. ह्याच जोराचा उपयोग करण्याविषयीं ते उपदेश करीत आहेत, व ते लोक स्वतः तसें करीतही आहेत.

अशा त्या लोकांकडूनच स्वातंत्र्यप्रिय संस्थांच्या सर्वोत्कृष्ट ध्येयांना प्रतिबंध होऊं लागला आहे. ह्मणून त्या लोकांचा समाचार घेण्यासाठींही तुह्मीं आपल्या उत्साहाचा एकदम उपयोग केला पाहिजे; ह्मणजे त्यांचीं तीं ध्येयें तडीस जातील. मग ह्या स्वातंत्र्यप्रिय संस्था कोणत्याही देशांतील असल्या, तरी त्यांचें संरक्षण झालें पाहिजे.

प्रस्तुत युद्धाला खरोखर कारणीभूत जर्मनी असून ह्याची जबाबदारी त्याच्यावर आहे, हें आणखी एकदां सिद्ध करून दाखविण्याची मला अवश्यकता दिसत नाहीं; व तुमचेंही मत माझ्यासारखेंच असेल, अशी माझी खातरी आहे. आपल्या ह्या ह्मणण्याला भक्कम पुरावा असून तो अगदीं उघड व अनेक बाजूंनीं आहे. हा पुरावा खुद्द जर्मनीला नाकबूल आहे; पण त्याला नाकबुली ह्मणतां येईल किंवा नाहीं ह्याची शंका आहे. शिवाय त्या नाकबुलींत जोर नसून ती केवळ बाह्यात्कारीं आहे. आज तीस पसतीस वर्षें जर्मनीची युद्धाची तयारी सुरू आहे; फौजेसाठीं व आरमारासाठीं युद्धसामग्री तें राष्ट्र जमवीत आहे; व इतर राष्ट्रांशीं स्नेहसंबंध जोडून आपला पक्ष सबळ करीत आहे. तथापि आपल्या सामर्थ्याचें व उत्साहाचें वर्चस्व सर्वत्र प्रस्थापित करणें, हेंच अत्यन्त महत्कार्य ह्या लोकीं आपणांस साधावयाचें आहे, असें जर्मन लोकांस वाटत आहे. तेव्हां तें वर्चस्व कोणत्या ना कोणत्या रीतीनें स्थापन करण्याचा प्रयत्न करून त्या कामीं पिच्छा पुरविला पाहिजे; असा उपदेश जर्मनीचा आपल्या तरूण पिढीला होत असून आज इतकीं वर्षें तशा प्रकारची संधी मिळण्यासाठीं तें राष्ट्र टपून बसलें आहे. इतिहासांतील आजपर्यंतचीं बहुतेक युद्धें प्रायः कांहीं आकस्मिक कारणांनीं उपस्थित झालेलीं आहेत. आस्ट्रिया व सर्व्हिया ह्यांच्यांत भांडण सुरू झालें; पण त्याचा निकाल शांततेच्या उपायांनीं लावितां आला नसता, किंवा लागला नसता, असा कांहीं भाग नाहीं. पण जर्मनीचें राजधोरण ठरवून तें अमलांत आणण्याचें ज्या मुत्सद्यांच्या स्वाधीन होतें, त्यांच्या विचाराला आलें कीं, आपण आज इतकीं वर्षें जो डाव साधण्याची तयारी बुद्धिपूर्वक करीत आहों, तो साधण्याची वेळ हीच आहे. पारडें शांततेकडे झुकवावयाचें किंवा युद्धाकडे झुकवावयाचें, हें त्यांच्याच हातीं होतें; आणि त्यांची लहर युद्धाकडे लागली. असा निर्णय ठरविण्यांत जर्मनीनें दोन ढोबळ चुका केल्या; व त्या आतां प्रत्येकाच्या ध्यानीं आल्या आहेत. राष्ट्राराष्ट्रांतील प्रत्येक प्रकरणाचा खुलासा करून त्याचा अखेर निकाल मणगटांत जोर असेल त्या मानानेंच लावितां

आला पाहिजे, अशी जर्मन लोकांची समजूत. तेव्हां त्यांच्याकडून त्या दोन्ही चुका होणें स्वाभाविक आहे.

त्या चुका कोणत्या ? पहिली चूक अशीः—फ्रान्समध्यें घुसण्यासाठीं जें जर्मन सैन्य जाणार त्याला बेल्जमच्या मुलखांतून जाण्यास राजरस्ता मागितल्यास बेल्जमला राग येणार नाहीं व ह्या कामीं अडथळा तर खचित होणार नाहीं; असा जर्मनीनें भलताच अंदाज केला. वस्तुतः बेल्जम हा एक लहानसाच, पण समृद्ध देश आहे युरोपच्या तंट्याबखेड्यांत त्याचा अर्थाअर्थीं कांहीं संबंध नाहीं. तसेंच त्याचें स्वातंत्र्य कायम राखण्याविषयीं त्याला प्रबळ राष्ट्रांनीं एकमतानें अभिवचनें दिलीं असून व्यक्तिशःही दिलेलीं आहेत. आपल्या जमिनी आपल्याच फौजेच्या रक्तानें चिंब भिजून गेल्या तरी बेहेत्तर आहे; आपलीं शहरें व खेडेगांवें लुटारू लोकांकडून उजाड झाल्यास चिंता नाहीं; तसेंच स्मारकांच्या व इतर अमूल्य कृत्यांच्या रूपानें आपणांस आपल्या वाडवडिलांकडून मिळालेल्या अति महत्त्वाच्या वतनाचा निष्ठुरपणानें विध्वंस झाला तरी होवो; पण आपल्या तटस्थ-वृत्तीचा भंग होऊं द्यावयाचा नाहीं, आणि आपल्या स्वातंत्र्याला कमी-पणा व धोका येऊं द्यावयाचा नाहीं, असा बाणा बेल्जन लोकांत असेल, अशी कल्पना जर्मन मुत्सद्द्यांना कोठून होणार ? येथें हेंही ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, बेल्जममधील त्या स्मारकांवरून पूर्वकाळची त्या लोकांची धर्मनिष्ठा, कलाकौशल्य व विद्वत्ता हीं दिसून येणारीं होतीं. नकाशांत एवढासा दिसणारा जो हा देश त्यांतील त्या मूठभर लोकांचें आपल्या देशावर इतकें अलोट प्रेम असेल; व त्या स्वतंत्र लोकांना त्यांच्या त्या स्वतंत्र देशाबद्दल अभिमान असून त्यावर त्यांची निःसीम भक्ति असेल, अशा प्रकारची भावना पॉट्सडॅम * येथील त्या तत्त्वज्ञांच्या मनाला प्रायः कधींच शिवली नाहीं.

हल्ला करणाऱ्या जर्मनीचा फौजफाटा केवढा अफाट व या बेल्जमचा केवढा क्षुद्र ! लढणाऱ्या दोन सैन्यांमध्यें ह्याहून जास्त तफावत इतिहासांत सांप-डावयाची नाहीं. पण ह्या दोन्ही राष्ट्रांच्या नैतिक सामर्थ्यांतही कांहीं कमी तफावत नाहीं. कारण बेल्जन लोकांनीं जर्मन लोकांना इतक्या छातीनें प्रतिबंध

---

* जर्मनीची राजधानी बर्लिन शहर; त्या शहरानजीकच १६ मैलांवर हें लहानसें शहर असून एथें जर्मन बादशाह प्रायः राहतात.

केला कीं, तेणेंकरून जर्मन लोकांच्या स्वारीचें एकंदर स्वरूप बदलून गेलें. बेलजमच्या नीतिसामर्थ्यावरून एक गोष्ट जगाच्या निदर्शनास आली. ती हीच कीं, कित्येक नीतिविषयक कल्पनांमुळें मानवी प्राण्यांच्या अंतःकरणांत एक-प्रकारची स्फूर्ति उत्पन्न होऊन त्यांचा पगडा त्यांजवर बसतो; मात्र त्या कल्पनांच्या अनुरोधानें वागण्यास जरूर लागणारा फौजफाटा त्यांजपाशीं नसतो. ह्या इतिहासप्रसिद्ध युद्धांत बेलजम, सर्व्हिया आणि मॉंटेनिग्रो ह्या लहान लहान राष्ट्रांनीं फार प्रशंसनीय कामगिरी बजाविली आहे; व ह्याच कारणानें सुधारलेल्या राष्ट्रांची सहानुभूति ह्या घटकेस सर्वस्वीं त्या राष्ट्रांना आहे.

पण जर्मनीचा आणखीही एक गुन्हा आहे. तो कोणता ह्मणाल तर ग्रेटब्रिटनसंबंधानें त्यानें केलेली आणखी एक भयंकर चूक. जर्मन लोकांच्या एका अगदीं अडाणीपणाच्या गैरसमजासंबंधानें सात आठ दिवसांपूर्वी मी एडिंबरो येथें बोललों आ . पण त्या गैरसमजाला अनुलक्षून मी सध्यां बोलत नाहीं. तो गैरसमज असा कीं, आपल्या समाजांतील तंट्याबखेड्यांमुळें आपल्या-मध्यें फार फाटाफूट झालेली आहे; व आपल्या ताब्यांतील राज्यें व मुलूख ह्यांतील रहिवासी साम्राज्यासंबंधानें अति उदासीन असून ते बंड करण्याच्या विचारांत आहेत; व साम्राज्याबद्दल प्रेमभाव त्यांच्यांत मुळींच नाहीं. ह्यामुळें आपण अगदीं दुर्बळ झालों आहों; इतके कीं, प्रत्यक्ष युद्धप्रसंगच आला तर आपल्या ह्या नामर्द व यःकश्चित् राष्ट्राला हिशेबांत अजीं घेतलें नाहीं तरी चालेल, असें जर्मन लोकांनीं मानिलें. पण त्यांचा तो गैरसमज एवढ्यानेंच पुरा झाला नाहीं. ह्या भांडणांत आपल्या संयुक्त राज्याच्या हिताहिताचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध काय आहे, असा त्यांनीं स्वतःला प्रश्न केला. ज्या युद्धांत कोट्यवधि रुपये खर्च होऊन रक्तस्रावही विलक्षण व्हावयाचा; आणि इतकें होऊन फायद्याची आशा मात्र शून्य; अशा युद्धाला कोणतें तरी राष्ट्र तयार होईल काय! त्यांतल्या त्यांत ब्रिटिश राष्ट्रासारखें आंतल्या गांठीचें, हिशेबी, सुस्त, आत्मश्लाघाप्रिय राष्ट्र कधीं तरी तयार होईल काय! बेलजमला कित्येक नैतिक कारणांमुळें ज्याप्रमाणें ह्या युद्धांत पडावें लागलें, त्याप्रमाणें आपणांसही कित्येक नैतिक कारणांमुळें पडावें लागेल, ही गोष्ट ते विसरले. आपण युद्धांत पडलों नसतों तर आपल्या नांवास कलंक लागला असता. आतां असा कलंक लागल्यानें आपलें द्रव्यदृष्ट्या अमुक नक्की नुकसान झालें असतें, असें सांगतां येण्याजोगें नव्हतें ही गोष्ट अलाहिदा.

तर मग नीतिदृष्ट्या आपलें असें कोणतें नुकसान होणार होतें? पहिली व सर्वांत मुख्य गोष्ट ह्मटली ह्मणजे एका लहान व बऱ्याचशा दुर्बळ राष्ट्राला आपण दिलेलें अभिवचन पाळावयाचें, ही होय; आणि असें करितां यावें ह्मणून ह्याच्याच अनुषंगानें राष्ट्राराष्ट्रांमधील व्यवहारांत एकंदर प्रामाणिकपणा राखावयाचा. असा प्रामाणिकपणा राखणें हें सुधारलेल्या राष्ट्रांनीं नीतिदृष्ट्या एक बंधनच आहे. जगांतल्या पुरातन काळच्या कर्तव्याच्या व प्रामाणिकपणाच्या कल्पनांचें साम्राज्य संपून आतां मणगटाच्या जोराचें राज्य सुरू झालें आहे; असें मानण्यांत त्या लोकांची पुन्हा एक चुकी झाली आहे. युद्ध ह्मटलें ह्मणजे कोणत्याही काळांत भयंकरच; तें न केल्यानें विशेष हानि होणार असेल तर मात्र तें पतकरावयाचें. तसेंच पृथ्वीवर प्रत्यक्ष नरकयातना सुरू झाल्यानें जी विपत्ति होणार, तीहून युद्धामुळें कांहीं कमी व्हावयाची नाहीं. लढाईमुळें एकच कल्होळ उडून रक्तपात फार व्हावयाचा; असें प्राचीन काळीं साधुसंत ह्मणत. पण ह्या अर्वाचीन काळांत युद्धामुळें त्याहूनही अतोनात नासाडी उडते. कारण लढणाऱ्या दोन्ही पक्षांच्या फौजांचें प्रमाण हल्लीं राक्षसी असून युद्धासंबंधीं शस्त्रास्त्रांतही शास्त्रीय रीत्या फार सुधारणा झाल्या आहेत. युद्धासंबंधीं कायदे विशेष दयाभूत अंतःकरणानें ठरून ते सर्व राष्ट्रांना मान्य झाले असल्यामुळें युद्धांतील बरींच अघोर कृत्यें बंद पडतील, किंवा त्यांचा अघोरपणा तरी कमी होईल, अशी आशा वाटत होती. परंतु गेल्या महिना दीड महिन्यांत घडलेल्या प्रकारांवरून त्या आशेचा खाडकन साफ मोड झाला आहे. बेलजम व फ्रान्स देशांवर जर्मनीनें स्वारी केली; तिचें वर्णन त्या राष्ट्राच्या इतिहासांत येणारच; परंतु इतिहासाच्या त्या भागामुळें त्या राष्ट्राला अत्यंत कालिमा लागणार आहे. शांततेनें राहात असलेल्या लोकांसही ह्या युद्धांत फारच विपत्ति भोगावी लागत आहे; तितकी इतर युद्धांत क्वचितच भोगावी लागली असेल. तसेंच साधुसंतांचीं, विद्वान् लोकांचीं, आणि धर्मविषयक व राष्ट्रविषयक मनोवृत्तींचीं कायमचीं स्मारकें बेलजममध्यें होतीं; तीं जर्मन लोकांनीं अति निर्लज्जपणानें व तिरस्कारबुद्धीनें भ्रष्ट करून टाकलीं आहेत. आजपर्यंत अत्यंत निर्दय प्रकारचीं युद्धें झालेलीं आहेत; पण त्यांच्या ऐन भरांतही असले प्रकार घडले नसतील. ह्याप्रमाणें प्रत्यक्ष इमारती वगैरेंची राखरांगोळी होऊन माणसांची कत्तल त्या देशांत उडत आहे. पण मागें राहिलेल्या लोकांचे हालही कांहीं कमी नाहींत. त्यांच्या संपत्तीचा नाश होत आहे; काटकसरीला फांटा मिळत आहे, आणि परस्परांमध्यें वैरभाव व बेबनाव वाढत असून तो फार काळ टिकत आहे.

सारांश, युद्ध सुरू झालें कीं हे सर्व अनिष्ट प्रकार त्याच्यामागोमाग आलेच.

ह्या गोष्टी मी इतक्या विस्तारानें कां बरें सांगत आहें ? मला इतकेंच सांगावयाचें आहे कीं, आह्मीं आणिला आहे अशा प्रकारें आपल्या देशावर जे मुत्सद्दी युद्धांचा प्रसंग आणितात, त्यांजवर जबाबदारीही मोठी असते. पण अशी जबाबदारी घेण्यापेक्षांही एक गोष्ट अधिक वाईट आहे. ती कोणती ह्मणालें तर योग्य वेळ आली असतां ती टाळणें. तथापि युद्धासंबंधाच्या आपल्या नोंदींवरून ह्या बाबतींत आपणांस दोष देण्यास जागा नाहीं. आपण शांततेप्रीत्यर्थ अखेरपर्यंत प्रयत्न केला. परंतु इतर देशांना तोंडघशीं पाडल्याशिवाय व आपल्या देशाच्या नांवालौकिकास बट्टा लावून देशाची इभ्रत घालविल्याशिवाय शांतता राखणें शक्य नाहीं, अशी आपली खातरी झाली; व तेव्हांच आपण तरवार उपसली.

युद्धाचीं कारणें व त्याचे हेतु ह्यांसंबंधानें हें विवेचन झालें. पण त्याशिवाय ह्या युद्धांत आपण अखेर कोणत्या गोष्टींकडे लक्ष ठेविलें पाहिजे, तिकडे आपण व माझ्या इतर देशबंधूंनीं लक्ष द्यावें. ४४ वर्षांपूर्वीं, म्हणजे १८७० च्या युद्धांत, मि. ग्लाडस्टन ह्यांनीं पुढें लिहिल्याप्रमाणें ह्मटलें आहे :—"यूरोपचें राजधोरण ठरविण्याचा हक्क यूरोपांतील सर्व राष्ट्रांना समाईक आहे, ही कल्पना आपल्या काळांत सर्वमान्य झाली; हाच ह्या काळचा सर्वांत मोठा विजय होय." तेव्हांपासून जवळ जवळ पन्नास वर्षें लोटलीं. तथापि तो महत्त्वाचा व हितकर परिणाम घडून येण्यासारखें कांहींच झालेलें अद्यापि दिसत नाहीं. तथापि एकंदर यूरोपच्या राजधोरणाची ती तेव्हां ठरविलेली व्याख्या आजमितीसही इष्ट आहे, असें मला वाटतें. राष्ट्रांच्या समाईक हक्कांची ती कल्पना किती उदात्त आहे! तिला मूर्तस्वरूप दिलें असतां काय स्थिति होणार? पाहिली व सर्वांत मुख्य गोष्ट अशी होणार कीं, राष्ट्रांचे परस्परसंबंध व यूरोपखंडाची पुढील पिढ्यांतील रचना लष्करी सामर्थ्याच्या जोरावर ठरवावयाची, ह्या तत्त्वाला पुरतेपणीं धाब्यावर बसवून ह्या प्रश्नाचा अगदीं नव्यानें विचार करावयाचा ही होय. दुसरी गोष्ट अशी कीं, यूरोपच्या पुढील काळच्या नवीन रचनेंत लहान लहान राष्ट्रें अगदीं निराळीं राखून त्यांची स्वतंत्रपणें वाढ होत जाईल, अशी सवड त्यांना ठेवावयाची. अशानें प्रत्येकाला त्याच्या त्याच्या पुरती राष्ट्रीय भावना उत्पन्न होईल. सारांश, पृथ्वीच्या पाठीवर यूरोपखंडांत बेलजम, हालंड, स्वित्सरलंड, स्वीडन व नॉर्वे, ग्रीस व बाल्कन संस्थानें ह्या सर्वांनाच जागा

मिळाली पाहिजे. सैन्याच्या दृष्टीनें व सांपत्तिक दृष्टीनें त्यांहून बलाढ्य जीं त्यांच्या शेजारपाजारचीं राष्ट्रें त्यांना यूरोपांत राहाण्यास जितका हक्क पोहोंचतो, तितकाच ह्यांनाही पोहोंचतो; अणुमात्र कमी नाहीं; हें तत्त्व मान्य झालें पाहिजे. सरतेशेवटीं एक गोष्ट घडून आली पाहिजे. ती अशी:— राष्ट्रांच्या मणगटाचे जोर, त्यांच्या महत्त्वाकांक्षेच्या चढाओढीमुळें उडणारे कडाके, आणि राष्ट्राराष्ट्रांचे वेळोवेळीं होणारे संघ व त्यांच्या सामर्थ्याचें अनिश्चित प्रमाण, हे सर्व प्रकार रद्द व्हावे; आणि त्यांऐवजीं यूरोपांतील त्या सर्व राष्ट्रांची नवीन प्रकारें रचना जुळवून आणिली पाहिजे, व त्या कामीं त्या सर्वांचें एकमत झालें पाहिजे. ह्या रचनेची उभारणी समान हक्कांच्या पायावर व्हावयाची; व यूरोपांतील एकंदर राष्ट्रांच्या विचारानें ती कायम करून त्यांच्याच विचारानें तिची अंमलबजावणी व्हावयाची. मात्र हें स्थित्यंतर हळू हळू क्रमाक्रमानें घडवून आणावयाचें. वर्षापूर्वी अशी कल्पना कोणीं सुचविली असती, तर ती केवळ अशक्य कोटींतील वाटली असती. ही कल्पना आज किंवा उद्यांच अमलांत आणूं ह्मटल्यास कदाचित् तें साध्य नाहीं. पण हें युद्ध संपून संयुक्त राष्ट्रांना जय मिळाला, तर यूरोपांतलि मुत्सद्यांना ती एकदम शक्य वाटून लवकरच त्यांच्या अगदीं मुठींत आल्याप्रमाणें होईल.

ह्या प्रत्यक्ष भांडणांतील कित्येक चमत्कारिक गोष्टींविषयीं मी पूर्वी बरीच चर्चा केलेली आहे, तिला अनुलक्षून मी थोडेंसें बोलतों. कारण ऐरिश लोकांच्या मनोवृत्तींवर त्यांचा विशेष परिणाम झाला पाहिजे, अशी माझी समजूत आहे. आयर्लंड देश राजनिष्ठ आहे; तेव्हां आपल्या संयुक्त राज्याचे सर्वसाधारण हितसंबंध प्रस्थापित करून त्यांचें संरक्षण करण्यासाठीं ऐरिश लोकांची केव्हांही मदत मागितली असतां ते मोठ्या उत्कंठेनें तयार होतील हें मला माहीत आहे. पण ह्या युद्धामुळें उपस्थित झालेले प्रश्न अशा प्रकारचे आहेत कीं, तेणेंकरून त्यांची कल्पनाशक्ति व सदसद्विवेकशक्ति तत्काळ जागृत होऊन बरें कोणतें, वाईट कोणतें, ह्याचा जाणीव त्यांना तेव्हांच होईल. मात्र तुह्मांविषयींची माझी समजूत चुकीची असून तुमच्या इतिहासाविषयीं माझा गैरसमज असेल तर गोष्ट निराळी. लहान लहान राष्ट्रें आपापलें सामर्थ्य कायम राखण्यासाठीं धडपडत असतां त्या कामीं तुह्मां ऐरिश लोकांची त्यांनीं मदत मागितल्यास तुह्मांला तिकडे कानाडोळा कसा करितां येईल? बेलजमला त्यानें स्वतः मिळविलेलें स्वातंत्र्यच कायम राखावयाचें होतें; पण पोलंडला व बाल्कन संस्थानांना गमाविलेलें स्वातंत्र्य पुन्हा मिळवावयाचें होतें; अथवा असेंही ह्मणतां

येईल कीं, जें स्वातंत्र्य त्यांनीं पूर्णपणें कधींच मिळविलेलें नव्हतें तें मिळवून त्याचा पाया भक्कम करावयाचा होता. तेव्हां अशा प्रसंगीं त्या त्या राष्ट्रांनीं तुमची मदत मागितली असतां तुह्मांला ना ह्मणतां येईल काय? शिवाय जर्मनी सांप्रत कित्येक हक्क बळकावूं पाहात आहे. ते हक्क त्याला घेऊं दिल्यास जगाच्या सुधारणेचें पाऊल एकदम मंदावून ती सुधारणा निष्फळ होण्याची भीति आहे. ह्मणून फ्रान्स व रशिया ह्या आमच्या शूर दोस्त राष्ट्रांसह आह्मी जर्मन लोकांना प्रचंड प्रतिबंध करीत आहों. तेव्हां अशा वेळीं देवासारखें स्तब्ध निराळें राहून हात जोडून तुमच्यानें बसवेल काय? बसवणार नाहीं, असेंच मी ह्मणतों; कारण मला तुमची थोडीफार माहिती आहे.

सर जॉन फ्रेंच व त्यांचें शूर सैन्य ह्यांनीं गेल्या दोन तीन आठवड्यांत युद्ध चांगल्या प्रकारें चालविलें आहे. आपलें बरेंच सैन्य निकामी झालें असून त्यांत ऐरिश सैन्यही निकामी झालेलें आहे. शिवाय गेल्या आठवड्यांत समुद्रावरील युद्धांत आपल्या आरमारास एक धोका बसल्यामुळें आरमारांतही आणखी प्राणहानि झालेली आहे. पण ह्या दोन्ही प्रकारच्या सैनिकांना ह्याहून उत्कृष्ट प्रकारचें मरण येणें शक्य होतें काय? असें मी आपणांस विचारितों. त्यांनीं त्यांच्या पश्चात् आपणांस चांगलें उदाहरण घालून दिलें असून आपणांस एक प्रकारची विनंतीही करून ठेविली आहे. साम्राज्याच्या सर्व भागांतून त्या त्या ठिकाणचे तरुण-जवान सारखे रणभूमीवर लोटत आहेत. हिंदुस्तानची पहिली कुमक आजच मार्सेल्स एथें बोटींतून उतरत आहे; व आपल्या ताब्यां-तील मोठमोठ्या राज्यांच्या सर्व बंदरांतून संरक्षक सैन्यें आधींच गोळा होत आहेत.

खुद्द आमच्याकडे सैन्यांत पांच लाखांवर भरती झाली आहे. तेव्हां तुह्मीही ह्या बाबतींतील आपली कामगिरी बजावा, असें सांगण्यास मी एथें आलों आहें. वस्तुतः तुह्मांला असें सुचविण्याची अवश्यकता नाहीं. तुह्मी ऐरिश लोक मोठे लढवय्ये असून युद्धसामर्थ्याविषयींही तुमची फार आख्या आहे. परंतु पूर्वीं एका काळीं ऐरिश लोक इंग्लंडच्या सैन्यांत न शिरतां यूरोपखंडांतील परकीय राष्ट्रांच्या सैन्यांत मुख्यत्वें शिरत असत. तेव्हांचे आपल्यांतील कायदे अन्यायाचे व अदूरदर्शीपणाचे होते, असें आता प्रत्येकाला कबूल आहे; व त्या कायद्यांच्या अंमलबजावणीमुळेंच तो तसा प्रकार घडून आला. अठराव्या शतकाच्या पहिल्या पन्नास वर्षांत लष्करी कायदा तुमच्या एथें जोरांत होता. त्या मुदतींत जवळ जवळ पांच लाख ऐरिश लोक फ्रान्सच्या

व स्पेनच्या फौजेंत शिरलें होते. हा अंदाज चांगल्या आधारावर केलेला मीं पाहिला आहे; मात्र तो अगदीं बिनचूक आहे किंवा कसें तें मला सांगतां येणार नाहीं. इंग्लंड व स्काटलंडमधील आमच्या संयुक्त राज्याचें तर दुहेरी नुकसान झालें. एक तर आमच्या सर्वोत्कृष्ट लढवय्यांपैकीं लोक सालोसाल आमचा देश सोडून दुसऱ्या देशांत जाऊं लागले. दुसरें असें कीं, जे लोक आमच्या बाजूनें आमच्याबरोबर शत्रूशीं लढावयाचे, त्यांच्याशींच तोंड देण्यास आह्मांला अनेक वेळां उभें राहावें लागलें आहे; व अशा प्रसंगीं आह्मीं परस्परांची अतोनात हानि केली आहे. वस्तुतः आपणा उभयतांत तेव्हां अधिक सलोखा असता तर तुह्मी आमच्याच बाजूनें लढलां असतां.

फौजेंतील ऐरिश पलटणी व त्यांचे मुख्य अधिकारी ह्यांजबद्दल ब्रिटिश साम्राज्याला नेहमीं अभिमान वाटतो; व तो यथार्थही आहे. तसेंच आज ह्या घटकेला जितका अभिमान वाटत आहे, तितका पूर्वीं कधींही वाटला नसेल. आज आह्मीं येथें आयर्लंडपाशीं भरतीसाठीं आणखी लोक मागत आहों; पण ते मोजके नको आहेत. ह्या साम्राज्यांतील तुह्मी एक स्वाभिमानी व राजनिष्ठ लोक आहां. तेव्हां आपल्या ह्या समाईक कामगिरीसाठीं तुह्मी आपल्यापैकीं असंख्य तरुण लोक दिले पाहिजेत; व तेही त्यांतले अगदीं निवडक निवडक दिले पाहिजेत. येथील एकंदर परिस्थिति ह्या बाबतींत मला विशेषच अनुकूल दिसत आहे. स्वयंसैनिकांच्या (व्हॉलंटीयर्सच्या) टोळ्या येथें आयर्लंडच्या सर्व भागांत आपखुषीनें आमच्या फौजेंत दाखल होत असून त्या कामीं कामगार वगैरे नेमून व्यवस्था अलीकडे झालेली आह्मांस दिसत आहे. हे स्वयंसैनिक प्रथमारंभीं कोणत्या कारणानें निर्माण झाले, व पुढें त्यांची संख्या व सामर्थ्य वाढत जाण्याचीं कारणें व हेतु कोणते, ह्याविषयीं मी कांहींच बोलूं इच्छीत नाहीं; कारण वादग्रस्त विषयाला अनुलक्षून एकही शब्द काढावयाचा नाहीं, अशी माझी आज इच्छा आहे. मी आज इतकेंच ह्मणणार कीं, आजमितीस दोन गोष्टी माझ्या मनाला मुळींच शिवत नाहींत. पहिली ही कीं तुमच्यांतच यादवी सुरू होणें; आणि दुसरी ही कीं, ग्रेट ब्रिटननें तींत पडणें.

आज मी खुद्द डब्लिन शहरींच भाषण करीत आहें, त्याअर्थीं विशेषत: तुमच्या राष्ट्रीय स्वयंसैनिकांसंबंधानें थोडेंसें बोलणें वावगें होणार नाहीं. पांच लाखांचें जें दुसरें नवें सैन्य भराभर जमूं लागलें आहे, त्यांत तुमच्या स्वयंसैनिकांनीं मोठ्या उत्साहानें तावडतोब पुष्कळशी लायक इसमांची भरती

करून आम्हांस कुमक केली पाहिजे. हें मी ऑयर्लंडांतील सर्व प्रांतांतील लोकांना सांगत आहें; इतकेंच नाहीं, तर खुद्द त्या स्वयंसैनिकांनाही माझी अशी विनंती आहे. ह्या प्रसंगीं एक स्वतंत्र ऐरिश ब्रिग्रेड* तयार व्हावी; व ह्याहूनही विशेष इष्ट ह्मटलें ह्मणजे ऐरिश फौजेची एक कोरच* तयार व्हावी. वस्तुतः मला एकट्यालाच असें वाटत नसून सर्वांनाच असें वाटत आहे. ब्रिटिश निशाणाखालीं एकंदर फौजेंत सामील झाल्यानें आपली विशिष्ट प्रकारची जूट नष्ट होईल, व त्या एकंदर सैन्यांत आपला पूर्ण मिलाफ होऊन जाईल; अशी भीति तुह्मी बाळगूं नका. तसेंच सैन्यांत तुमची वांटणी होऊन फांकाफांक झाल्यामुळें तुमच्यांतील राष्ट्रीय परंपरा व तुमचें राष्ट्रीयत्व नष्ट होऊन तुह्मी अठरापगड जातीच्या लोकांत मिसळून जाल, अशीही भीति बाळगण्याचें कारण नाहीं. हा प्रकारही वरच्याइतकाच तुम्हांला तिटकारा आणणारा आहे, हें आह्मी जाणून आहों. हल्लीं हे स्वयंसैनिक प्रांताप्रांतांतून आहेत; व त्या सर्वांना तेथें तेथें एकदम लष्करी शिक्षण मिळत असून त्यांचे लष्करी व्यवसायही एकदम सुरु आहेत. ह्मणून ह्या स्वयंसैनिकांच्या तुकड्या लष्कराच्या सोईस जुळेल अशा बेतानें होतां होईतों कायम ठेवून त्यांच्यांतील सनदशीर बंधन कायम राखावयाचें, अशी आमची इच्छा आहे. आणखी एका गोष्टीविषयीं माझी खातरी आहे. आह्मांला हुशार कामगारांची अति जरुरी आहे. म्हणून ह्या स्वयंसैनिकांना लष्करी शिक्षण देण्यासाठीं जे कामगार हल्लीं आहेत, ते आमच्या कसोटीस उतरले तर त्यांना आम्ही आनंदानें नोकरींत ठेवूं, व त्यांचे आभारी होऊं.

पण मी पुन्हा सांगतों कीं, साम्राज्याला सैन्यांत भरतीची जरुरी आहे; व ती तावडतोब पाहिजे आहे; ह्मणजेच त्यांना योग्य शिक्षण देऊन व सर्व प्रकारचें सामानसुमान देऊन वेळेवर त्यांचा उपयोग होऊं शकेल. हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, त्यांना ज्या युद्धांत कामगिरी बजावावयाची आहे, तें युद्ध ' न भूतो न भविष्यति ' अशा प्रकारचें आहे. तेव्हां आह्मांला निकड सैनिकांची आहे; व जे ऐरिश लोक ही गरज भागवितील, त्यांना अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं कीं, स्वयंसैनिकांच्या मूळच्या सामाईक हक्कांना पुढें व्यत्यय येईल. साम्राज्याच्या संरक्षणार्थ असलेल्या सैन्यांत ह्या स्वयंसैनिकांचा कायमचाच समावेश होईल, ह्मणजे त्यांची एक स्वतंत्रच विशिष्ट

* अनेक पलटणींमिळून ब्रिगेड होते; व अनेक ब्रिगेडांची कोर होते.

प्रकारची तुकडी त्या सैन्यांत होईल, असा मला पूर्ण भरंवसा आहे. फार काय, अशी माझी खरोखर खातरी आहे. मात्र ह्या तुकडीची रचना नक्की कोणत्या तऱ्हेनें जुळविण्यांत येईल, त्याविषयीं मी आतां कांहींच ह्मणत नाहीं, व मला ह्मणतांही यावयाचें नाहीं.

आमची गरज जशी मोठी आहे, तशीच तुह्मांला मिळालेली संधीही मोठी आहे. मी हल्लीं तुह्मांवर एक प्रकारचा हक्क सांगत आहें; व साम्राज्याच्या व जगाच्या सर्व भागांतील तुमच्या देशबांधवांची ह्या कामीं मला सहानुभूति आहे, हें तुह्मी पूर्णपणें जाणत आहां. आपणांमधील फार दिवसांचें हाडवैर आतां नष्ट होऊन त्याचा अगदीं नायनाट झाला आहे. हल्लीं आपलें सर्वांचें मिळून एकच राष्ट्र बनलें आहे; आणि आपण फार स्वतंत्रताप्रिय असून आपण तिचा साक्षात् एथें अनुभवही घेत आहों; व आपल्या राजासंबंधाचे प्रजाधर्म आपणांस कबूल असून ते आपण मनःपूर्वक पाळीत आहों. तेव्हां आपणांस एथें जें हें स्वातंत्र्य प्रिय असून ज्याचा आपण साक्षात् उपभोग घेत आहों, तेंच इतर राष्ट्रांसही प्राप्त व्हावें, ह्मणून आपली फौज व आरमार रणभूमीवर व समुद्रावर लढत आहे. ह्या कामांत सक्तीचा किंवा लांचलुचपतीचा भाग मुळींच नाहीं. स्वतंत्रताप्रिय लोकांनीं स्वयंस्फूर्तीनें दिलेल्या देणगीचीच आह्मांस जरूर आहे; व तशी देणगी देण्यास तुह्मी तयार असून उत्सुक आहां, अशी आमची समजूत आहे.

## तारीख २ आक्टोबर १९१४ रोजीं कार्डिफ शहरीं झालेलें भाषण.

गेल्या महिन्यांत लंडन, एडिंबरो व डब्लिन ह्या शहरीं सभा भरवून मीं भाषणें केलीं. तेव्हां पतकरलेली कामगिरी पुरी करण्यासाठीं मी आज एथें कार्डिफ शहरीं आलों आहें. वस्तुतः आपल्या मुख्य म्युनिसिपालिट्यांनीं कृपा करून परवानगी दिल्यामुळेंच ही कामगिरी मला बजावितां येत आहे. इंग्लंड, स्काटलंड व ऐर्लंड ह्या तिन्ही राज्यांत राजधानीचें असें एकेक शहर फार दिवसांपासून स्थापित झालेलें आहे. तथापि वेल्स ह्या छोट्या शा राज्याची राजधानी नकाशावर दाखवितां येईल किंवा नाहीं, ह्याविषयीं थोडीफार शंका आहे, अशी माझी नेहमींची समजूत आहे. वेल्स प्रांताचें अस्तित्व अगदीं पृथक् असून त्याचे भाग नाहींत. ह्या तुमच्या प्रांताचा आयुष्यक्रमही कांहीं निराळाच आहे. त्या आयुष्यक्रमांतील जोम पुरातन काळापासून प्राप्त झालेला आहे. शिवाय तुमच्या प्रांताची सांप्रतची तरतरी तर फार विस्तृत प्रमाणावर असून तिच्यांत खरा जोम आहे; इतका जोम पूर्वीं कधींही नसेल. तथापि तुमच्या राजधानीचें शहर कोणतें ह्याविषयीं तुम्हां वेल्श लोकांमध्यें फारशी एकवाक्यता असल्याचें मला माहीत नाहीं. परंतु राजधानीच्या वैभवासाठीं हक्क सांगणाऱ्या शहरांची तिऱ्हाईत रीतीनें तुलना करण्याच्या किंवा त्यांच्यांत तडजोड करण्याच्या भानगडींत मी पडत नाहीं. तर तुमच्या लॉर्ड मेयर साहेबांचा मी पाहुणा असून त्यांच्याच अध्यक्षत्वाखालीं आज मी भाषण करणार आहें; आणि ही एक मला मोठीच अनुकूळ गोष्ट आहे.

तुम्हां वेल्श लोकांना मी कांहीं अगदींच परका नाहीं. तथापि आज ह्या मोठ्या समाजापुढें भाषण करण्याची परवानगी मीं कां मागितली आहे, असा प्रश्न कदाचित् तुम्ही कराल. मी कांहीं अगदींच स्वस्थ बसणारा माणूस नाहीं; आणि गेल्या दोन महिन्यांत मला असा एकही दिवस गेला नाहीं कीं, त्या दिवशीं माझ्या मनाला जबर काळजी व जबाबदारी वाटलेली नाहीं. फार काय, पण मला घटका दोन घटकाही स्वस्थ गेल्या नाहींत; असें मी आपणांस प्रामाणिकपणानें सांगतों. तथापि आपण अंगिकारिलेलें कार्य रास्त असल्याबद्दल माझी पक्की खातरी आहे; व तिच्यांत यत्किंचितही डळमळ व्हावयाची नाहीं. तसेंच तें कार्य सिद्धीस नेऊन तें चिरस्थायी करण्याच्या कामीं ब्रिटिश साम्राज्याचें सरकारास नैतिक पाठबळ असून त्या एकंदर

साम्राज्याच्या फौजफांट्याचेंही पाठबळ आहे, ह्याविषयीं ओतप्रोत पुरावा आहे. शिवाय ह्या मदतींत जातिभेद, पक्षभेद अथवा वर्णभेद मुळींच दिसून येत नाहीं. ह्या सर्व कारणांमुळेंच ह्या दोन महिन्यांत माझा आजपर्यंत टिकाव लागला आहे. ह्या संयुक्त राज्यांतील ख्रिस्ती देवळांतून त्या त्या ठिकाणच्या कित्येक अति प्रख्यात पुढाऱ्यांनीं व धर्मोपदेशकांनीं आपल्या पक्षाचें म्हणणें ह्या आठवड्यांत जगाच्या निदर्शनास आणिलें आहे. त्यांनीं तें म्हणणें मोठ्या शांत रीतीनें, समर्पक रीतीनें व भारदस्तपणानें कळाविलेलें आहे, असें कबूल करून ह्या प्रसंगीं त्या मंडळीचें मी अभिनंदन करितों.

ह्या युद्धप्रकरणीं आपल्या पक्षाच्या म्हणण्याच्या सत्यतेबद्दल चर्चा करीत बसण्याची आवश्यकता जगांतील कोणत्याही भागांतील ब्रिटिश नागरिकांना आतां दिसत नाहीं. म्हणून आपलें म्हणणें काय तें आज पुन्हा मी सांगत बसत नाहीं. कारण आणखी कांहीं नवीन सांगून त्यांचें विशेष समर्थन मला करितां येण्यासारखें नाहीं. वस्तुत आपल्या पक्षाचें समर्थन करीत बसण्यासाठीं मी आज आलोंच नाहीं. आपल्या साम्राज्यांत अनेक धर्मांचे व अनेक मतांचे असंख्य लोक राहात आहेत. तरी हल्लींच्या प्रसंगीं त्या सर्वांचा हेतु एकच आहे. एकाच ध्येयाकडे त्यांचें लक्ष वेधलें आहे; ते सर्व अगदीं एकदिल झाले असून त्यांच्या मनांत कांहीं एक किल्मिष राहिलेलें नाहीं; आणि ह्या कामीं मदत करण्यास ते स्वयंस्फूर्तीनेंच अति उत्सुकतेनें व निश्चयानें सिद्ध आहेत. ह्या मासल्याचें उदाहरण जगाच्या इतिहासांत दुसरें सांपडेलसें मला वाटत नाहीं. ह्या आपल्या संयुक्त राज्याचीच—इंग्लंड, स्काटलंड, आयर्लंड व वेल्स ह्यांचीच—गोष्ट घ्या. एथें सर्वांचें अगदीं एकच स्पष्ट मत दिसून येतें. ह्या मतैक्याला एकही अपवाद ऐकूं येत नाहीं. तसेंच कानडा, आस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड हीं समुद्रापलीकडील आपल्या ताब्यांतील राज्यें व खुद्द आपल्या राजसत्तेखालच्या इतर वसाहती, ह्या सर्वांचेंही त्या प्रकरणीं मतैक्य असून आपल्याच म्हणण्याला त्यांची पुष्टि आहे. तेव्हां हा सर्व प्रकार काय दर्शवितो तें ध्यानांत आणा.

आतां हिंदुस्तानचा विचार करूं. त्या देशांतील कोणताही मुलूख आपण तरवारीच्या जोरावर मिळविला असला, तरी आपण तो कांहीं त्याच जोरावर राखिलला नाहीं. तर न्यायाची व निर्लोभ अशी राज्यपद्धति तेथें सुरू करून राखिला आहे; जुलमी राजाप्रमाणें राखिला नाहीं, तर तेथील लोकांच्या कल्याणाचा जिमा आपण घेऊन तशा दृष्टीनें तो ताब्यांत राखिला

आहे. अर्थात् हा हक्क तरवारीच्या जोरापेक्षां उत्कृष्ट प्रकारचा होय. आपण या प्रसंगीं सर्वांनाच कुमकेसाठीं विनंती केली असून त्याप्रमाणें हिंदुस्तानलाही केली. तेव्हां त्या देशाकडून मिळालेल्या उत्तरामुळें आपल्या एकंदर मनोवृत्ति उचंबळून गेल्या आहेत. तसेंच हिंदुस्तानासंबंधानें आपल्या शत्रूंच्या कल्पना आजपावेतों उद्दामपणाच्या व अज्ञानाच्या होत्या. पण ह्या उत्तरामुळें त्यांचा समूळ नायनाट होणार आहे. हें उदाहरण खरोखर ध्यानांत ठेवण्यासारखें असून अश्रुतपूर्व आहे.

आपल्या एवढें विस्तृत साम्राज्य जगांत आजपर्यंत एकही झालेलें नाहीं. ह्या एवढ्या अफाट प्रदेशांतील लोकांच्या कल्पनाशक्तीला चलन कोणीं दिलें ! त्यांचें अंतःकरण जागृत कोणीं केलें ! त्यांतील तरुण पिढी फौजेंत सामील कां झाली ! त्या लोकांच्या अंगच्या उत्साहामुळें व इच्छेमुळें आपल्या आंगीं प्रचंड सामर्थ्य उत्पन्न झालें आहे. हें सर्व तरी आपणांस कशामुळें करितां आलें ! असा प्रश्न स्वतःला विचारून त्याचें उत्तर ठरविण्यासारखा आहे. ह्याचें उत्तर देण्यापूर्वी जीं कृत्यें आमच्या हातून घडलीं नाहींत त्यांचा उल्लेख मी प्रथम करितों. तो असा कीं, गेल्या काळांत रक्तपाताचीं मोठमाठीं युद्धें ज्या हेतूंनीं झालेलीं आहेत, तसल्या हेतूंनीं कांहीं हल्लीं आपणांपैकीं कोणीही त्या युद्धास प्रवृत्त झालें नाहीं. हल्लींच्या प्रसंगीं आपणांपुरतें आपणांस असे ह्मणतां येईल कीं, आपल्या कृतींत महत्त्वाकांक्षेचा व आगळिकीचा भाग मुळींच नाहीं. तर मग आपणांस काय पाहिजे आहे ! आपण कशासाठीं प्रयत्न करीत आहों ! आपणांस काय साध्य करावयाचें आहे !

साम्राज्यांतील आपण सर्व लोक आतां जन्माचे सोबती आहों. तसेंच आपली संख्या फार मोठी असून आपला पसारा जगभर आहे; व आपण शांतताप्रिय आहों. आपण स्थापिलेल्या ह्या एवढ्या साम्राज्याचे आधारस्तंभ दोन आहेत. ते कोणते ह्मणाल तर स्वातंत्र्य व कायदा. आपल्या पूर्वजांचें बुद्धिसामर्थ्य व धैर्य, समुद्रावरील व खुष्कीवरील आपलीं शौर्याचीं व धाडसाचीं मोठमोठीं कृत्यें, आपलें धोरण व आपणा सर्वांचा शाहाणपणाचा विचार, आणि पिढ्यानुपिढ्या तावून सुलाखून निघालेला आपला अनुभव, ह्यांमुळेंच ह्या साम्राज्याची उभारणी आपणांस करितां आली आहे. ही उभारणी होण्यास बराच काळ लागला. ह्या काळांत आपणांकडून चुका झाल्या असतील; ढोबळ ढोबळ चुकाही झाल्या असतील. शिवाय आपलें साम्राज्य आपल्या ध्येयांप्रमाणें ज्या उच्च पदवीस पोहोंचावें किंवा पोहोंचलें पाहिजे, आणि

वस्तुतः आमच्या मतानें पोहोंचल्याशिवाय राहाणार नाहीं, त्या पदवीस तें आजमितीस पोहोंचलें नसेल. सारांश, आमच्या हातून चुका झाल्या नाहींत, किंवा आमचें इतिकर्तव्य संपलें, असें दुराभिमानानें किंवा वेडगळपणानें आह्मी ह्मणणार नाहीं. तथापि ही साम्राज्यसत्ता सुरू होण्यापूर्वींची निरनिराळ्या मुलखांची स्थिति, व ती सत्ता कधीं काळीं नष्ट झाल्यास तेव्हांची स्थिति, ह्यांत जें महदंतर दिसून येईल, तेवढ्यानेंच आह्मी संतुष्ट राहूं.

कोणत्याही राष्ट्राचा मुलख मिळविण्याची हाव आह्मांस नाहीं. तसेंच, परकीय लोकांवर आपली सत्ता लादण्याचा आमचा इरादा नाहीं. ब्रिटिश साम्राज्य आह्मांस अगदीं पुरेसें आहे. आजपर्यंत आमची इच्छा एकच होती व आजही तीच आहे, ती अशी कीं, आमच्या साम्राज्याची सांपत्तिक स्थिति आम्ही सुधारीत असतां, साम्राज्याच्या सरहद्दींतील लोकांस आपापली उन्नति करून घेण्यास सर्वसाधारण अशा सवलती उत्तरोत्तर देत असतां, साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांतील लोकांमध्यें विशेष प्रेमभाव व विश्वास उत्पन्न करीत असतां, आणि त्या साम्राज्याचा कोणताही भाग ब्रिटिश स्वातन्त्र्याच्या उत्कृष्ट नांवालौकिकास शोभेल अशा प्रकारें त्याची स्थिति सुधारीत असतां, इतर राष्ट्रांनीं आह्मांस आडवें येऊं नये. तेव्हां युद्धाला टाळा देऊन शांततेचा सारखा पिच्छा पुरविण्याच्या कामीं आमच्याहून उत्कट इच्छा जगांत इतर कोणत्याही राष्ट्राला असणें शक्य नाहीं, असें ह्यावरून ओघानेंच निष्पन्न होत नाहीं काय ? असें आहे तर आपल्या साम्राज्याच्या ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंतच्या सर्व ठिकाणचे ब्रिटिश लोक आपापले नांगरांचे फाळ एकीकडे ठेवून तरवारी हातांत घेऊन लढाईस सज्ज होत आहेत, ह्यांतील इंगित काय ? आपल्या सशक्त माणसांतील निवडक निवडक माणसें आपापल्या शेतजमिनी, कारखाने व पेढ्या सोडून भरतीचे लोक नोंदण्याच्या कचेऱ्यांकडे व लष्करी शिक्षणाच्या छावण्यांकडे कां चालले आहेत ?

आपल्या साम्राज्याचा विस्तार वाढवून त्यासंबंधीं आपली जबाबदारी वाढविण्याचा आमचा हेतु नाहीं, असें मीं सांगितलें आहे. तसेंच एकादी दुष्ट वासना तृप्त करून घेण्याचा, किंवा इतरांनीं दिलेल्या त्रासाबद्दल त्यांचा सूड उगविण्याचा हेतु ह्या युद्धांत शिरण्यांत आपला नाहीं, हेंही तितकें सत्य आहे. विशेषतः जर्मनीविषयीं आपल्या राजधोरणाचा उल्लेख पार्लमेंट सभेंत वारंवार झालेला असून लंडन व बर्लिन एथील दरबारीं सालोसाल तें धोरण आपण निश्चयपूर्वक चालू ठेविलें आहे. तें धोरण इतकेंच कीं, भांडणावर

येण्यासारख्या निकाल न लागलेल्या सर्व प्रश्नांचा उलगडा एकामागून एक लावून टाकावयाचा; आणि अशा रीतीनें पुढील काळांत उभयतांत प्रेमभाव राहील अशा प्रकारें पक्का पाया घालावयाचा.

कित्येक राष्ट्रांशीं, ह्मणजे फ्रान्स, रशिया व जपान ह्यांशीं, आपला स्नेहसंबंध आहे; पण इतर एकाद्या राष्ट्रासंबंधानें आपलें मन शुद्ध नाहीं, असा कांहीं त्याचा अर्थ करावयाचा नाहीं; मग त्याच्या संबंधानें शत्रुत्वाचे विचार आपल्या मनांत आहेत, असें तर मुळींच समजावयाचें नाहीं. हें आमचें ह्मणणें पहिल्यापासूनच आहे. मी स्वतः असें वारंवार ह्मटलें असून सर एडवर्ड ग्रे ह्यांनींही असेंच ह्मटलेलें आहे. तथापि आह्मीं वेळोवेळीं आणखीही एक गोष्ट स्पष्ट केली आहे. ती अशीः—"जुन्या मित्रांना सोडून देऊन नवे मित्र कोणीं जोडिल्यास त्यांत कांहीं विशेष हांशील नाहीं. आपण नवे मित्र तर जोडिले पाहिजेत; पण आहेत ते गमावून नव्हे." हे शब्द खुद्द सर एडवर्ड ग्रे ह्यांचे असून ते त्यांनीं बऱ्याच दिवसांपूर्वीं, ह्मणजे १९११ च्या नवंबर महिन्यांत, उच्चारिलेले आहेत. केसर ह्यांनीं एक जाहिरनामा प्रसिद्ध केला असून त्याचा आतां सर्वत्र डंका झाला आहे. त्यांत त्यांनीं आपणांस "विश्वासघातकी इंग्लिश" ह्मटलेलें आहे! त्यांनीं आपणांस कांहीं ह्मटलें तरी आपलें धोरण वर सांगितल्या प्रकारचेंच होतें, व पुढेंही सर्वकाळ तसेंच राहाणार.

जर्मनीशीं आपला संबंध आपल्या मतें कशा प्रकारचा असला पाहिजे, तें आपण पुढील वर्षीं, ह्मणजे १९१२ त, ठरवून टाकिलें; व त्यासंबंधाच्या अटी क्याबिनेटनें ( मंत्रिसभेनें ) बारकाईनें पाहून पसंत केलेल्या आहेत. तो ठराव मी एथें शब्दशः सांगणार आहें. ह्या ठरावाकडे लक्ष देण्यास मी केवळ तुह्मांलाच सांगत नाहीं, तर सर्व जगाला सांगत आहें. कारण हल्लीं खोट्यानाट्या कंड्या पिकून त्यांचा प्रसार होत आहे. आमचा तो ठराव आह्मीं जर्मन सरकारासही कळविलेला आहे. तो असा :—" जर्मनीनें कांहीं आगळीक केली नसतां ब्रिटिश सरकार जर्मनीवर हल्ला करणार नाहीं, किंवा इतर कोणीं केल्यास त्यांत सामील होणार नाहीं, असें आह्मी जाहिर रीतीनें सांगतों. आमचे इतर राष्ट्रांशीं तह ह्मणा, करारमदार ह्मणा किंवा त्यांच्याशीं जुटी ह्मणा; ह्यांपैकीं एकही जर्मनीची कुरापत काढण्यासाठीं नसून तसला प्रकार त्यांत मुळींच नाहीं. तसेंच त्यांत तशा प्रकारचा हेतु असेल

अशा कोणत्याही कृत्यांत ब्रिटनचें अंग असणार नाहीं." ह्या ठरावांत संदिग्ध किंवा द्व्यर्थी भाषा मुळींच नाहीं.

पण एवढ्या ठरावानें जर्मन मुत्सद्द्यांचें समाधान झालें नाहीं. त्यांची इच्छा आपण आणखीही एक गोष्ट कबूल करावी अशी होती. जर्मनीनें कोणा राष्ट्राशीं युद्ध सुरू केलें असतां आपण अगदीं तटस्थ राहाण्याचें अभिवचन त्याला द्यावें, अशी जर्मनीची इच्छा होती. शिवाय ह्या वेळीं परराष्ट्रावर स्वारी करण्याच्या व स्वसंरक्षणाच्या, अशा दोन्ही हेतूंनीं जर्मनी आपलें सामर्थ्य विलक्षण प्रमाणानें वाढवीत होता; त्यांतल्या त्यांत आरमाराची वाढ तर विशेषच होती. अशा वेळीं जर्मनी वरील प्रकारचें अभिवचन आपल्यापाशीं मागत होता; हें तुह्मी ध्यानांत आणा. अगदीं स्पष्ट बोलावयाचें ह्मणजे जर्मनी स्वतः यूरोपखंड जिंकून त्यावर वर्चस्व स्थापण्याची संधी साधीत असतां इंग्लंडनें त्यास मनसोक्त वागूं द्यावें, त्यास त्यानें होऊन अडथळा करूं नये, अशा प्रकारचें अभिवचन तें राष्ट्र आपणांपाशीं मागत होतें.

ह्या त्यांच्या मागणीला एकच उत्तर शक्य होतें; व तेंच आपण दिलेंही. इतकें झालें तरी एकंदर गेल्या दोन वर्षांत यूरोपची शांतता कायम राखण्यासाठीं आपले प्रयत्न सुरू आहेत. इतकेंच नाहीं, तर राष्ट्राराष्ट्रांमधील वितुष्ट नाहींसें करून सर्व राष्ट्रें विशेष सलोख्यानें एकमेकांस मदत करितील अशा धोरणानेंही आपला प्रयत्न सुरू आहे. तसेंच गेल्या वर्षीच्या बाल्कन युद्धाच्या आणीबाणीच्या प्रसंगीं तर हा प्रयत्न विशेषच उत्साहानें केला असून त्यांत आपणांस यशही बरेंच आलें आहे. देशांतल्या देशांतील व साम्राज्यांतील आपल्या हितसंबंधाच्या संरक्षणाच्या दृष्टीनें ह्मणा, शिवाय एकंदर यूरोपच्या सल्लामसलतीच्या बाबतींत आपल्या नेहमींच्या स्थिती-च्या व धोरणाच्या दृष्टीनें ह्मणा, ह्या दोन्ही दृष्टींनीं पाहिलें असतां अशा प्रकारचें युद्ध ह्मणजे राष्ट्रावर येणाऱ्या अनेक भयंकर विपत्तींपैकींच विपत्ति होय. कारण ह्या युद्धामुळें पहिल्या बाबतींत नुकसान होणारें असून दुसऱ्याही बाबतींत आपले हेतु फसणारे आहेत. पण हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, ही कांहीं सर्वांत भयंकर विपत्ति नव्हे.

लंडन शहरीं गिल्ड-हॉलमध्यें सुमारें महिन्यापूर्वीं माझें भाषण झालें. तेव्हां युद्धाला कोठें थोडथोडी सुरवात झाली होती. सार्वजनिक रीत्या दिलेलीं अभिवचनें जर्मनीनें निर्लज्जपणानें मोडिलीं होतीं, लहानशा राष्ट्रांतील

लोकांचें स्वातंत्र्य धुळीस मिळाविलें होतें; प्रथम बेलजमवर व नंतर फ्रान्सवर निष्कारण हल्ला केला होता. सारांश, अशा भयंकर गोष्टी पाठोपाठ घडून येत होत्या. शिवाय हल्ला करणाऱ्या फौजेच्या तुकड्या पुढें पुढें जात, तेव्हां मागील प्रांतांत क्रूरपणाचीं कृत्यें करून तो उजाड करून टाकीत; आणि त्यांतील देवालयें वगैरे भ्रष्ट करून टाकीत. इतिहासांतून रानटी लोकांचीं अत्यन्त नीच कृत्यें सांगितलेलीं आढळतात. त्याच मासल्याचीं तीं जर्मन लोकांचीं कृत्यें होतीं. ही एक महिन्यापूर्वीची स्थिति झाली. युद्ध सुरू होऊन आतां दोन महिने झाले आहेत. पण पूर्वीच्या खेदकारक व आंगावर कांटा उभा करणाऱ्या कृत्यांत कांहींना कांहीं भर रोजच्या रोज पडत आली आहे. यूरोपच्या स्वातंत्र्यावर गदा घालण्यासाठीं जर्मन लोकांची ही योजना फार दिवस सुरू असून ती फार व्यवस्थित स्वरूपाची होती; व ह्या योजनेचे हेतु व ती अमलांत आणण्याची पद्धति हल्लीं सुरू असलेल्या कत्तलीवरून व लुटालुटीवरून आपणांस ढळढळीत दिसून येत आहे.

इतर देशांविषयीं मला कांहीं बोलावयाचें नाहीं. त्यांनीं स्वीकारलेल्या धोरणाच्या बरेवाईटपणाबद्दल मी कांहीं निर्णय देत बसत नाहीं. पण आपण ब्रिटिश लोकांनीं निराळें राहून तटस्थवृत्ति स्वीकारली असती, वाहिलेली शपथ मोडली असती, आपल्या मित्रांना संकटसमयीं सोडून दिलें असतें, आपलें उघड उघड कर्तव्य बजावण्यास कचरून उडवाउडव केली असती, फार काय, जगाच्या सुधारणेवर व स्वातंत्र्यावर घाला घालूं पाहाणाऱ्या ह्या सर्वांच्या शत्रूला आपलें एकंदर सामर्थ्य खर्चून तडाखा देण्यास आपली तयारी असल्याचें आपण दर्शविलें नसतें, तर तोंड काळें करण्याशिवाय आपणांस दुसरा मार्गच नव्हता. तसेंच आपली पाळी आल्याबरोबर आपणही जमीनदोस्त होऊन जाण्यास आपणांस तयार असावें लागतें; कारण अशी पाळी यावयाचीच. वस्तुतः तशा स्थितींत आपणांस तीच शिक्षा योग्य. शिवाय शेंकडों वर्षें उत्तम प्रकारें नांवा-लौकिकानें दिवस काढून अखेरीस आपलें राष्ट्र लयास गेलें असतें. तसेंच आपणांस अशी स्थिति आल्याबद्दल कोणास खेद झाला नसता, आपणांस कोणीं मान दिला नसता व कोणीं आपलें कौतुकही केलें नसतें.

एक गोष्ट दिवसेंदिवस अधिकाधिक स्पष्ट होत चालली आहे; व ती आपणांस आनंदानें कबूल केली पाहिजे. ती हीच कीं, नीतिदृष्ट्या योग्य काय तें लक्षांत आणून त्याला अनुसरून वागण्याची जगाची नेहमीं सारखीच

आजही तयारी आहे ; आणि ब्रिटिश साम्राज्याचा पाय तर ह्या कामीं सर्वांत पुढें आहे. पण जर्मनींत विचारक्रांति झालेली असून नवीन विचाराचे लोक गेल्या तीसपसतीस वर्षें असें शिक्षण देत आहेत कीं, राष्ट्रांच्या कारभारांत नीतिशास्त्राच्या नियमांना वाव नाहीं. रास्त गोष्ट कोणती ह्मणाल तर दंडेलीचें वर्तन अथवा बळी तो कान पिळी हा न्याय ; इतर कांहीं नाहीं; असें त्या लोकांचें मत. रोज आपल्या डोळ्यांसमोर जे प्रकार घडत आहेत त्यांवरून स्पष्ट होतच आहे कीं, जर्मनीचें राजधोरण ठरवावयाचें व तें अमलांत आणावयाचें ज्यांच्या हातीं आहे, त्यांजवर आपल्या त्या नवीन पंथाच्या मतांचा पगडा बसविण्यांत त्या लोकांना चांगलेंच यश आलें आहे. आतां प्रख्यात वक्ते व लेखक बर्क हे ज्याप्रमाणें एकंदर राष्ट्रावर दोषारोप करीत असत; त्याप्रमाणें मी एकंदर जर्मन लोकांना दोष देत नाहीं.

जर्मन लोकांनीं आपल्या बुद्धिकौशल्यानें कलाकौशल्याचे अनेक जिन्नस निर्माण केले आहेत; पण मणगटाच्या जोराचें हें नवें तत्त्व त्यांनीं आपल्याच देशापुरतें निर्माण केलें आहे, किंवा इतरांसाठींही तें आहे, हें कळत नाहीं. तथापि आपल्या देशांत त्या तत्त्वाला थारा मिळाला नाहीं. आपण आपले जुन्या चालीचे लोक पडलों, तेव्हां तहांतील अटी पाळणें हें एक पवित्र कर्तव्य आहे, असा आपला अजून समज आहे. तसेंच दुर्बळ राष्ट्रांनाही त्यांचे त्यांचे हक्क असून प्रबळांना त्यांचीं त्यांचीं कर्तव्यें आहेत; लहान लहान राष्ट्रांतील लोकांनाही जिवंत राहून स्वतंत्र राहाण्याचा हक्क मोठमोठ्या राष्ट्रांपेक्षां अणुमात्र कमी नाहीं ; आणि केवळ स्वातंत्र्यार्थ युद्धाला सिद्ध होणें मागील काळांत केव्हांही जितकें शक्य होतें, तितकेंच तें आजमितीसही आहे, असा आपला अद्यापही समज आहे. शिवाय आह्मी अशीही आशा करितों कीं, युद्धाच्या अखेरीस यूरोपची नवी व्यवस्था लागावी. त्या व्यवस्थेमुळें हीं उघड उघड सर्वमान्य तत्त्वें त्या खंडाला मान्य व्हावीं ; आणि रक्तस्रावाचा व अज्ञानाचा काल पुन्हा उद्भवून ह्या तत्त्वांचा ऱ्हास होण्याचा संभव इतःपर राहूं नये. आह्मीं एकजुटीनें शत्रूला जें तोंड दिलें आहे, त्याचें कारण थोडक्यांत असें आहे. हिंदुस्तानांतील आपले शूर योद्धे मार्सेल्स एथें येऊन दाखल झाले आहेत; आपल्या छत्राखालच्या लांबलांबच्या राज्यांतील तरुण जवानांपैकीं निवडक लोक सैन्यांत भरत आहेत; आणि दोन महिन्यांत आपलें संयुक्त राज्य ह्मणजे सैन्यांत भरती करण्याचें एक अफाट क्षेत्र बनलें आहे. तेव्हां ह्या सर्व गोष्टींचें कारण तरी तेंच.

आतां आज मी एथें कांहीं नुसती वाचाळता करण्यासाठीं आलों नाहीं; तर प्रत्यक्ष कांहीं क्रिया व्हावी ह्मणून आलों आहें. ह्यास्तव भाषण पुरें करण्यापूर्वी मी तुह्मांला एक थोडीशी प्रत्यक्ष उपयुक्ततेची गोष्ट सांगणार आहें. आज आपल्यावर अति बिकट प्रसंग येऊन पडला आहे. ह्याहून बिकट प्रसंग कोणावर कधीं आल्याचें इतिहासांत सांपडणार नाहीं. आपल्या ह्या संयुक्त राज्याच्या प्रत्येक भागांतील प्रत्येक माणसाला ह्या कामीं आपणांकडून यथाशक्ति मदत देण्याविषयीं व आपल्या हिश्शाचें काम करण्याविषयीं आह्मीं पाचारण दिलेलें आहे; मग तो पुरुष असो वा स्त्री असो. आपलें पहिलें काम सैन्यांत भरती करण्याचें होय. ह्मणून पुरुषांनीं सैन्यांत दाखल व्हावें, व स्त्रियांनीं त्यांचीं हल्लींचीं कामें उचलावीं. कित्येक प्रांतांत लोकांना एकप्रकारचें भय वाटत आहे, असें मला आढळतें. तें असें कीं, नव्या सैन्यांत भरती झाली, व तें तयार होऊन व त्याला लष्करी शिक्षण मिळून त्या सैन्याला कामगिरी नेमून देण्यांत आली ह्मणजे, टेरिटोरियल सैन्याला कदाचित् व्यत्यय होईल; अथवा कोणत्या तरी रीतीनें त्याचें महत्त्व कमी होऊन तें कनिष्ठ प्रतीचें ठरेल. ती कल्पना केवळ भ्रामक होय. हिच्यापेक्षां अपायकारक दुसरी कल्पना नाहीं; ह्या माझ्या ह्मणण्यावर विश्वास ठेवा.

ह्या कामीं निरनिराळ्या परगण्यांच्या संस्थांनीं देशाभिमानानें जे सतत प्रयत्न केले, त्यांजबद्दल, किंवा टेरिटोरियल सैन्याच्या योग्यतेबद्दल व हुशारी-बद्दल स्तुति करावी तितकी थोडीच. आपल्यावर सध्यां डोंगर कोसळला आहे. तेव्हां चोहों बाजूंनीं असा नेट लागला असतां माणसांनीं विलक्षण परिश्रम करणें व अतोनात नुकसान सोसणें, हें फारसें कठीण नाहीं. पण ह्या टेरि-टोरियल सैन्याची गोष्ट कांहीं तशी नव्हे; कारण त्यांना युद्धासारखें हुरूप आणणारें कांहीं कारण नव्हतें. तर जेव्हां लोकांनीं आपला वेळ गाण्याबजावण्यांत घालवावा, अशा शांततेच्या काळांत ह्या लोकांनीं आपला वेळ देशासाठीं खर्च केला असून विश्रांतिही अनुभविली नाहीं. युद्ध व त्यापासून उत्पन्न होणारीं दुःखें आणि त्यांत मिळणारा लौकिक, हीं सर्व आकस्मिक असून तीं कांहीं वरचेवर येणारीं नाहींत. पण टेरिटोरियल सैन्यानें लष्करी शिक्षण मिळवि-ण्यासाठीं सालोसाल वेळ घालविला आहे. शिवाय, त्यांपैकीं हजारों शिपायांनीं व कामगारांनीं युद्धकला शिकून व तिचा सराव करून आपण त्या कामाला लायक होण्यासाठीं आपला फुरसतीचा वेळही खर्च केला आहे. हें सैन्य आतां दोन महिने एकत्र करण्यांत आलें आहे. ह्या सैन्याच्या तुकड्या

देशाच्या निरनिराळ्या भागांत छावण्या देऊन आहेत; व उत्तरोत्तर त्यांची हुशारी वाढत चालली आहे. ह्मणून कोणतीही कामगिरी आपणांवर सोंपविली असतां ती पार पाडण्यास आपण पात्र आहों, असें त्यांनीं पूर्णपणें सिद्ध केलें आहे; मग ती कामगिरी खुद्द देशाच्या संरक्षणाची असो, आपल्या तटबंदीच्या ठाण्यांच्या मजबुतीची असो, अथवा थेट युद्धाच्या तोंडावर जाऊन लढण्याची असो.

कायम सैन्यांत (रेग्युलर आर्मींत) भरती करण्याविषयीं तुम्हांला सांगण्यास आज मी आलों आहें. पण आपल्या टेरिटोरियल सैन्याचा देशाभिमान व त्याची हुषारी हीं जाणत नसल्यामुळें मी तुह्मांला अशी भरती करण्यास सांगतों, असा कांहीं भाग नाहीं. आमची अशी इच्छा आहे कीं, नव्या पलटणी व आरमारी जहाजें व तोफखाने हीं आपापल्या स्थानींच राहावीं; त्या सर्वांची मूळची जूट व विशिष्ट तऱ्हेचें राष्ट्रीय स्वरूप कायम राहावें. म्हणून लष्करी सोईला जुळेल अशा बेतानें ही व्यवस्था साधेल तितकी करण्यांत येईल. ह्याप्रमाणें लहान लहान प्रांतांचें विशिष्टत्व कायम राखणें हेंच रास्त आहे. हें प्रचंड युद्ध तरी कोणत्या कारणासाठीं सुरू आहे? लहान लहान राष्ट्रांचें स्वातंत्र्य व त्यांची राजसत्ता कायम राखण्यासाठींच ना?

आयर्लंडमधील लोकांना विनंती करण्यासाठीं मी आठ दिवसांपूर्वीं डब्लिन शहरीं गेलों होतों. सरकारच्या व युद्धखात्याच्या तर्फे तेव्हांही मी आतांप्रमाणेंच त्यांना सैन्यांत भरती करून एक सबंध ऐरिश आर्मी कोर तयार करण्यास सांगितलें. वेल्समधील तुम्हा लोकांनाही आज तशीच विनंती मी पुन्हा करितों. आह्मांला ह्याच गोष्टीची जरूर आहे. वेल्श आर्मी कोरमधील जागा तुम्ही भरून काढण्याची आह्मांला जरूर आहे, स्थानास्थानांचीं व प्रांताप्रांतांचीं सैन्यें पृथक् पृथक् ठेविलीं. तसेंच ज्या प्रांतांतील लोकांनीं इतिहासांत नांव केलें आहे त्या प्रांताचें तें बुद्धिकौशल्य कायम ठेविलें, तर एकंदर देशाचें सर्वसाधारण कार्य साधण्यास व्यत्यय येईल; स्थानिक मंडळ्यांत बंधुभाव राहाणार नाहीं; आणि साम्राज्याच्या फौजेंतील प्रत्येक भागांतील व प्रत्येक पदवींतील सैनिकांमध्यें एक प्रकारचें मूळचें साम्राज्याचें बंधन उत्पन्न होणार नाहीं; असें कोणी प्रतिपादील तर तें आह्मांस कबूल नाहीं. उलटपक्षीं, अशीं स्थानिक व प्रांतिक सैन्यें तयार केल्यानें वरील सर्व गोष्टी साध्य करण्यास त्या सैनिकांना जास्त उत्साह व जोर येईल असा आह्मांला भरंवसा आहे.

वेल्समधील नागरिकहो, ह्या प्रचंड सभेंत तुह्मी हजारों लोक आज हजर आहां. तेव्हां तुह्मांला एक शेवटची गोष्ट मी सांगतों. आपल्या इतिहासाची स्मृति ठेवा. तुमच्या दऱ्याखोऱ्यांतून व डोंगरांतून प्राचीन काळीं तुमचें संरक्षण झालेलें आहे; तुमच्या पूर्वजांच्या वेळीं तेव्हांच्या युद्धासाठीं ह्याच ठिकाणांतून तुमच्या सैन्यांत भरती झालेली आहे; आणि त्या युद्धामुळें तुमच्या इतिहासाला शोभा आली असून तो प्रशंसनीय झाला आहे. तेव्हां त्या आपल्या दऱ्याखोऱ्यांचा व डोंगरांचा विचार करा. आपल्या प्रांतांतील जें जें ह्मणून मानार्ह वाटतें, व जें जें ह्मणून तुह्मी सत्य मानितां, त्याची त्याची स्मृति तुह्मांला देऊनच मी ही विनंती करीत आहें. ह्याहून आग्रहाची किंवा जोराची विनंती तुह्मांला आजपर्यंत कोणींही केलेली नसेल. तेव्हां आपल्या वाडवडिलांच्या नांवालौकिकास साजेल असें वागा; आणि आपल्या मुलांबाळांना सर्वोत्कृष्ट असेल असेंच वतन मिळवून ठेवा. तें कोणतें ह्मणाल तर, एका मोठ्या देशकार्यासाठीं आपल्या वाडवडिलांनीं सुखासमाधानाला झुगारून देऊन आपलें सर्वस्व घालविलें, आणि प्रत्यक्ष प्राणाच्या आहुति देऊन नांवलौकिक राखिला; एवढीच आपल्याविषयींची स्मृति.

REFBK-0001108

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.